२० सप्टेंबर १९६९

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

चाळीस पैसे

# हो चि मिन्ह

नवोदित राष्ट्रांनो ! चला !

पुकारा स्वातंत्र्य-लढा

ध्वजा उंचवा दुर्दम्य निष्ठेची

उभारा तुमच्या जीवनाचे सेतू

द्वेषाच्या स्फोटांनी उध्वस्त झालेल्या

पृथ्वीच्या भगदाडांवरून,

आणि करा आगेकूच.

रवींद्रनाथ टागोर

२० सप्टेंबर १९६९

# माणूस

समग्र साप्ताहिक

वर्ष नववे : अंक सोळावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी ५७३५९

किमत ४० पैसे : वार्षिक वर्गणी वीस रुपये : परदेशची वर्गणी चाळीस रुपये

९ सप्टेंबर १९६९

वि. शं. पारगावकर यांच्या 'माणूस' १५ ऑगस्ट अंकातील लेखात माझ्यासंबंधी काही मजकूर आहे. त्याबाबत माझा खुलासा –

१. फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्यूनने मला ढकलले. त्यामुळे खरी तंग वातावरणास सुरुवात झाली, हे श्री. पारगावकरांनी कोठेच नमूद केले नाही.

२. एक हजार विद्यार्थी फर्ग्युसन कॉलेजसमोरील रस्त्यावर उभे राहिले असता रहदारीस अडथळा येतो, असे पोलिसांनी सांगितल्यानंतर, कॅनालच्या कडेने उभे राहिले. त्यावेळी श्री. गोखले, सावंत, मुळे इत्यादी विद्यार्थ्यांनी श्री. ढवळे यांच्या शेजारी उभे राहून आंदोलनाच्या विरोधी अर्वाच्य घोषणा दिल्या. त्यावेळी मी हात जोडून श्री. ढवळे यांना हे प्रकार थांबवा, म्हणजे विनाकारण तंग वातावरण वाढणार नाही असे

स.नं.

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

पुन्हा पुन्हा सांगितले हे श्री. पारगावकरांना दिसले नसावे....
३. श्री. पारगावकरांनी माझ्या तोंडी जी वाक्ये घातली ती निखालस खोटी आहेत.

डॉ. कुमार सप्तर्षी

[ श्री. वि. शं. पारगावकर यांच्या लेखात डॉ. सप्तर्षी कसे वागले या मुद्याला अगदी गौण महत्त्व असल्याने यासंबंधीचा खुलासा–प्रतिखुलाशाचा पत्रव्यवहार येथेच थांबविणे इष्ट वाटते. – संपादक ]

## संपादक ' माणूस ' यांस

□ १६ ऑगस्टच्या अंकातील संपादकीय ' ७१ सालापर्यंत तरी वाट का पहावी ' हा लेख वाचला. मलाही असेच वाटते की गांधी जन्मशताब्दीनिमित्त ज्या काही आलतू फालतू गोष्टी केल्या जात आहेत त्यात विधायक किंवा गांधीजींच्या धोरणाला साजे शोभेसे काहीही नाही. हरितक्रांतीसाठी प्रदर्शने भरतात पण खेडो-पाडींच्या अडचणींकडे कुणीच लक्ष देत नाही. वानरांच्या उपद्रवाने खेड्यांतील छोटे बागवान कंटाळून जातात. गुरांच्या उपद्रवाने घरांतील परसांत होणारा भाजीपाला टिकत नाही. गुरांच्या बंदोबस्ताचे काम पोलीस खात्याकडे सोपविलेले, पण त्यांच्याकडे केलेल्या तक्रारी फुकट जातात, गांवात एखादा कोठे तरी कोंडवाडा असतो तेथपर्यंत गुरे पोचविणे अशक्यच.

गांधी जन्मशताब्दिनिमित्त भरलेल्या लांज्याच्या शिबीरात महिला मंडळाने (रत्नागिरीच्या) या अडचणी मांडल्या. सर्व भगिनींच्या याच अडचणी होत्या. त्या निवारण्यासाठी काही उपायही सुचविले. मुख्य म्हणजे वानरे आणि गुरे यांचा बंदोबस्त शेतीखात्याने करावा. त्यासाठी स्वतंत्र मनुष्यही नेमण्याची जरूर भासली तर तो खर्चही योग्यच ठरेल. रत्नागिरीच्या महारोग्यांच्या हॉस्पिटलकडे या जन्म-शताब्दीच्या काळात तरी जास्त लक्ष दिले जाईल, असे वाटले होते. रोग्यांना पाण्याची अपुरी सोय असल्याने बागकाम करण्यास वाव नाही. म्युनिसिपॅलिटी कायद्यावर निष्कारण बोट ठेवून आहे. माणुसकी म्हणून तरी यांच्या अडचणी दूर करणे भाग होते. पण ते न करता, त्यांच्या आवारातील जमिनीचा पुरा उपयोग न करता, कुठेतरी प्रदर्शने भरवून सरकारी पैशाची नासाडी सुरू आहे. जंगलतोड कमी होण्यासाठी जळणाची बचतही झाली पाहिजे. सरकारी हॉस्पिटल, जेल, कुष्ठरोग रुग्णालय अशा ठिकाणी मैला गॅस प्लँटस् झाले तर केवढे तरी जळण वाचेल. स्वयंपाकाचे कष्ट वाचतील. आनंद चुले किंवा तशाच प्रकारे स्वयंपाक करताना लागणाऱ्या जळणांत पाणी तापले जाण्याच्या ज्या सोयीच्या चुली आहेत त्यांचा उपयोग सरकारने सुरू केला पाहिजे. वेळ, जळण वाचेल व भाजी-पाल्याला मैला गॅस प्लँटमुळे खतही मिळेल. एस. टी. च्या मोठमोठ्या स्टेशनसना रोजच्या रोज हजारो प्रवासी शौचकूप वापरतात. त्या मैल्यावर गॅस प्लँट बांधून

तो गॅस कँटीनला विकत देता येईल. खतही विकले जाईल. याबाबतीत रत्नागिरी महिला मंडळाने केलेल्या सूचनांचा विचार चालू झाला आहे आणि रत्नागिरी जिल्ह्यात प्रयोगादाखल मैला गॅसप्लँट एस. टी. अधिकाऱ्यांकडून बांधला जाणार असल्याचे खात्रीपूर्वक समजते. एस. टी. चा लांबचा प्रवास या अपुऱ्या व अस्वच्छ संडासांमुळे अगदी नको होतो. असे कितीतरी ठिकाणी लक्ष देणे जरूर आहे.

सौ. सुशीला दाते

अध्यक्ष महिला मंडळ, रत्नागिरी

## टयून....

परवा काही फ्रेंच विद्यार्थ्यांशी भेट झाली. भारतातला मुक्काम आटोपून ते मायदेशी निघाले होते. 'आमच्या देशाविषयी तुम्ही तुमच्या लोकांना काय सांगणार?' असे विचारले तेव्हा त्यापैकी एकाने ते छापील उत्तर दिले, "इट् वॉझ् अ फाईन् टाईम इन् इंडिया – तुम्हा भारतीयांचे, विशेषतः पुणेकरांचे आदरातिथ्य विसरणं कठीण आहे बुवा." पण थोड्या वेळाने त्याने विचारले, "काहो, तुमच्या विद्यार्थ्यांना काही ध्येय नाही, स्वप्न नाही, हे कसं?" त्यांना तसेच काही तरी गुळमुळीत उत्तर दिले. तुमच्याकडे तरी काय वेगळी परिस्थिती आहे म्हणून गप्प बसवले.

पण खरे सांगायचे, म्हणजे त्यांनी अंतर्मुख बनविले खरे.

खरेच काय ध्येय आहे आमच्या समोर? शिकायचे, नोकरी करायची, संसार करायचा, आई–वडिलांना सुखात ठेवायचे, एवढेच? आमच्या आधीची तरुण पिढी स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करत होती, त्यांचे आम्ही देणे लागतो. काय पांग फेडणार आहोत आम्ही?

हिंदीचा वरचष्मा नको म्हणून जाळून घ्यायचे, मद्रासी नको म्हणून दंगल करायची, स्वतंत्र तेलंगण हवे म्हणून शाळा कॉलेजे बंद पाडायची, रवीन्द्र सरोवरात हात धुवून घ्यायचे–यात आमचे पौरुष आम्ही दाखवावे म्हणून भगतसिंग फासावर लटकले का? सावरकर सागर पोहून गेले का?

तरुण पिढी बेजबाबदार आहे म्हणून म्हाताऱ्यांनी बोटे मोडायची आणि आम्हाला नेतृत्व नाही म्हणून तरुणांनी हैदोस घालायचा, हे किती दिवस चालणार आहे?

काही तरी करावे म्हणून सारखे वाटते आहे. पण काय करावे सुचत नाही. अशी अनेकांची परिस्थिती झाली आहे.

पण हे 'अनेक' एका ठिकाणी येतात आणि सगळे काम फिसकटते.

आज मला आठवते, तीन वर्षापूर्वीची 'कॉफी–क्लब'ची मीटिंग. एसेस् म्हणत होते, "विद्यार्थी बेजबाबदार आहे, असे म्हणतात. पण मला तसे वाटत नाही.

तुम्ही खूपच कमी बेशिस्त आहात...तुम्हीसुद्धा काहीतरी करून दाखवू शकाल."
त्यावेळी हुरूप आला होता. 'काही तरी' करायची इच्छा पुरी होणार असे वाटायला लागले होते. पण शेवटी ते 'काही तरी' म्हणजे कॉफी पिणे आणि पिकनिकला जाणे ठरले. आता ते नावही मिटले.

नंतर ऐकले युवक क्रान्ति दलाविषयी. खूप अपेक्षा निर्माण झाल्या. दलाने कितीतरी चांगली कामे केली. पण शेवटी फी वाढीचा प्रेस्टीज पॉइण्ट आला आणि गाडे बारगळले. आमच्यात पोटेंशिअल खूप आहे. पण संघटना चातुर्य नाही. प्रत्येक कॉलेजात विद्यार्थ्यांच्या अनेक संघटना आहेत. काही पक्षप्रणीत आहेत, काही पक्षातीत आहेत. पण प्रत्येकाचा स्वतंत्र प्रेस्टीज पॉइण्ट आहे.

इतर छोट्या छोट्या राष्ट्रांची प्रगती पाहिली, आपल्या देशाची ससेहोलपट पाहिली की निराशेची खोली आणखीनच वाढायला लागते. खांडेकर म्हणतात त्याप्रमाणे 'वंदे मातरम्' म्हणताना शरम वाटायला लागते. कुठे आहे 'सुजलाम् सुफलाम्' मातृभूमी ? किती म्हणून आत्मवंचना करायची ?

दोन मिनिटांचा प्रसंग पण मन सगळे विसकटून गेले. सायकलवरून जात होतो. एका गल्लीतील कोपऱ्यावर एक डोंबारीण आपला खेळ आटोपून लेकराला खेळवत बसली होती. या बिचाऱ्यांचे खरेच एका दृष्टीने बरे असते. गरजा मर्यादित असतात, प्रतिष्ठेच्या खुळचा कल्पना नसतात, लाज–शरम–भीडभाड नसते. सारे कसे सुरळीत (!) चालू असते.–शेजारीच तिचा कुत्रा आज्ञाधारकपणे बसला होता. तेवढ्यात समोरच्या घरातून एक गोड चुणचुणीत पोर आली. तिला म्हणाली, "अहो, अहो, तुमच्या या कुत्र्याला पोळी घातली तर चालेल का ?"


आपल्यापेक्षा मोठे असलेल्याला 'अहो' म्हणायचे, कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी परवानगी घ्यायची, हे आमच्या मध्यमवर्गीयाचे चांगले संस्कार ! हाच तेवढा अभिमानाचा भाग.

डोंबारीण घाईघाईने म्हणाली, "आण हं बाळ. माझ्याकडे दे. मी घालीन त्या कुत्र्याला." पोरीने पोळी घातली. डोंबारणीने त्या गोड छोकरीच्या समाधानासाठी एक तुकडा कुत्र्यापुढे टाकला. आणि उरलेली शिळी पोळी अधाशीपणे ती खाऊ लागली. एक तुकडा आपल्या लेकराच्या तोंडात चघळायला दिला. थोडा पिशवीत घातला. दादल्यासाठी बहुधा.

हे आमचे जीवन. गेली बावीस वर्षे आमची समाजवादी समाजरचना चालू आहे.

अर्थात् आशा सोडलेली नाही. आई–बाप, समाज, देश यांचे ऋण कुठेतरी फेडता येणार आहे याविषयी अजूनही आशा आहे. नुकताच 'माणूस' मधला 'सिंधू पुत्रांनो ! चला' वाचला. संपादक माजगावकरांना काय म्हणायचे ते नीट कळले नाही. पण कुठे तरी 'ट्यून' जमेल असे वाटते आहे.

– किरण ठाकर



# दिल्ली

## दिनांक ९ सप्टेंबर

### काँग्रेसचे पानपत करायचे की पानशेत ?

काँग्रेसच्या ध्रुवीकरणाचा शिमगा संपला तरी कवित्व-बरेच उरले आहे. प्रधान मंत्री व भूतपूर्व उपप्रधानमंत्री हे दोघेही सध्या या कवित्वात गुंतले आहेत. दोघांनीही भाषणे करायचा सपाटा लावला आहे, व एकीकडे "जुन्या खोडांपासून सावधान." तर दुसरीकडे "गैरशिस्त वर्तनाचे भावी दुष्परिणाम वेळीच ओळखा." असे परस्परविरोधी इशारे दिले आहेत. पण ही भाषणबाजी सध्या दिल्लीच्या बाहेर चालली असल्याने ती राजधानीच्या घडामोडीत मोडत नाही.

सध्या दोन्ही काँग्रेसपुढची गंभीर समस्या म्हणजे ए. आय्. सी सी. चे खास अधिवेशन कोठे भरवायचे ? मोरारजी अहमदाबादेत इंदिरा-विरोधी जाहीर सभा घेत असताना व मुख्यमंत्री हितेंद्रभाई असल्या सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारीत असताना गुजराथेत थेट शत्रूच्या गोटात जाऊन पक्ष-नेता श्रेष्ठ की सरकार-नेता श्रेष्ठ हा यक्षप्रश्न धसाला लावणे इंदिरा-गोटाला अगदीच अप्रशस्त वाटते हे सुज्ञास सांगणे नलगे. तेव्हा बाईंच्या पदरात पडून पवित्र झालेल्या काही ए. आय्. सी. सी. सदस्यांनी अप्पांकडे अर्ज केला आहे की हे अधिवेशन गुजराथेत किंवा इतरत्र कोठेही न भरविता दिल्लीतच भरवावे. का, तर दिल्ली हे 'मध्यवर्ती ठिकाण' असल्याने सर्वांना सोईचे आहे, व या ठिकाणी "गाजावाजा किंवा भांडणे न करता शांतपणे" कामकाज करता येईल. अर्थात् मंडळींचा अंतःस्थ हेतू काय आहे हे राजधानीतला कोठलाही राजकीय बच्चा जाणून आहे. या मंडळींच्या मते एकदा एकतेचा ठराव पास झाल्यावर पक्षपती विरुद्ध प्रधानमंत्री ही टेस्ट मॅच रद्द झाली आहे व प्रधानमंत्र्यांच्या मंत्रिपद–वाटप–स्वातंत्र्यावर गदा आणण्याचे कारणच उरत नाही. पण अहमदाबादला अधिवेशन झाले तर काही सिंडिकेटी मंडळी हा कोळसा उगाळायला निघतील अशी धास्ती आहे. अर्थात इंदिरा-गोटाला ज्या कारणास्तव गुजराथ नको आहे नेमक्या त्याच कारणासाठी अप्पा-गोटाला ते हवे आहे हे ओघानेच आले. तेव्हा अशा काही मंडळींनी 'चलो अहमदाबाद'

अशा नेट धरला आहे. याच्याही पुढे जाऊन त्यांनी अप्पांना म्हटले, "या अर्जावर एकशे ए. आय्. सी. सी. सदस्यांनी सह्या केल्या आहेत असा दावा केला जातो, पण हे कितपत खरे आहे? काही सदस्यांनी दोनदा सह्या केल्या आहेत तर काही सह्या करणारे सज्जन सदस्यच नाहीत असे आम्हांला कळले आहे, तेव्हा याचा छडा लावा." छडा लावता असे निदर्शनास आल्याचे म्हणतात की, फक्त बारा ए आय्. सी. सी. सदस्यांनी सह्या केल्या होत्या व त्यांतल्या आठ जणांनी खरोखरीच दोन-दोनदा सह्या ठोकल्या होत्या. शिवाय आठ सह्या मुळातच सदस्य नसणाऱ्या महाभागांच्या होत्या. थोडक्यात म्हणजे पक्षाचे पानपत करायचे की पानशेत करायचे हा सध्या चर्चेचा विषय आहे.

## जगजीवनरामांवर कोसळलेला मोठेपणा

आणि असे काही तरी होणार, व तेही लवकरच याबद्दल कुठल्याच कॉंग्रेस-पक्षात दुमत नाही. इंदिराजींचा आता बराच बळकट झालेला उजवा हात म्हणजे जगजीवनराम यांनी लंडनच्या 'डेली टेलिग्राफ' वर्तमानपत्राचा दिल्लीतला वार्ताहर डेव्हिड लोशॅक याला नुकतीच एक खास मुलाखत दिली – परदेशी पत्रकारांना अशा खास मुलाखती देण्याइतके मोठेपण आता त्यांच्या अंगावर येऊन कोसळले आहे – त्यात त्यांनी असे वर्तविले आहे की आणखी काही आठवड्यातच कॉंग्रेस-मध्ये पुनः समरप्रसंग येणार आहे. ते म्हणाले, "बँक–राष्ट्रीयीकरणाने लोकांच्या अपेक्षा खूपच उंचावल्या आहेत. पण त्या सहजासहजी पूर्ण करणे शक्य नाही। तेव्हा जनतेच्या निराशेवर उतारा म्हणून काही तरी करणे प्राप्त आहे. जगजीवन-राम आणखी उवाच : यापुढे हिंदुस्थानात फक्त समाजवादी सरकारच टिकू शकेल. कॉंग्रेसने डाव्या बाजूने चालले पाहिजे. कॉंग्रेस 'लेफ्ट–ऑफ्–सेंटर' पक्ष आहे– पण कॉंग्रेसचा समाजवाद फार कट्टर असूनही चालायचे नाही; कारण तसे झाले तर जुन्या वळणाच्या शेतकऱ्यांचा पाठिंबा मिळणार नाही.

लोशॅकच्या मते आतापर्यंत कॉंग्रेसच्या 'बॉस' मंडळींनी समाजवादी फॅशनच्या सरकारकडे एक प्रकारचे विंडो–ड्रेसिंग म्हणून पाहिले आहे. तेव्हा प्रत्यक्ष समाजवादी आचरणात गुरफटण्याची पाळी आली तर त्याला ते विरोध करतील. पण या 'उजव्या' खोडांची पक्षावरची मगरमिठी नेस्तनाबूद करण्यासाठी बाई आणि कंपनीने पदर कसला आहे अशी त्याने 'आतली' बातमी पाठविली आहे. जाता जाता लोशॅकने होरा बांधला आहे की उपप्रधानमंत्र्यांची खाली असलेली जागा बहुधा जगजीवनरामांना मिळणार. ही वावडी गेले काही दिवस दिल्लीच्या राजकीय वातावरणात उडत आहे खरी, पण तसे होईलसे दिसत नाही. याचा एक लहानसा पण सूचक पुरावा म्हणजे सचिवालयातली मोरारजींची खोली गुपचूप यशवंतरावांना बहाल करण्यात आली आहे. ही खोली प्रधानमंत्राणींच्या खोलीला

लागून असून अलिखित संकेतानुसार तिला नंबर दोनचे महत्त्व आहे. तेव्हा सध्या तरी या खोलीचा दरवाजा जगजीवनरामांसाठी उघडेल असे चिन्ह नाही.

दरम्यान अप्पाजींनी काल इंदिराजींची तब्बल वीस मिनिटे भेट घेतली. या पहली मुलाकातमे मोरारजींच्या मंत्रीगृहप्रवेशाचा प्रश्न निघाला की नाही? अप्पांचे सूचक उत्तर : पुन: भेट होण्याइतपत निघाला. पण मोरारजी आता आपण पुन: मंत्रिमंडळात जाणार नाही असे जाहीर करीत असताना या चर्वित – चर्वणाचा फायदा काय ? अप्पांचे अधिक सूचक उत्तर : ते माझ्यावर सोडा.

## विरोधकांचे वादंग : उत्तररंग

गेल्या वार्तापत्राच्या वेळी विरोधी पक्षाची खलबते पुरी झालेली नव्हती, त्यामुळ हे वादंग मागील अंकावरून पुढे चालू ठेवणे प्राप्त आहे. त्यात सर्वात सनसनाटी बातमी म्हणजे भारताच्या राजकीय वातावरणातच असलेले डिफेक्शनचे व्हायरस जनसंघालाही बाधलेले दिसते. एरव्ही एकसंघ असणाऱ्या या पक्षात फुटीरपणाचा श्रीगणेशा करण्याचा मान प्रा. बलराज मधोक आपल्याकडे घेण्याच्या तयारीत दिसत आहेत. त्यांनी पक्षाच्या संमतीशिवाय मिनू मसानींच्या समवेत बँक-राष्ट्रीयीकरणाविरुद्ध सुप्रीम कोर्टात फिर्याद केली, आणि पक्षाने निर्णय घ्यायच्या आधीच जनसंघाची सेकंड प्रेफरन्स मते रेड्डींना मिळणार असे जाहीर केले. या दोन गोष्टींबद्दल कार्यकारिणीने त्यांना ठपका दिला आहे. याचा स्पष्ट अर्थ असा की मधोक आणि वाजपेयी यांच्यातले वैचारिक वैमनस्य आता चांगलेच वाढले आहे व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शिस्तीत पावले टाकणाऱ्या जनसंघाचे बंधन झुगारून मधोक केव्हा 'स्वतंत्र' होतील हे सांगता येत नाही. दीनदयाळ उपाध्यायांच्या मृत्यूपासून मधोकजींनी आपला 'स्वतंत्र' बाणा जनसंघाच्या गळी उतरविण्याचा बराच प्रयत्न केला आहे, पण त्यांचे नेतृत्व आणि त्यांचे वैचारिक सामर्थ्य या दोन्ही गोष्टी थिटया पडल्या आहेत.

थोडेसे विषयांतर करायचे म्हणजे राजधानीच्या नगरपालिकेत जनसंघाचे राज्य आहे. तेथेही डिफेक्शनची लागण झाली आहे. पक्षाचे नेते केदारनाथ साहनी हे रा. स्व. संघाच्या शिस्तीत मुरलेले आहेत. त्यांनी पक्षातल्या दोन-चार मंडळींवर शिस्तबाह्य वर्तन केल्याचा आरोप ठेवून शिस्तभंग-कारवाईचा बडगा उगारताच ही मंडळी रागावून पक्षाच्या बाहेर पडली आहेत. त्यामुळे नगरपालिकेत आता जनसंघाला फक्त दोनचे बहुमत आहे. पण साहनींनी ठणकावून म्हटले की "विरोधी पक्ष म्हणून बसावे लागले तरी बेहत्तर, पण शिस्तभंग चालू देणार नाही." जनसंघाने राजधानीत गेल्या अडीच वर्षात जेवढे कार्य करून दाखविले आहे तेवढे कांग्रेसला आधीच्या नऊ वर्षांतही करता आले नाही ही गोष्ट 'स्टेटस्मन'सारख्या मान्यवर वृत्तपत्राने मान्य केली आहे.

स्वतंत्र मंडळींनी एकीकडे राष्ट्रीयीकरणाच्या धोरणाला 'वीष' म्हटले आहे तर दुसरीकडे राष्ट्रीयीकरणाला पाठिंबा देणाऱ्या पण उदारमतवादी व लोकशाही-वादी पक्षांशी संगनमत करण्याची तयारीही दर्शविली आहे. पक्षाचे चिटणीस कूपर यांच्या मते जनसंघ, भाक्रांद व प्रसोपा यांच्या जोडीला बरेचसे काँग्रेसमनही एका संयुक्त आघाडीत येऊ शकतील. "त्यांचे विचार आमच्या विचाराशी खूपच जुळतात." आता हे स्वतंत्र विचाराचे काँग्रेसमन कोणते हे कूपरांनी स्पष्ट केले नाही, पण इंदिराबाई त्यांत नाहीत एवढे मात्र निक्षून सांगितले.

इकडे प्रसोपाचे अध्यक्ष गोरे यांनीही समान-विचारी पक्षांना एकत्र आणण्याची खटपट पुन: सुरू केली आहे, पण या निमित्ताने त्यांनी बोलावलेल्या बैठकीला हजर राहण्याचे आतापर्यंत फक्त भाक्रांदने कबूल केले आहे. संयुक्त समाजवाद्यांची विभक्त–विलापिका मागच्या वार्तापत्रांत गायली आहेच. उजव्या साम्यवाद्यांनी 'जोपर्यंत इंदिरा-सरकार उजव्यांच्या कारस्थानांमुळे कोलमडून पडण्याची शक्यता आहे तोपर्यंत आम्ही त्यांचे संरक्षण करू.' अशी जाहीर ग्वाही देऊन बाईंच्यावर 'हे प्रभो, माझ्या मित्रांपासून माझे संरक्षण कर' असे म्हणायची पाळी आणली आहे. उलट मार्क्सवाद्यांनी जाहीर आमंत्रण दिले आहे–"चला मंडळी, घटनेला सुरुंग लावू या."

– अनामिक



शिलंगणाचं सोनं

आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन



# हो चि मिन्ह

वा. दा. रानडे

"तुमच्या एका माणसामागे आमच्यातील दहा जणांना तुम्ही ठार कराल; पण अखेर तुम्हीच प्रथम दमाल." उत्तर व्हिएटनामचे कुशल, कणखर, कडवे, झुंजार व चिवट नेते डॉ. हो चि मिन्ह यांनी फ्रेंचांना दिलेला हा इशारा केवळ फ्रेंचांच्याच बाबतीत नव्हे तर अमेरिकेच्याही बाबतीत खरा ठरला. अमेरिकेने व्हिएटनाममध्ये पाच लाखावर सैनिक आणले. हानोई व हैफाँगच्या परिसरात बाँबहल्ले केले; पण त्यामुळे हो चि मिन्ह यांच्या नेतृत्वाखाली लढणाऱ्या उत्तर व्हिएटनामच्या शूर जनतेचे मनोधैर्य खचले नाही. अमेरिकेच्या अपेक्षेप्रमाणे ती जेरीस आली नाही. या दीर्घकालीन युद्धात अखेर अमेरिकाच दमली. उत्तर व्हिएटनामवरील बाँबफेक तिला थांबवावी लागली. एका छोटया राष्ट्राने जगातील सर्वात बलाढ्य राष्ट्राविरुद्ध मिळविलेला हा विजय डॉ. हो यांच्या संघटनाकुशल, झुंजार नेतृत्वामळेच मिळू शकला. हो चि मिन्ह गेले तरी त्यांचे सहकारी व्हिएटनामच्या एकीकरणाचा लढा त्याच जिद्दीने चालू ठेवतील यात शंका नाही.

हो चि मिन्ह यांचे सारे जीवन म्हणजे अखंड लढाच होता. राष्ट्रवादाचे आणि

स्वातंत्र्य चळवळीचे पहिले धडे छोटया होने वडिलांपासून घेतले. वडील सरकारी अधिकारी असले तरी राष्ट्रवादी बाण्याचे होते. जेत्यांची भाषा शिकण्यास नकार देण्याचे धैर्य ज्या काही थोडया अधिकाऱ्यांनी त्याकाळी दाखविले त्यापैकी ते एक होते. सरकारी नोकरी करीत असतानाच फ्रेंचविरोधी गुप्त संघटनातही ते कार्य करीत. या संघटनेतील कार्यकर्त्यांना वडिलांचे गुप्त संदेश पोचविण्याचे कार्य नऊ वर्षांचा हो करीत असे. गुप्त क्रांतिकारक चळवळीतही तेव्हापासून त्याचा संबंध आला. वडिलांना १९११ साली नोकरीवरून बडतर्फ करण्यात आले आणि पोलिसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी तरुण होही भमिगत झाला. त्यापूर्वी एक वर्ष आधी त्याने शिक्षण पुरे न करताच शाळा सोडली होती.

दक्षिण अनाममधील फान थिएट शहरातील एका खासगी शाळेत शिक्षक म्हणून हो चि मिन्ह यांनी काही दिवस काम केले; पण तेथील संथ, निष्क्रिय जीवनात त्यांचे मन रमेना. आपली वाढ खुंटत आहे असे त्यांना वाटू लागले. पॅरिस हे त्याकाळी जगातील क्रांतिकारकांचे स्फूर्तिस्थान व आश्रयस्थान होते. तेथे जाण्याची हो यांची आकांक्षा होती. पण जायचे कसे ? १९१२ च्या उन्हाळचात सायगावहून अमेरिकेकडे निघालेल्या एका ग्रीक जहाजावर आचाऱ्याच्या हाताखालचा पोऱ्या म्हणून त्यांनी काम मिळविले. सिंगापूर, हाँगकाँगमार्गे ते अमेरिकेस गेले. तेथे काही दिवस राहिल्यावर त्यांनी युरोपकडे प्रयाण केले. हॅम्बुर्गला ते उतरले व फ्रान्सला जाणाऱ्या जहाजावर नोकरी मिळविण्याची संधी शोधीत ते तेथेच काही दिवस थांबले व संधी मिळताच फ्रान्सच्या मार्सेय बंदरात ते उतरले. बोटीवरचा प्रवास त्यांनी 'बा' या नावाने केला होता. फ्रान्सच्या भूमीवर पाय ठेवल्यावर 'नुयेन तुत टोक' हे नवीन नाव त्यांनी घेतले व त्याच नावाने ओळखपत्रे नोंदली.

## पॅरीसमधील क्रांतिकार्य

मार्सेयहून हो पॅरिसला गेले. तेथे एका आर्टस्कूलच्या शिक्षकाच्या हाताखाली ते फोटो रिटचिंग शिकले व एका स्टुडिओत त्यांनी काम मिळविले. 'तुमचे फोटो रिटच करून घ्या,' 'आकर्षक फ्रेमसह आकर्षक फोटोना ७५ फ्रँक्स' अशी त्यांची जाहिरातही एका समाजवादी वृत्तपत्रात नेहमी येत असे. पण उपजीविकेसाठी काही तरी काम मिळवून जीवनात सर्वसामान्य माणसाप्रमाणे स्थिर होण्यासाठी काही हो यांनी एवढा लांबचा प्रवास केला नव्हता. पॅरिसमधील क्रांतिकारकांशी संबंध जोडावयाचे आणि इंडोचायनाचा स्वातंत्र्यलढा यशस्वी करण्यासाठी त्यांची मदत आणि मार्गदर्शन मिळवायचे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. सिलोन, मोरोक्को, अल्जीरिया व इतर काही वसाहतींमधील क्रांतिकारक त्यावेळी पॅरिसमध्ये होते. हो त्यांच्या बैठकांना हजर रहात. ते फारसे बोलत नसत; पण बोलण्यापेक्षा स्वातंत्र्यचळवळींबद्दलची चर्चा लक्षपूर्वक ऐकून ठिकठिकाणच्या चळवळींच्या स्वरूपाचा अभ्यास करण्यावर त्यांचा विशेष भर होता.

पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाला आणि शांतता तहाच्या अटी निश्चित करण्यासाठी व्हर्साय येथे ब्रिटिश पंतप्रधान लॉइड जॉर्ज, फ्रेंच पंतप्रधान क्लेमेन्सो व अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांची परिषद झाली. या परिषदेबद्दल हो यांनी बऱ्याच आशा बाळगल्या होत्या. अध्यक्ष विल्सन यांची चौदा तत्त्वे म्हणजे सर्वच परतंत्र देशांच्या स्वातंत्र्याची सनद ठरेल अशी आशा त्यांना वाटत होती. अठ्ठावीस वर्षाच्या या तरुणाने एक काळा सूट व हॅट भाड्याने घेतली व ज्या प्रासादात ही परिषद चालू होती तेथे तो घिरट्या घालू लागला. इंडोचायनास स्वयंनिर्णयाचा हक्क मिळावा अशी मागणी करणारे निवेदन हो यांनी बड्या तिघांना सादर केले होते; पण त्यांच्यापैकी कोणी हो यांची भेट घेण्यास तयार नव्हते. व्हर्साय शांतता तहात इंडोचायनाचा नामोल्लेखही नव्हता. हो यांची घोर निराशा झाली; पण या निराशेतूनच स्वातंत्र्य लढ्याचा अग्नि प्रज्वलित झाला आणि त्याची दाहकता वाढत जाऊन दुसऱ्या महायुद्धानंतर इंडोचायनावरील फ्रेंच साम्राज्यशाही सत्ता त्याने भस्मसात केली.

व्हर्साय तहानंतर १९२० च्या नाताळात भरलेल्या फ्रेंच समाजवादी पक्षाच्या परिषदेत फूट पडली. हो चि मिन्ह जहाल म्हणजे कम्युनिस्ट गटात सामील झाले. वसाहतींना ताबडतोब स्वातंत्र्य दिले पाहिजे अशी कम्युनिस्टांची भूमिका होती. "वसाहतीच्या प्रश्नावर तुम्ही कोणती भूमिका घेता हाच मी निकष मानतो." असे परिषदेत त्यांनी प्रतिपादले. वसाहतींना ताबडतोब स्वातंत्र्य द्यावे ही भूमिका स्वीकारण्यास फ्रेंच समाजवादी तयार नव्हते. परिषदेत फूट पडल्यावर लागलीच ३० डिसेंबर १९२० ला फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. हो पक्षाच्या संस्थापक सभासदांपैकी एक होते.

हो यांनी व्हर्साय परिषदेला जे निवेदन सादर केले त्याचा परिषदेवर प्रभाव पडला नाही तरी एक फायदा झाला. कार्ल मार्क्सचे जावई चार्लस लाँगेट यांच्याशी त्यांचा परिचय झाला. लाँगेट त्यावेळी 'ला पॉप्युलर' पत्राचे संपादक होते. त्यांनी हो यांना आपल्या पत्रात लेख लिहिण्यास सांगितले. फ्रेंचमध्ये लेख लिहिण्याइतके त्या भाषेवर प्रभुत्व हो यांचे त्यावेळी नव्हते, पण एक वर्षात हे प्रभुत्व संपादून ते लेख व गोष्टी लिहू लागले. त्यांनी डि बांबू ड्रॅगन' नावाचे वसाहतवादावरचे एक राजकीय विडंबन लिहिले होते व त्याचा प्रयोगही झाला होता.

हो आता वसाहतींच्या प्रश्नावरचे तज्ज्ञ समजले जात होते. वसाहतींच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या 'ला पारिया' पत्राचे ते संपादक झाले. याच वेळी 'फ्रेंच कलोनियालिझम् ऑन ट्रायल' ही छोटी पुस्तिकाही त्यांनी लिहिली. 'ला पारिया' पत्र व या पुस्तिकेस इंडोचायनात बंदी करण्यास आली. पण फ्रेंच बोटीवरील खलाशांनी इंडोचायनात त्याच्या प्रती गुप्तपणे नेल्या. त्या वाचून अनेक व्हिएटनामी तरुणांना स्वातंत्र्यलढ्यात सामील होण्याची स्फूर्ती मिळाली.

फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाच्या शिष्टमंडळाचे एक सभासद म्हणून हो जून १९२३ मध्ये मॉस्कोस आंतरराष्ट्रीय शेतकरी परिषदेस गेले. परिषदेच्या स्थायी समिती-वरील वसाहत राष्ट्रांचे प्रतिनिधी म्हणून ते दोन वर्षे मॉस्कोत राहिले व रशियन भाषा शिकले. नव्यानेच स्थापन झालेल्या 'युनिव्हर्सिटी ऑफ दि टॉयलर्स ऑफ दि ईस्ट' मध्ये (पूर्वेकडील श्रमिकांचे विद्यापीठ) त्यांनी क्रांतितंत्राचा अभ्यास केला.

## आशियातील चळवळ

यानंतरची काही वर्षे आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट संघटनेचा (कॉमिन्टर्न) एक जबाबदार व प्रमुख नेता म्हणून त्यांनी कार्य केले. मायकेल बोरोडिनबरोबर त्याच्या नेतृत्वाखालील रशियन शिष्टमंडळाचे दुभाषी म्हणून हो १९२५ साली कँटनला गेले, पण ते केवळ दुभाषी नव्हते. चिनी कम्युनिस्ट पक्षाचा प्रमुख प्रचारक म्हणून त्यांनी कार्य केले व हे कार्य करीत असतानाच व्हिटनामी राष्ट्रवाद्यांना एकत्र आणून अनामाइट क्रांतिकारक युवक संघ नावाची त्यांची संघटना जून १९२५ मध्ये स्थापन केली. अनेक व्हिटनामी क्रांतिकारकांनी व्हाम्पूआ लष्करी विद्या-पीठात शिक्षण घेतले. उत्तर व्हिएटनामचे सध्याचे पंतप्रधान फाम व्हान डोंग त्यापैकीच एक होते.

कँटनमध्ये असताना हो व्हिटनामी भाषेतील एक वृत्तपत्रही चालवीत. अनेक व्हिटनामी तरुणांना त्यांनी क्रांतिकारक चळवळीची दीक्षा दिली व त्यांनी नंतर इंडोचायनात जाऊन तेथे क्रांतिकारक चळवळीची केंद्रे संघटित केली.

चँग कै शेकने कम्युनिस्टांविरुद्ध युद्ध पुकारल्यानंतर बोरोडिनच्या शिष्टमंडळा-बरोबरच हो मॉस्कोस परतले; पण इंडोचायनातील स्वातंत्र्यलढ्यास मार्गदर्शन करावयाचे असेल तर आपण इंडोचायनाजवळच्या एखाद्या देशात असले पाहिजे असे त्यांना वाटू लागले व ते थायलंडला गेले. तेथे त्यांनी परद्वीपस्थ व्हिटनामी संघ स्थापन करून 'ला ह्युमनाइट' हे वृत्तपत्र चालविले. इं चायनात त्याच्या बऱ्याच प्रती येत. स्वातंत्र्य चळवळीचा एवढा प्रभावी प्रचार या वृत्तपत्रात असे की फ्रेंच राज्यकर्त्यांनी या पत्राला बंदी केली. एवढेच नव्हे तर उत्तर व्हिटनाम-मधील व्हिन्ह येथील प्रांतिक न्यायालयाने या पत्राचे संपादक म्हणून हो चि मिन्ह यांना १० ऑक्टोबर १९२९ ला त्यांच्या गैरहजेरीत फाशीची शिक्षा दिली, पण हो फ्रेंचांच्या हाती कधीच लागले नाहीत. स्वातंत्र्यचळवळीतील तीन प्रमुख गटांना एकत्र आणून त्यांनी १९३० साली इंडोचायना कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. हो सोडून बाकीचे कार्यकर्ते इंडोचायनात गेले व त्यांनी स्वातंत्र्यचळवळ संघटित केली.

दरम्यान हो आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट संघटनेचे फिरते प्रतिनिधी म्हणून आग्नेय आशियात कार्य करीत होते. सिंगापूरला भेट देऊन मलाय कम्युनिस्ट पक्षाची

स्थापना करण्यात त्यांनी महत्त्वाचा भाग घेतला. या काळात हाँगकाँग हा त्याच मुख्य तळ होता. ब्रिटिशांनी त्यांना अटक करून अठरा महिने तुरुंगातही डांबले होते. फ्रान्स त्यांना आपल्या ताब्यात देण्याची मागणी करीत होते व त्यांना एका फ्रेंच बोटीतून इंडोचायनाला पाठविण्याचा ब्रिटिशांचा विचारही होता. पण हाँग-कांग सरकार उलथण्याचा कट त्यांनी केल्याचा पुरावा नसल्याने हाँगकाँग अधि-काऱ्यांनी त्यांना अखेर सोडन दिले.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात १९ मे १९४१ ला राष्ट्रवादी व कम्युनिस्ट यांना एकत्र आणून 'व्हिट-मिन्ह' (व्हिएटनाम स्वातंत्र्य संघ) ही संघटना त्यांनी उभारली. ते स्वतः या संघटनेचे सरचिटणीस झाले. इंडोचायना सीमेवरील एका तळावरून ते गनिमांच्या शिक्षणाचे मार्गदर्शन करीत कोमिन्टांग नेत्यांच्या भेटी साठी चुंकिगला जात असता कोमिन्टांग अधिकाऱ्यांनी त्यांना अटक केली अठरा महिने ते तुरुंगात होते. मुक्ततेनंतर १९४४ साली हो चि मिन्ह हे नाव धारण करून ते उत्तर व्हिएटनाममध्ये गेले. त्यांनी बदललेले हे शेवटचे नाव. हे नाव एवढे रूढ झाले की त्याच नावाने ते जगभर ओळखले जाऊ लागले. हो चि मिन्हचा अर्थ तेजाने तळपणारा हो, ज्ञानेच्छु हो, ज्ञान मिळविलेला हो असा निर-निराळा करण्यात येतो. हो उत्तर व्हिटनामध्ये गेले. त्यावेळी त्यांच्या सहकाऱ्यांनी लाल नदीच्या उत्तरेकडील भागात आपली सत्ता प्रस्थापित केली होती. हो तेहतीस वर्षानंतर स्वदेशी परतले होते.

दुसरे महायुद्ध संपताच त्यांनी स्वतंत्र इंडोचायना प्रजासत्ताक स्थापल्याची घोषणा केली. उत्तर व्हिएटनाम त्यांच्या पूर्ण नियंत्रणाखाली होता. दक्षिणेत मात्र फ्रेंचांनी आपली सत्ता पुनः प्रस्थापित केली. ब्रिटिशांप्रमाणे फ्रेंचांनी शांततेने सत्ता-संक्रमण केले तर फ्रेंच संघराज्यात राहण्याचीही हो यांची तयारी होती. पॅरिसमध्ये वाटाघाटी होऊन करार झाला; पण फ्रेंचांनी तो पाळला नाही. हो चि मिन्ह यांच्या झुंजार व चिवट सैनिकांनी नऊ वर्षे फ्रेंचांशी लढत दिली. डिन बिनफूच्या लढाईत त्यांना जेरीस आणले. तेव्हा १९५४ मध्ये जिनीव्हा परिषद व करार होऊन उत्तर-व्हिएटनाम, दक्षिण व्हिएटनाम, लाओस व कंबोडिया ही राज्ये अस्तित्वात आली. दोन वर्षांनी निवडणुका घेऊन व्हिएटनामचे एकीकरण करावे अशी या करारात अट होती; पण दक्षिण व्हिटनामने ती अट पाळली नाही. पुनः यादवी युद्धाला तोंड लागले. दक्षिण व्हिएटनाम सेनेचे सल्लागार म्हणून प्रथम अमेरिकन आले. पण अमेरिकन लष्करी मदत वाढत गेली. अमेरिकन सैनिकांचीही संख्या वाढत वाढत पाच लाखावर गेली. दक्षिण व्हिएटनामचे युद्ध खरोखर अमेरिकाच लढत होती. अमेरिकेचा हस्तक्षेप नसता तर हो चि मिन्ह यांनी युद्ध केव्हाच जिकले असते; पण दीर्घकाल युद्ध चालवून त्यांनी अखेर अमेरिकेलाही जेरीस आणले. उत्तर व्हिएटनामवरची बाँबफेक थांबवून अमेरिकेला अखेर पॅरिसमध्ये शांतता वाटा-

घाटीस तयार व्हावे लागले. युद्धातला चिवटपणा उत्तर व्हिएटनामच्या नेत्यांनी वाटाघाटीतही दर्शविला आहे. दक्षिण व्हिएटनाममधून अमेरिकन फौजा काढून घ्यावयास ते अमेरिकेस भाग पाडतील यात शंका नाही.

## साधेपणा, शिस्त

डॉ. हो चि मिन्ह यांची आकृती पाहिली तर एवढ्या असामान्य सामर्थ्याची ही व्यक्ती असेल अशी कल्पना येत नसे. किरकोळ अंगकाठी, उंची अवघी ४ फूट ११ इंच; पण विशाल डोके, भव्य कपाळ, लहान पण रुबाबदार दाढी आणि तेजस्वी डोळे लोकांवर छाप पाडीत. बुद्धिमत्ता, धैर्य, ध्येयनिष्ठा, निर्धार आणि प्रेमळपणा हे त्यांच्या व्यक्तित्वाचे गुण त्यांच्याशी परिचय होणारास प्रतीत होत.

हो यांची राहणी अत्यंत साधी होती. खाकी जाकिट किंवा लांब गळाबंद कोट, विजार, हॅट व चिनी चपला याच सध्या वेषात ते नेहमी रहात; मग ते स्वदेशात असोत किंवा परदेशात असोत. कामात असोत किंवा एखाद्या परदेशी पाहुण्याच्या स्वागत समारंभाला उपस्थित असोत. पण त्यांचा साधेपणा म्हणजे गबाळेपणा नव्हता. सैनिकाची शिस्त व नियमितपणा त्यांच्या नेहमीच्या जीवनात होता. पहाटे पाच वाजता नियमित उठून ते आपल्या टेबलाशी कामात गढलेले असत. आपल्या जुन्या टाइपरायटरवर स्वतःची पत्रे ते स्वतःच टाइप करीत. नेहरूंप्रमाणेच ते मुलांचे लाडके नेते होते. नेहरूंना मुले 'नेहरू चाचा' म्हणत. हो यांना व्हिएटनामी मुलेच नव्हे तर मोठी माणसेसुद्धा 'अंकल हो' (हो चाचा) म्हणत.

हो चि मिन्ह यांनी अविवाहित राहून सारे आयुष्य राष्ट्रासाठी व कम्युनिस्ट चळवळीसाठी वेचले. त्यासाठी कधी प्रकृतीची पर्वा केली नाही. हो यांच्यासंबंधी लिहिलेल्या एका पुस्तकात सध्याचे पंतप्रधान फाम व्हान डाँग म्हणतात, "रोगाचा प्रतिकार करण्यास आपली शक्ती अपुरी पडत आहे असे वाटे तेव्हाच फक्त हो औषध घेत."

स्वतःचा साधेपणा हो यांनी आपल्या सहकाऱ्यात बाणवला होता. एवढेच नव्हे तर साऱ्या जनतेने तो बाणवला होता म्हणूनच ही जनता एवढा दीर्घकाळ लढा देऊ शकली. "दोन वर्षांत मी नवा कपडा घेतला नाही" असे उत्तर व्हिएटनामचे आरोग्यमंत्री फाम नगॉन यान्ह यांनी एका ऑस्ट्रेलियन वार्ताहराजवळ बोलताना सांगितले.

युद्ध चालविण्यासाठी रशिया व चीन या दोन्ही राष्ट्रांकडून हो चि मिन्ह यांना मदत घ्यावी लागली; पण ती स्वीकारताना त्यांचे वर्चस्व त्यांनी आपल्यावर प्रस्थापित होऊ दिले नाही. रशियाने शस्त्रांची मदत केली पण जी शस्त्रे चालविण्यासाठी रशियन तंत्रज्ञांची मदत लागेल ती स्वीकारण्याचे हो यांनी नाकारले. चिनी मदत त्यांनी घेतली पण 'मोठी झेप'सारख्या चीनच्या फसलेल्या प्रयोगाचे अंधानुकरण त्यांनी केले नाही.

## पुनर्रचना

दीर्घकाल युद्ध लढावे लागल्याने पुनर्रचनेच्या कार्यास हो यांना फारसा वेळ मिळाला नाही; तरीही धान्य उत्पादन, शिक्षण व आरोग्य या प्रश्नांकडे त्यांनी लक्ष दिले. एखाद्याच मोजक्या वाक्यात ते आदेश देत आणि जनता तो आदेश निष्ठेने अंमलात आणी. 'प्रत्येक व्हिएटनामी नागरिकास लिहिता वाचता आले पाहिजे.' एवढे वाक्य त्यांनी उच्चारावयाचा अवकाश, साक्षरता प्रसाराची मोहीम धडाक्याने हाती घेण्यात आली. फ्रेंच राजवटीत ८५ टक्के लोक निरक्षर होते, हे प्रमाण तीन वर्षात ४० टक्क्यापर्यंत खाली आणण्यात आले.

'जमिनीचा एक तुकडाही मशागतीशिवाय राहता कामा नये' हा त्यांचा आदेशही शेतकऱ्यांनी एकनिष्ठेने अंमलात आणला. धान्य उत्पादन वाढले व परदेशातून धान्य आयात करण्याचा प्रसंग उत्तर व्हिएटनामवर कधी आला नाही.

आरोग्याच्या बाबतीत केलेल्या प्रगतीची कल्पना देताना चेंग चाऊ हॉस्पिटलच्या प्रमुख डॉक्टरांनी एका वार्ताहरास सांगितले की, "खेड्यात आता अनेक हॉस्पिटले उभारली गेली आहेत. दहा वर्षात आम्ही मलेरियाचे उच्चाटन केले असून कॉलरा, देवी, पोलिओ या रोगांचीही नवी लागण नाही. फ्रेंच राजवटीत या जिल्ह्यात एकही हॉस्पिटल नव्हते. पाच दहा वर्षांनी एखादा डॉक्टर येऊन सोळा ते तीस वयाचे तरुणांना कॉलरा प्रतिबंधक लस टोचीत असे."

शांततेचा काळ असता तर हो यांच्या नेतृत्वाखाली उत्तर व्हिएटनामी जनतेने निरनिराळ्या क्षेत्रात यापेक्षाही अधिक प्रगति केली असती.

क्रांतिकारक म्हणून हो यांच्या कार्याची तुलना लेनिन किंवा माओ त्से तुंग यांच्या कार्याशीच करावी लागेल. त्या दोन नेत्यांप्रमाणे कम्युनिझमच्या विचारप्रणालीत स्वतःची वैचारिक भर त्यांनी घातलेली नाही हे खरे; पण ते स्वतंत्र विचारांचे कम्युनिस्ट नेते होते. कम्युनिझमची त्या त्या राष्ट्रातील परिस्थितीशी योग्य सांगड घातल्यानेच तो यशस्वी होऊ शकेल हे त्यांनी ओळखले व त्याप्रमाणे धोरण आखले. रशिया किंवा चीनचे अंधानुकरण त्यांनी केले नाही किंवा त्यांच्या धोरणाचे दडपण मानले नाही. आपल्या राष्ट्राच्या परिस्थितीस योग्य असे रशिया व चीनकडून घेण्यासारखे असेल तेवढेच त्यांनी घेतले. रशिया-चीन संघर्षातून आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत पडणारी फूट त्यांना मान्य नव्हती. ही फूट टाळण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. १९५७ व १९६० च्या आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट परिषदात ऐक्य टिकविण्यासाठी जे मसुदे संमत झाले ते तयार करण्यात हो चि मिन्ह यांचा महत्त्वाचा वाटा होता.

असा हा थोर कुशल संघटक व कडवा क्रांतिकारक नेता गेला असला तरी वसाहतीच्या स्वातंत्र्यचळवळीच्या इतिहासात त्यांचे स्थान चिरस्थायी राहील. व्हिएटनामी जनतेस त्यांचे कडवे नेतृत्व नेहमीच स्फूर्ती देत राहील यात शंका नाही.

□ □ □

# बँकांचे राष्ट्रीयीकरण एक आव्हान

प्रा. रा. म. बिवलकर

११ जुलै १९६९ रोजी नव्या आर्थिक धोरणासंबंधीचा पंतप्रधानांचा मसुदा काँग्रेस कार्यकारिणीला सादर झाला. तेव्हापासून देशाच्या राजकीय आणि आर्थिक नभांगणात उडालेला धुरळा, बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे विधेयक ऑगस्ट महिन्याच्या ९ तारखेला पार्लमेंटमध्ये संमत झाल्यावर आणि तदनंतर घडून आलेल्या राष्ट्रपतींच्या निवडणुकीचा निकाल लागल्यावर, स्थिरावावा अशी रास्त अपेक्षा आहे. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या विधेयकावर सही करणारे त्यावेळचे हंगामी राष्ट्रपती श्री. वराहगिरी व्यंकटगिरी हे आता राष्ट्रपती म्हणून निवडून आलेले असल्याने बँकाच्या राष्ट्रीयीकरणात राजकीय हेतू होता की आर्थिक निकड होती हा वाद आता निरर्थक ठरला आहे. चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले – आता दोन वर्षापूर्वी जारी केलेली बँकांवरील सामाजिक नियंत्रणे – आणि त्यातून अपेक्षिलेल्या सुधारणा अधिक जोमाने आणि वेगाने प्रत्यक्षात उतरविणे शक्य झाले आहे. त्यामुळेच बँकांचे राष्ट्रीयीकरण ही गोष्ट राजकीय धुरोळ्यातून बाजूला काढून – राष्ट्रीयीकरणाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने – वेळापत्रक आखून ती कार्यवाही लगेच सुरू करणे आवश्यक आहे.

भारतीय आर्थिक विकासाच्या संदर्भात बँक व्यवसायाचे उद्दिष्ट, स्वरूप, कार्य या सर्व बाबतीत नवी घडण बसविण्याच्या दृष्टीने बँकिंग कमिशन विचार करीत आहे. बँक धंद्याशी निगडीत असलेल्या सर्व जाणकार मंडळींनी भारतीय बँकांच्या सर्व समस्यांचा वस्तुनिष्ठ, शास्त्रीय व निकोप दृष्टिकोनातुन अभ्यास करून आपले विचार, नवे धोरण ठरविणाऱ्या कमिशनपुढे मांडले पाहिजेत. नवभारताच्या जडणघडणीत बँक व्यवसायाला आता अनेक जबाबदाऱ्या उचलायच्या आहेत. त्या दृष्टीने या सर्व प्रश्नांचा साकल्याने विचार होऊन नवी घडण ठरणे केव्हाही योग्य होय.

राष्ट्रीयीकरण म्हटले की त्याला लगेच कम्युनिस्ट धार्जिण्या धोरणाचा वास येण्याचे कारण नाही. बँकांचे राष्ट्रीयीकरण लोकशाही जीवनमार्गाच्या कक्षेत बसणारेच आहे. बँकव्यवसायाचा काही भाग सरकारी अर्थक्षेत्रात असणे ही गोष्ट

युरोपमधील राष्ट्रांनाही नवी नाही. लंडन इन्स्टिटयूट ऑफ् बँकर्स या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या "बँकिंग ट्रेण्ड्स् इन् युरप् टुडे" नामक पुस्तकात स्विडिश बँकर्स अॅसोसिएशनचे अध्यक्ष श्री. एल्. इ. थुनहोम (Mr. L. E. Thunholm) यांनी एक सुंदर लेख लिहिला आहे. युरोपमधील विविध देशात सरकारी अर्थक्षेत्रातील बँकांचे प्रमाण किती आहे आणि ते अपरिहार्य कसे आहे याचे विश्लेषण त्यांनी या लेखात केले आहे. इटलीमधील ९० टक्के बँक-क्षेत्र सरकारी अखत्यारीखाली आहे. तर फ्रान्समधील हे प्रमाण ८० टक्क्यांच्या घरात आहे. जर्मनीने या बाबतीत ७० टक्क्यांची कक्षा गाठली आहे तर नार्वेने ३५%, स्वीडनने २६%, ग्रेट ब्रिटनने १५%, आणि अमेरिकेने १०% बँक क्षेत्र सरकारी अर्थक्षेत्रात घेतले आहे. भारतात इम्पीरिअल बँकेच्या राष्ट्रीयीकरणानंतर आणि औद्योगिक भांडवली गरज भागविणाऱ्या केंद्र व राज्यपातळीवरील विविध संस्था अस्तित्वात आल्यापासून ३३% बँक व्यवहार सरकारी अखत्यारीखाली आलेले होतेच. चौदा मोठ्या व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे हे प्रमाण ८६% एवढे झाले आहे. फ्रान्समधील मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण दुसऱ्या महायुद्धानंतर करण्यात आले, तर इटलीत १९३० सालीच बँका सरकारी अर्थक्षेत्रात घेतल्या गेल्या. श्री. थुनहोम म्हणतात की, "या दोन्ही राष्ट्रांतील राष्ट्रीयीकृत बँका स्पर्धा करतात, कार्यक्षमतेने काम करतात आणि अगदी खाजगी बँकांसारख्याच वागतात. रशियातील झाले, तरी बँकर्स, बँकर्ससारखेच बोलणार आणि तसेच वागणार नाही का?"

या स्विडिश बँकरचे खाली उधृत केलेले विचार राष्ट्रीयीकरणाच्या विरोधकानी लक्षात घ्यावेत असेच आहेत.

"आपल्याला आवडो अगर नावडो, अलीकडच्या काळात बँकव्यवसायात, सरकारी अर्थक्षेत्रातील बँकांची स्पर्धा सर्वत्र देशात वाढती आहे आणि या परिस्थितीशी जमते घेणे आज क्रमप्राप्त ठरले आहे. राजकीय सामाजिक अगर आर्थिक कारणामुळे, पत-बाजारात सरकारी अर्थक्षेत्र आपले हातपाय पसरीत आहे. खाजगी व्यवसायी म्हणून या गोष्टीचे आपल्याला दुःख होणे साहजिकच आहे;

पण हे होणे गैर आहे, देशाच्या भल्याचे नाही, असे आपणही म्हणू शकत नाही. सरकारी अर्थक्षेत्रातून विविध आर्थिकक्षेत्रांना होणारा पतपुरवठा खाजगी बँकांमार्फत होणाऱ्या पतपुरवठ्यापेक्षा अधिक संतुलित असतो. देशहिताच्या दृष्टीने योग्य असतो, हे आपल्यालाही कबूल करावेच लागेल."

राष्ट्रीयीकरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे अर्थव्यवस्थेमधील जास्तीत जास्त क्षेत्रांना महत्त्वानुसार पतपुरवठा करणे. मागासलेल्या प्रदेशांची गरज आधी भागविणे. समाजातील विविध थरांतील व्यक्तींपर्यंत पतपुरवठा पोचविणे. यात छोटे कारखानदार, किरकोळ व्यापारी, डॉक्टर, वकील, नोकरदार, स्वतंत्रपणे उद्योग करणारे, छोटे शेतकरी वगैरे विविध थरातील मंडळींचा समावेश होईल. **राष्ट्रीयीकरणानंतर, बँकेने किती नफा मिळवला हे तिच्या कार्यक्षमतेचे गमक न राहाता, वरील पैकी किती व्यावसायिकांपर्यंत तिचा पतपुरवठा पोचला यावर तिचे यश मोजले जाईल.**

बँकांना आता खेड्यापर्यंत पोचायचे आहे. तिथल्या बहुसंख्य अशिक्षित खेडुतांना बचतीची सवय लावायची आहे, त्यांच्या ठेवी गोळा करायच्या आहेत. त्यांच्या समस्या समजावून घ्यायच्या आहेत. त्यांच्या छोट्या मोठ्या उद्योगांना नव्या प्रकारच्या तारणावर कर्जपुरवठा करायचा आहे. बँक, सामान्य माणसाची मित्र, सल्लागार व मार्गदर्शक कशी असते हे पटवून द्यायचे आहे. आजवरचे या बँकर मंडळींचे ज्ञान आणि पद्धती अगदी वेगळ्या होत्या. अगदी निराळ्या वातावरणात त्यांचा धंदा चालला होता. आपल्या अलिशान कार्यालयात ठेवीदार अगर, कर्जदाराची ते वाट पाहात असत. आता त्यांना ठेवीदारांच्या आणि कर्जदारांच्या शोधात बँकेच्या बाहेर पडावे लागेल. नफा आणि समाजाची गरज यात विशिष्ट संतुलन साधावे लागेल.

आणि हे कार्य मोठे कठीण आहे. कारण बँकांच्या सर्व थरातील कर्मचाऱ्यांचा दृष्टिकोन आणि वृत्ती बदलण्यावर हे सारे अवलंबून आहे. पूर्वी त्यांचा संबंध बड्या उद्योगपतींशी, व्यापाऱ्यांशी, सटोडियांशी यायचा. मोठ्या 'पॉश' वातावरणात सगळे व्यवहार ठरायचे. तारणाच्या वस्तू ठरलेल्या होत्या, पद्धती माहिती होत्या. आता माणसे निराळी, तारणे निराळी, पद्धतीही निराळी असायला हवी. माझ्या ओळखीचे एक बँक एजंट परवा सहज म्हणाले, "कसले राष्ट्रीयीकरण घेऊन बसलात प्रोफेसरसाहेब. सगळा गाढवांचा गोंधळ आहे. आता 'पत' नसलेल्याना 'पत' आहे म्हणून आम्ही कर्जे द्यायची! डुकरे, कोंबड्या, म्हशी—ही आता तारण होणार! कुंभाराला कर्ज देतांना गाढवावरही आम्हाला कर्ज द्यावे लागणार. हा काय साला धंदा आहे? ×××× आहे सगळा!" माझ्या या मित्राचे हे उद्गार बँकव्यावसायिकांचे प्रातिनिधिक आहेत असे समजायला हरकत नाही.

आमच्या मागासलेल्या देशाचा आर्थिक विकास वेगाने घडवून आणण्यासाठी विविध अर्थक्षेत्रात विविध थरातील व्यक्तींमधून उद्योगसंघटक निर्माण व्हायला हवेत. याबाबतीत कांही थोडया कुटुंबांची मक्तेदारी–देशाच्या विकासाला पुरेशी नाही आणि योग्यही नाही. योग्य तऱ्हेने भांडवलाचा पुरवठा झाला तर देशातील उत्पादक घटक तरारून उठतील आणि हा हा म्हणता इच्छित लक्ष्ये भेदून टाकतील. आजवर विकासामागे भांडवल जात असे – आता त्याचे कार्य विकास घडवून आणणे हे राहील. पतपुरवठ्याने आणि बँकांनी याबाबतीत पुढाकार घेतला पाहिजे. आणि हे साधणे, बँकांच्या एकत्रित प्रयत्नावर, पुरोगामी धोरणावर व सामाजिक कर्तव्याच्या आणि राष्ट्रहिताच्या जाणीवेवर अवलंबून आहे. राष्ट्रीयीकृत बँकांना आता आपले सनातनी धोरण सोडायला हवे.

आजपर्यंत बँका, कर्जदाराच्या प्रत्यक्ष – पतीवर कर्जे देत. आता कर्जाच्या उपयोगामुळे कर्जदाराची निर्माण होणारी पत त्यांना विचारात घ्यायला हवी. नवी क्षितिजे उजळायला हवीत. ते करताना आज कर्जदाराची प्रत्यक्ष पत जाणण्याची जशी त्यांची काही गमके आहेत तशीच 'अपेक्षित पत' ताडण्याची गमके त्यांनी बसवायला हवीत. साऱ्याच छोटया कर्जदारांबाबत ही अडचण येणार असल्यामुळे या बाबतीत नवे धोरण लगेच ठरायला हवे. दोन वर्षांपूर्वी सामाजिक नियंत्रणे जारी झाली आणि बँकांनी – छोटया उद्योगधंद्यांना कर्जे देण्याच्या दृष्टीने नवी गमके – नवी तारणे ठरवून कर्जे द्यायलाही सुरवात केली होती. कृषिउद्योगाला पतपुरवठा करण्याच्या दृष्टीने ३३ व्यापारी बँकानी भांडवल उभारून 'अॅग्रिकल्चरल् फिनान्स कार्पोरेशन' स्थापन करून (१-४-६८) ती संस्था, कृषिउद्योगाची माहिती मिळविणे, नवे लागेबांधे निर्माण करणे, सहकारी व कृषिउद्योगात काम करणाऱ्या विविध संस्थांचे व व्यक्तींचे सहकार्य मिळविणे ही कामे करू लागली होती. जगातील इतर विकसनशील राष्ट्रांच्या अनुभवाचा फायदाही घेण्याचा तिचा विचार होता.

या सर्व पार्श्वभूमीवर, आजवर दुर्लक्षिलेल्या क्षेत्रांना पतपुरवठा करण्यासाठी नवे धोरण व कार्यक्रम आखून कार्यवाहीत आणणे बँकांना सहज शक्य आहे. सरकारने तशा तऱ्हेचे आदेश त्यांना त्वरित देणे अगत्याचे आहे.

छोटया उद्योगांना पतपुरवठा करण्याच्या प्रश्नावरून राष्ट्रीयीकरणाशी प्रत्यक्षपणे संलग्न नसलेल्या पण औद्योगिक विकासाशी निगडित असलेल्या एका समस्येचा उल्लेख इये अस्थानी न ठरावा. ही समस्या आहे मोठ्या उद्योगधंद्यांशी संलग्न असलेल्या छोटे मोठे भाग – विभाग बनविणाऱ्या छोटया कारखानदारांची. आजवर त्यांना पतपुरवठा होण्याची अडचण होती ती आता दूर झाली तरी त्यांच्या मालाला सातत्याने मागणी मिळण्याच्या दृष्टीने मोठ्या उद्योगधंद्यांशी त्यांचे कायम नाते जोडणे जरूर आहे. कामगारांना नोकरीची सुरक्षितता उपलब्ध झाली आहे; पण

रशियन राज्यक्रांतीविषयी प्रचारात्मक
साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या
नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला
मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

प्रस्तावना : ना. ग. गोरे

लेखक : वि. स. वाळिंबे

मूल्य : अठरा रुपये

राजहंस प्रकाशन : १०२५ सदाशिव पेठ : पुणे ३०

छोटया उद्योगपतींना ' जॉब सेक्युरिटी ' मात्र नाही. त्यामुळे मोठे उद्योगधंदे त्यांची नेहमीच गळचेपी करतात व ते बंद पाडतात. त्यांना बाजारात पत उरत नाही ती या पिळवणुकीमुळे. आज या देशात वस्तूंच्या किमतींचा व त्यांच्या उत्पादनमूल्याचा काही संबंधच राहिला नाहीसे दिसते. त्यामुळे मोठया उद्योगधंद्यांना अशी पिळवणूक करता येते व शिवाय त्या छोटया गोष्टींचा पुरवठा खंडित झाला तर आपल्या कारखान्यात वाटेल तेवढे उत्पादनमूल्य पडले तरी त्या वस्तू तयार करून घेता येतात. म्हणूनच सरकारने बँकांच्या द्वारा या छोटया उद्योगपतींना कर्जपुरवठा करताना ज्या मोठया उद्योगाशी ते निगडित असतात त्यांच्याकडून संरक्षित मागणीचे करारनामे सक्तीने घेतले पाहिजेत. म्हणजे पतपुरवठा करणाऱ्या बँकांचे पैसेही सुरक्षित राहातील व छोटया उद्योगांनाही ऊर्जितावस्था येईल. याबाबतीत जपानमधील ' मित्शिवासू ' कंपनीचे उदाहरण चपखल ठरावे. या कंपनीच्या वैविध्य-पूर्ण उत्पादित वस्तूंना लागणारे अनेक लहान मोठे भाग – विभाग मोठया प्रमाणावर निर्मून पुरविणारे तीनशे छोटे उद्योगपती या कंपनीशी संलग्न आहेत. कंपनी त्यांना विवक्षित मागणीची खात्री देते. तांत्रिक मार्गदर्शन करते. वेळेनुसार त्यांना लागणारा कच्चा माल मोठया प्रमाणावर खरेदी करून पुरविते, नवनव्या उत्पादन-पद्धती वापरण्यास उत्तेजन देते. यामुळे प्रत्येक कारखानदाराला जो नफा होतो त्यातील काही टक्के मित्शिवासू कंपनीला द्यावे लागतात. त्यामुळे ही कंपनी उत्पादित वस्तू ग्राहकांना कमी भावात देऊ शकते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धेत चांगलाच टिकाव धरू शकते. आपल्या पूरक कारखान्यांनाही सांभाळू शकते. संमिश्र अर्थ-व्यवस्थेचा आपण गाजावाजा करतो. पण काही कारखाने सरकारने चालविणे यापरता या संमिश्र अर्थव्यवस्थेला अर्थ नाही. **समाजवादी समाज निर्माण करू पाहाणाऱ्या शासनाने – छोटया कारखानदारांना वरीलप्रमाणे संरक्षण दिल्याखेरीज या देशाचे औद्योगीकरण निर्वेध होणे शक्य नाही.**

कृषिक्षेत्रात आज नियंत्रित मार्केटयार्डस्, गोडाउन्स्, एकाधिकार खरेदी, सेलपर्चेस युनियम्स आणून शेतकऱ्याला शेतमालाच्या योग्य किमती मिळवून देण्याचा प्रयत्न चालू आहे. पण शेती हाही एक उद्योग आहे आणि तोही नियंत्रितपणे चालला पाहिजे याकडे सरकारने जाणीवपूर्वक लक्ष देणे जरूर आहे. वर उल्लेखिलेल्या गोष्टी सरकारने केल्या असल्या, शिवाय उत्तम बी बियाणे, खते, नव्या पद्धती, नवी अवजारे शेतकऱ्यांना पुरविण्याचे धोरण अंमलात आणले असले, शेतकऱ्यांना कुक्कुट-पालन, दुभती जनावरे पाळण यासारखे जोडधंदे मिळवून देण्याचा सरकारचा प्रयत्न असला, सहकारी बँकांमार्फत त्याला कर्जपुरवठा करण्याची सोय सरकारने केली असली तरी या सर्वाला, शेती हा उद्योग म्हणून चालायचा तर एक प्रकारची शिस्त येणे अत्यावश्यक आहे. सरकार करीत असलेल्या वरील सर्व बाबतीत हवे तसे लक्ष सरकारी कर्मचारी घालीत नाहीत ही तर गोष्ट ख ेच; पण त्याहीपेक्षा

स्वतःला पुढारी म्हणविणारी मंडळी—आणि अशा मंडळींचे आज गावोगाव पेव फुटले आहे !—त्यांच्या कामात अनेकवेळा ढवळाढवळ करतात. पक्षीय राजकारण या व्यवहारात घुसवितात. सहकारी बँकांनी शेतकऱ्यांना दिलेली २२ टक्के कर्जे आज बुडीत आहेत आणि उरलेली 'तरती' आहेत असे कागदावर दाखविले जात असले तरी ती तशी नाहीत. जमिनीच्या तारणावरचे कर्ज तरते असले तरी, जमीन-धारक स्वतः गावचा पाटील, सरपंच असला अगर त्याला कुणा वजनदार पुढाऱ्याचा अगर गुंडाचा पाठिंबा असला तर, कर्ज वेळेवारी न भरल्याबद्दल त्याच्या जमिनीचा बँकेला लिलाव करणे शक्य होत नाही. माझ्या ओळखीचे एक इन्स्पेक्टर म्हणाले "अहो, चार चार वेळा लिलावाच्या तारखा लावूनही, कुणी लिलाव बोलायला पुढेच येत नाही !" सोन्याची अंडी देणारी कोंबडी मारून खाण्याची ही वृत्ती आमचे पुढारी व समाजसेवकच शेतकऱ्यांना शिकवितात व त्यांतून 'हरित क्रांती'च्या नावाखाली स्वतःचे उखळ पांढरे करून घेतात. राष्ट्रीयीकृत बँकांनी सहकारी बँकांच्या सहकार्याने कृषिउद्योगाची कर्जाची गरज भागवावी अशी अपेक्षा आहे. अशा वेळी सर्व पुढारी मंडळींनी राष्ट्रहित ध्यानी धरून शेतकऱ्याला बँकेत ठेवी कशा ठेवाव्यात, कर्जे कशी घ्यावीत, ती वेळच्यावेळी कशी फेडावीत या संबंधीचा सल्ला दिला पाहिजे. 'सावकारांची कर्जे देऊ नका, कर भरू नका' असे एकेकाळी हीच मंडळी शेतकऱ्यांना सांगत होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी तोच प्रयोग सहकारी बँकांवरही केला ! हे थांबले पाहिजे.

बँकांचा व्यवहार ठेवीदारांच्या विश्वासावर चालतो. तो विश्वास त्यांनी गमावू नये म्हणून त्यांनी दिलेली कर्जे तरती हवीत. योग्य वेळी ती फेडली गेली पाहिजेत. योग्य तारणे उपलब्ध झाली पाहिजेत. शेतकऱ्यांना कर्ज—पुरवठा कसा करायचा याचे तंत्र बसविले गेले पाहिजे; नाहीतर व्यापारी बँकांच्या सहकारी बँका होतील !

आता भारतातील मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले असल्याने आता बँक-व्यवहारात एक प्रकारचा सुसूत्रपणा व एकता आणणे सुलभ झाले आहे. त्यामुळे बँक—व्यवहाराची कक्षा अणि वेगही वाढविणे शक्य होईल. प्रत्येक राष्ट्रीयीकृत बँकेचे 'संघटन व पद्धती' विभाग आज अस्तित्वात आहेत. संघटनाचा व बँक पद्धतींचा बराच अनुभव त्यांच्या गाठी जमा आहे; पण त्याला नवी दिशा दाखविणे आणि नव्या पद्धती अवलंबिण्याच्या दृष्टीने नेट लावणे जरुर आहे. एकूण बँक-उद्योगाच्या समस्या सोडवायच्या दृष्टीने आता संघटनाला आणि या पद्धतींना नवा अर्थ आला आहे. भारताच्या रिझर्व्ह बँकेने आणि स्टेट बँकेने पुढाकार घेऊन बँकांचे व्यवहार, खर्चात कपात, कामातील द्विरुक्ती यादृष्टीने एकसूत्र करून मार्गी लावले पाहिजेत. कागदांचे ढीग साचवण्याच्या सरकारी पद्धती बँक-व्यवहारात घुसता नयेत याची दक्षता घेतली पाहिजे. स्टेट बँक अस्तित्वात येऊन १४ वर्षे झाली, तिच्या शाखा चारशेच्या बाविसशे झाल्या; पण सामान्य शेतकऱ्यांना पतपुरवठा

होण्याच्या पद्धती तिने अजूनही अस्तित्वात आणल्या नाहीत ही गोष्ट स्पृहणीय नाही.

भारतातील मोठमोठ्या शहरात अनेक बँकांच्या शाखा उघडल्या आहेत पण बँका नसलेले कितीतरी क्षेत्र आता बँक व्यवहाराखाली आणायचे आहे. त्या दृष्टीने शहरात केंद्रीत झालेल्या या शाखा शक्य तितक्या लवकर देशभर पसरून देणे, नव्या शाखा उघडणे, मोठ्या शाखांच्या व्यवहारात अचूकपणा आणण्याच्या दृष्टीने योग्य त्या यंत्रांची जोड कर्मचाऱ्यांच्या हातात देणे, बँक कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाची आहे ती सोय सुसूत्र करणे, नवी केंद्रे उघडणे, बँक व्यवस्थापनाच्या अद्यावत् पद्धती सर्व बँकांच्या कामकाजात आणणे आणि संचालक आणि कर्मचारी यांच्यातील सहकार्याची भावना राष्ट्रहिताच्या दृष्टीने दृढमूल करणे अशा कितीतरी गोष्टी पुढील चार दोन वर्षात प्रत्यक्षात उतरल्या पाहिजेत. **समस्या गळ्याशी लागली की मग ती सोडवायचा विचार करायचा ही आजवरची सरकारी पद्धती आता बदलली पाहिजे. रिझर्व्ह बँकेने व स्टेट बँकेने, त्या त्या समस्यांचा अभ्यास करून वेळीच योग्य त्या गोष्टी केल्या पाहिजेत.**

या झाल्या थोड्या कालात व्हाव्यात अशा गोष्टी.

राष्ट्रीयीकृत बँक व्यवसायाची घडण कशी असावी ही समस्या त्या दृष्टीने दीर्घ मुदतीचीच. ती सोडविणे कठीण तर आहेच; पण शिवाय हा प्रश्न गुंतागुंतीचा-ही आहे. तो आज नॅशनल क्रेडिट कौन्सिलच्या विचाराधीन आहे. बँक कमिशनलाही त्यावर साधक बाधक विचार करून निर्णय घ्यावा लागेल. आज सरकारने राष्ट्रीयीकृत १४ बँकांचे वेगळे अस्तित्व कायम ठेवले आहे.

या देशाचा अफाट विस्तार, विविध प्रदेशात निरनिराळ्या बँकांचे असलेले वर्चस्व, आणि त्या प्रदेशांची त्यांनी धंद्याच्या दृष्टीने पाहिलेली सोय विचारात घेऊन आणि १४ वर्षांच्या काळातही स्टेट बँकेत विलीन केलेल्या इतर आठ बँकांना पूर्णपणे पचविणे स्टेट बँकेला अजून जमलेले नाही. हा अनुभव जमेस धरून या बाबतीत पावले टाकणे जरूरीचे आहे. सरकारने आणि रिझर्व्ह बँकेने या बाबतच्या समस्यांची महत्त्वानुसारी मांडणी करून एकेक समस्या उलगडीत गेले पाहिजे. फ्रेंच अगर इटालियन पद्धतीवर या बँका चालवाव्यात की प्रादेशिक आर्थिक परिस्थिती, औद्योगिक प्रगती विचारात घेऊन देशाचे चार वा सहा विभाग पाडून त्या त्या विभागाकरता एकेक बँक कॉर्पोरेशन स्थापन करून व परदेशीय शाखांसाठी एक आयात-निर्यात बँक स्थापन करून हा प्रश्न सोडवावा अशा सारख्या कल्पनांवर अधिक विचार होणे जरूर आहे.

पण हे सारे करताना बँक-व्यवसायाच्या वाढीला धोका पोचेल असे काहीही करता कामा नये. राष्ट्रीयीकरण घिसाडघाईने झाले असो वा नसो, आता निर्माण होणारी

व्यवस्था विचारपूर्वक सुविहीत ठरली पाहिजे. राष्टीयीकृत बँकांमध्येही सेवेची व कार्यक्षमतेची सुदृढ स्पर्धा कायम राहाणे योग्य वाटते. त्या दृष्टीने जी व्यवस्था ठरेल त्या त्या बँकेच्या अगर कार्पोरेशनच्या संचालक मंडळाला आपापल्या भागात नवनवीन गोष्टी करण्याची, नवी क्षितिजे गाठण्याची, अधिक कार्यक्षमता दाखविण्याची संधी आणि योग्य ते कार्य-स्वातंत्र्य दिले गेले पाहिजे. बँकांच्या व्यवहारांचे सरकारीकरण होता नये. लाल फीत, लांचलुचपत, वशिलेबाजी, 'पुढारी' मंडळींची ढवळाढवळ या गोष्टींना बँक-क्षेत्रांत थारा मिळता कामा नये.

ठेवी-विमा महामंडळाचे कार्य आता संपुष्टात आले आहे. त्यामुळे त्या मंडळाचे 'कर्ज परत फेड' महामंडळात रूपांतर करावे, ही सूचना फार चांगली आहे. तिचा विचार होणे जरूर आहे.

बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले म्हणजे सारे काही आपोआप सुरळीतपणे चालेल अशा भावडया समजुतीखाली राहून आता चालणार नाही. किंबहुना बँकांचे राष्ट्रीयीकरण देशहिताच्या दृष्टीने राबविणे हे सरकारला व भारतीय जनतेला मिळालेले एक नवे आव्हान आहे. त्यात आम्ही कमी पडता नये.

□ □ □


## पुरंदऱ्यांची नौबत

बुलंद बुरूज / हूल / कोजागिरीची रात्र / पंत
फोंडा! फोंडा! / नावजी बलकवडे
पिऱ्या बेरड / इमान

आठ शिवकालीन कथा

ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन

## पिंजारी

नोटबुकाच्या निळचा किनारी
लपेटलेला अनभिज्ञ हात !
शब्दांचा आर्जवी किणकिणाट
" स्वाक्षरीसह संदेश हवाच !"
संदेश ! संदेश ! संदेश—
" काहीतरी भव्य ध्येय बाळगा !"
माझी लेखणी लिहून गेली.
स्वतःलाच अंतर्मुख करणारा संदेश !
निळचा कव्हरला खिळलेले डोळे
लख्खकन् चमकून गेले.
गवसलेपणाची चमकी पेरून
एक निरागस हास्य फुलून गेले !
हास्य गेले, हात गेला, कव्हर गेले.
संदेश शोधीत माझे मन
वेडचासारखे भटकत राहिले !
" काहीतरी भव्य ध्येय बाळगा !"
कोणते भव्य ध्येय आम्ही बाळगले ?
एक ओंकार स्फोटून उठला —
' हो, आहे एक इच्छा जबरदस्त —
मला एक पिंजारी व्हायचंय मस्त !'
देहाचा धनुष्य, बुद्धीची दांडोरी
हेच ध्येय, हीच सार्थकता जीवनाची !
खटर्रऽऽ फटक, खटर्रऽऽ फटक्
देहाची धनुकली चालावी अथक —
पिंजावा कृष्णकापूस दाटलेला
ढोंगाचा, दांभिकतेचा, अहंपणाचा —
पिंजावी जखडलेली जीर्ण जळमटे
निराशेची, विस्मृतीची, वैफल्याची.
खटर्रऽऽ फटक्, खटर्रऽऽ फटक्
देहाची धनुकली चालावी एकलग !
आता हवा कुणाला संदेश ?
आणा नोटबुक टाकतो पेच !
' एक कसबी पिंजारी व्हा !'
(नाहीतर नियतीच टाकील पिंजून —
या प्राचीन देशाच्या अस्थी !)
" व्हा, होऊ एक कसबी पिंजारी "
समाजजीवनातील कृष्णकापूस —
पिंजून टाकील ती — तीच लेखणी
खरी !!

— शिवाजी सावन्त

## आस्वाद

एका नित्यपरिचित प्रसंगातून स्फुरलेला एक विलक्षण विचार शिवाजी सावंत यांनी 'पिंजारी' या कल्पनेतून व्यक्त केला आहे. व्याख्यात्यांना संदेशाची विनवणी करणारा शब्दांचा आर्जवी किणकिणाट नेहमीच अनुभवावा लागतो. काहीतरी उदात्त (वेळेपुरता) संदेश देऊन त्याचे निरागस समाधान करता येते, केले जाते. पण या कवितेतला कवी त्या वेळी अंतर्मुख झालेला आहे. स्वतःच्या ध्येयाचा स्फोटक शोध घेतो आहे आणि ते ध्येय गवसते त्याला एका पिंजाऱ्याच्या विलक्षण रूपात ! देहाची धनुकली आणि बुद्धीची दांडोरी करून ढोंगाचा, दांभिकतेचा, अहंपणाचा काळा कापूस तन्मयतेने पिंजून काढणारा पिंजारी. असा पिंजारी त्याला व्हायचे आहे. समाजाच्या जीवनातील काळा कापूस पिंजून टाकणें हेच लेखणीचे कर्तव्य आणि कर्तृत्व आहे असे त्याला ठामपणे वाटते. तेच त्याचे ध्येय बनते. नवीन प्रतीक आणि जीवनाविषयी, साहित्याविषयी ध्येयवादी दृष्टी ही या कवितेची वैशिष्टचे.

— रसिक

# अपेशी जीवन

गो. ल. लिमये

सर्वसाधारण समजुतीप्रमाणे खुनाचा तपास अवघड व गुंतागुंतीचा असावा, असे लोकांना वाटते; परंतु वस्तुस्थिती तशी नसून बहुतेक खुनांचे तपास तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यास सुरळीत वाटतात व तपासही लौकर होऊ शकतो. गुन्हा करण्याचा हेतू किंवा कारण, गुन्हा करणाऱ्याबद्दलचा अंदाज, गुन्ह्यात वापरलेले शस्त्र किंवा आयुधे वगैरे गोष्टी खुनाच्या शोधास मार्गदर्शक ठरतात. वासावरून किंवा काडचाच्या पेटीतील काडीवरून गुन्हेगार चकणा कारकून असावा, त्याला सहा मुले असावीत, तो फोर्ड मोटारगाडी वापरीत असावा असे सांगणारा रहस्यमय कथा-कादंबरीतील गुप्तपोलीसच असू शकतो. खऱ्या गुप्त-पोलिसास मेहनत, सतत प्रयत्न, अखंड चिकाटी व व्यावहारिक ज्ञान याचीच मुख्यत: आवश्यकता असते आणि एवढ्या भांडवलावरच दहापैकी नऊ गुन्ह्यांच्या तपासात यश मिळू शकते. विल्टशायरच्या चीफ कॉन्स्टेबलच्या विनंतीवरून स्कॉटलंडयार्डचे सर रिचर्ड मेन यांनी इन्स्पेक्टर जोनाथम व्हिचर यांस नुकत्याच घडलेल्या एका भयंकर खुनाच्या तपासासाठी फ्रोम नावाच्या खेड्यास जाण्यास हुकूम दिला. त्या वेळी त्यांना त्याबद्दल विशेष काही वाटले नाही. ते उन्हाळ्याचे दिवस होते. लंडनच्या कोंदट व गरम वातावरणातून इंग्लंडच्या पश्चिम भागात जाण्यास इन्स्पेक्टर खूष होते. तपासात सर्व काही अनुकूल घडून आले तर काही दिवसांतच खुनाचा शोध लावून त्याला आपल्या पूर्वीच्या सुयशात भर टाकता येणार होती.

इन्स्पेक्टर व्हिचर यांनी आपला रेल्वेचा प्रवास पहिल्या वर्गाच्या उबदार मऊ गादीवर बसून त्यांना मिळालेल्या गुन्ह्याबद्दलच्या हकिकतीची जुळवाजुळव करण्यात घालविला. वरवर पाहता घडलेला गुन्हा सरळ दिसत होता. कौंटी पोलिसांना तपासात काही अडचणी आल्या असाव्यात, परंतु व्हिचरसारख्या गुप्तखात्याच्या हुकमी एक्क्यास त्यात काहीच अडचण दिसत नव्हती. खेडवळ पोलिसांची हुशारी ती केवढी असणार ! तपासात होणारी पुढील गुंतागुंती व यातायात यांची व्हिचर यांना काय कल्पना ? याची त्यांना थोडी जरी अंधुक कल्पना किंवा सूचना मिळाली असती तरी ते आजारी असल्याचे किंवा इतर कोणतीही सबब सांगून परत फिरले असते. त्यांना त्याबाबत कोणी दोषही दिला नसता. दुर्दैवाने

त्या दिवसाचे त्यांचे रेल्वेचे प्रयाण त्यांच्या नोकरीतील तोपर्यंत मिळालेल्या यशाच्या न्हामाची नांदीच ठरली, असे म्हणावे लागेल.



गुन्ह्याची हकीकत थोडोशी भानगडांची वाटत असली तरी व्हिचरने ह्यापेक्षाही अधिक गुंतागुंतीच्या खुनाच्या तपासांत यश मिळविले होते. एका लहान चार साडेचार वर्षांच्या मुलाचे प्रेत एका कानापासून दुसऱ्या कानापर्यंत गळा कापून घराबाहेर संडासच्या डब्यात टाकण्यात आले होते. पूर्वी खेडयापाडयांतून अशाच प्रकारचे संडास असत. दागिन्यांसाठी किंवा दुष्टाव्याने लहान मुलांचे खून केले जातात. इन्शुअरन्स कंपन्यांना बुडवून विम्याचे पैसे मिळविण्यासाठीही निर्दयपणे बालहत्या घडून येतात. परंतु फ्रान्सिस केंटच्या खुनाच्या बाबतीत काही अशा बाबी होत्या की, त्यामुळे विल्टशायर पोलीसांची मती गुंग झाली होती. हा गुन्हा घडण्यास सबळ असे कोणतेही कारण दिसून येत नव्हते. मुलाला मारल्याने कुणालाही फायदा होणार नव्हता व ज्यांना हा गुन्हा करणे शक्य होते ते गुन्ह्याच्या वेळी गैरहजर असल्याबद्दल साधार सिद्ध करू शकत होते. ह्यामुळे ह्या गुन्ह्याच्या तपासासाठी अनुभवी पोलीस अधिकाऱ्याची आवश्यकता भासली होती. विल्टशायरचे चीफ् कॉन्स्टेबल हा तपास स्कॉटलंडयार्डकडे देण्यास थम नाखूष होते. परंतु तपासात दिरंगाई होऊ लागली. गुन्हेगारासंबंधी काहीही निष्पन्न होऊ न शकल्याने कुणासही अटक करून खटला कोर्टात पाठविता येईना. वर्तमानपत्रांतून टीकेची झोड सुरू झाली. लंडन पोलिसांना ह्याची नेहमीचीच सवय होती. ह्याच कारणामुळे इन्स्पेक्टर व्हिचर ता. १६ जुलै १८६० रोजी ग्रेटवेस्टर्नच्या गाडीत चढले.

फ्रोमला ते दुपारी पोहोचले. स्थानिक पोलिसांबरोबर विचारविनिमय करून त्यांनी गुन्ह्याचा तपास हाती घेतला. स्थानिक पोलिसांनी व्हिचर यांच्या आगमनाबद्दल उघड रीतीने आनंद व्यक्त केला व त्यांच्याजवळ असलेली गुन्ह्यासंबंधाची सर्व माहिती त्यांना पुरविली. गुप्तचर खात्याच्या तपासाकडे ते कुतूहलाने

व विश्वासाने पाहत होते. तपास लगेच पूर्ण होईल, असे त्यांना वाटले. परंतु तपासाचे काम बराच काळ लांबत चालले.

मि. एडवर्ड केंट यांचा वाडा प्रशस्त होता. गुन्ह्याच्या रात्री घरात बारा मंडळी होती. मि. केंट व त्यांच्या पत्नी एका खोलीत झोपले होते. त्याच खोलीत एका कॉटवर त्यांची पाच वर्षांची एक मुलगी झोपली होती, दुसऱ्या खोलीत त्यांच्या एकोणवीस व वीस वर्षे वयाच्या दोन मुली झोपल्या होत्या. सोळा वर्षांची दुसरी एक मुलगी एका स्वतंत्र खोलीत झोपली होती. तिच्या भावालाही अशीच एक स्वतंत्र खोली मिळाली होती. घरातील मोलकरणीला व स्वयंपाकिणीला स्वतंत्र खोली नव्हती. फ्रान्सिस, त्याची दोन वर्षांची बहीण व त्यांची एलिझाबेथ गॉफ या नावाची तरुण आया नर्सरीमध्ये झोपल्या होत्या.

ता. ३० जूनच्या शनिवारी पहाटे पाच वाजता एलिझाबेथला जाग आली. अर्धवट निद्रितावस्थेत तिने फ्रान्सिसची कॉट मोकळी पाहिली. याबद्दल तिला काही विशेष वाटले नाही. नेहमीप्रमाणे फ्रान्सिसच्या आईने त्याला आपल्या खोलीत नेले असावे, असे वाटले. सकाळी ७–३० वाजता ती केंटबाईंच्या खोलीत गेली. तिथेही फ्रान्सिस दिसला नाही. तेव्हा ती घाबरली. मुलाचा शोध सुरू झाला. एका तासाने फ्रान्सिचा मृत देह घरापासून २६ फूट अंतरावर संडासाच्या डब्यात पडलेला दिसला. त्याला भयंकर जखमा झालेल्या दिसल्या. दुर्दैवी बालकाला त्या घाणेरड्या जागेवरून तात्काळ हलविण्यात आले व तसे पोलिसांना कळविण्यात आले. ही अनपेक्षित घटना श्री. केंटसारख्या घरंदाज व प्रतिष्ठित इसमास क्लेश-कारक वाटत होती. पोलिसांनी आमचे काम फार समजूतदारपणाने व सहानुभूती दाखवून हाताळले. परंतु इन्स्पेक्टर व्हिचर येईपर्यंत तपासात काहीच प्रगती झाली नव्हती. पुढील यशापयश आता व्हिचरवर अवलंबून होते.

व्हिचर आपल्या कामात फार व्यवस्थित होते. प्रथम त्यांनी सर्व संबंधित लोकांच्या पूर्वेतिहासाची माहिती मिळविली. त्यात पुष्कळ गुंतागुंत होती. घरचा प्रमुख श्री. एडवर्ड केंट यांचा राजघराण्याशी संबंध होता. ते व्हिक्टोरिया राणीचे वडील केंटचे ड्यूक यांचे अनौरस पुत्र असल्याची वदंता होती. वेगवेगळ्या क्षेत्रांत जुजबी कामे केल्यावर त्यांना त्यांच्या वशिल्याच्या जोरावर राणी सरकारच्या फॅक्टरी इन्स्पेक्टरच्या जागेवर नेमण्यात आले होते. काम विशेष जबाबदारीचे नव्हते. वार्षिक एक हजार पौंड पगारही मिळे. याशिवाय त्यांना इतर प्राप्तीही होती. त्यामुळे त्यांना त्यांचा वाढता संसार सुखासमाधानाने चालविता येत होता.

श्री. केंट यांना पहिल्या बायकोपासून चार मुले होती. तिच्या मृत्यूनंतर त्यांनी त्या वेळच्या प्रथेप्रमाणे एका तरुण गव्हर्नेसबरोबर विवाह केला. दुसऱ्या पत्नी-पासूनही त्यांना संतती होती. गुन्हा घडला त्या वेळेस तिला तीन मुले होती व चौथ्याच्या आगमनाची लक्षणे दिसत होती.

इन्स्पेक्टर व्हिचरनी तपासाचे काम जोरात सुरू केले. श्री. केंटबद्दल त्यांच्या कानांवर लोकांकडन व वर्तमानपत्रांमधून त्यांनीच मुलाचा खून केला असावा, अशा बातम्या येऊ लागल्या. या बातम्यांचा घोळात न सापडता त्यांनी आमच्या तपासाच्या दिशेची चटकन निश्चिती केली. केंट यांच्या सोळा वर्षांच्या कान्स्टन्स केंट या मुलीनेच गुन्हा केला असावा, अशी त्यांची खात्री झाली. ह्या मुलीचा रात्री वापरण्यात येणारा झगा मिळून येत नव्हता. ह्यावरून त्यांचे गुप्तहेरी विचारचक्र सुरू होते. ह्याच आधारावर त्यांनी स्थानिक न्यायाधीशांकडे संशयित मुलीला अटक करण्यासाठी ता. १८ जुलैला परवानगी मागितली. अर्जातील मजकूर वाचून न्यायाधीशांना धक्काच बसला! त्यांनी अर्ज मंजूर करण्यास नापसंती दाखविली. मागील शतकात सामाजिक भेदाभेद ठळक रीतीने दिसून येत. राजघराण्याशी निकटचा धागा असलेले श्री. केंट त्यांच्या परगण्यात एक प्रतिष्ठित असामी होते. अशा मोठ्या माणसाच्या सुकुमार व मानी तरुण कन्येस तुरुंगात धाडणे न्यायाधीशांना अवघड वाटू लागले. त्यांना आपले म्हणणे पटवून देऊन वॉरंट मिळविण्यास इन्स्पेक्टरना पाच सहा तास घालवावे लागले. कोर्टातील एका न्यायाधीशांनी व्हिचर यांना स्पष्ट शब्दांत सूचित केले की ते यामुळे आपले नुकसान करून घेणार आहेत. परंतु इन्स्पेक्टर श्री. व्हिचर यांनी आपले म्हणणे सोडले नाही. कुमारी कान्स्टन्सही आपण निरपराधी असल्याचे सांगत असतानाही तिला तुरुंगात रवाना करण्यात आले. आता इन्स्पेक्टरना ताबडतोब पुढील तपासाची व्यवस्था करणे भाग होते. वेळ अगदी थोडा होता. आठवड्याच्या आत त्यांना वरच्या कोर्टात खटला पाठविण्यास पुरेसा असा खात्रीलायक पुरावा मिळविणे आवश्यक होते. नाहीतर आधीच नाखूष असलेले न्यायाधीश मुलीला सोडून देणार हे निश्चित होते. मुलीनेच गुन्हा केला असला पाहिजे, याबद्दल व्हिचर यांची खात्री झाली होती. त्यामुळे याबद्दलचा खात्रीलायक पुरावा मिळविण्यास कसोशीने प्रयत्न करणे जरूरीचे होते. त्यांना एकट्याला हे काम झेपेल असे वाटेना म्हणून त्यांनी आपल्या वरिष्ठांना ता. २३ जुलैला त्यांच्याकडील हुशार समजल्या जाणाऱ्या सार्जंट विलियमसन् यांस मदतनीस म्हणून पाठविण्यास तार केली. डॉली विलियमसन् दोन दिवसांतच मदतीस आला.

यानंतरच्या आठ्ठेचाळीस तासांत व्हिचर किंवा त्यांच्या मदतनीसाला जेवणाखाण्यास किंवा झोपण्यास एका क्षणाचीही फुरसत मिळाली नाही. अदृश्य झालेल्या झग्यासाठी सगळा वाडा उलथा पालथा घालण्यात आला. प्रत्येक कानाकोपरा कसोशीने तपासण्यात आला; परंतु पाहिजे असलेला झगा मिळू शकला नाही. ह्या झग्यावर रक्ताचे डाग असावेत ह्याबद्दल इन्स्पेक्टरांची खात्री होती. व्हिचरची सर्व मदार याच पुराव्यावर होती. उरलेले त्यांचे म्हणणे अंदाजावरच आधारीत होते. इन्स्पेक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे कान्स्टन्सला तिच्या सावत्र आईबद्दल असूया वाटत

होती. त्यांचे संबंध चांगले नव्हते; त्यामुळेच तिने आपल्या सावत्र भावाचा खून केला होता.

न्यायाधीशांसमोर आठ दिवसांनी केसची पुन्हा सुनावणी झाली. निकाल देण्यास त्यांना अवघी वीस मिनिटे लागली. मिस् कान्स्टन्सवर खुनाचा आरोप शाबीत करण्याकरिता आवश्यक इतकाही पुरावा कोर्टापुढे न आल्याने त्यांनी तिला तावडतोब तिच्या वडिलांनी दिलेल्या २०० पौंडांच्या जामिनावर व परत जरूर पडल्यास हजर करण्याच्या करारावर सोडून दिले. ह्याचा उघड अर्थ ती निर्दोष असावी, असाच लोकांचा समज झाला.

इन्स्पेक्टर व्हिचर यांच्यावर चोहोकडून टीकेचे वादळ उठले. एकूणएक सर्व वर्तमानपत्रे त्यांच्यावर तुटून पडली. त्यांच्या मूर्खपणाबद्दल, नालायकीबद्दल, तपासणीच्या जुन्या बुरसट विचारसणीबद्दल पाहिजे ते वेडेवाकडे लिहिले जाऊ लागले. प्रत्येक लिखाणाचा सूर एका निष्पाप बालिकेला बुद्धिभ्रंश झालेल्या चक्रम पोलिस अधिकाऱ्याने पुरावा नसताना पकडले, असा होता. बचावासाठी दिलेल्या वकिलांनी मांडलेल्या बाजूवरच विश्वास ठेऊन सर्वांनी पोलिसांवर गिल्ला सुरू केला होता. "न्यायाधीश महाराज, आपल्यासमोर एखाद्या साध्या भुरट्या चोराप्रमाणे तरुण निष्पाप बालिकेस पोलिसांनी तिच्या घरातून आईबापापासून खेचून आणले आहे," "ही लाजिरवाणी व नालायकीची गोष्ट," "मतिमंद अधिकाऱ्याचा उथळ आरोप" अशा अनेक रीतींनी व्हिचर यांची क्रूर, कठोर, दुर्गुणी, मत्सरी अशा जळजळीत शब्दात हेटाळणी करण्यात आली. व्हिचर यांची परिस्थिती मात्र फार केविलवाणी झाली. काही वर्षांनी त्यांच्या एका पोलिस मित्राने पूर्वीची ह्याबाबतची आठवण नमूद केली आहे. "त्या वेळी व्हिचर यांना वर्तमानपत्रांतील बातम्या वाचताना एखाद्या आघात झालेल्या माणसाप्रमाणे वाटत असे" व्हिचर यांच्या वरिष्ठांनीसुद्धा वर्तमानपत्रातील टीका कटू व संतप्त मनाने वाचली. अंदाजे तीस वर्षेपर्यंत सर रिचर्ड मेन यांनी लंडन पोलिसांची शान तनमन वेचून राखली होती आणि आता एका कालच्या पोरीने त्यांनी संबंध आयुष्यभर केलेली मेहनत एका रात्रीत धुळीस मिळविली होती.

मेनसाहेबांचे वर्तन मनमिळाऊ असल्याचे जरी दिसत नसले तरी ते उदार मनाचे होते. केंट केसच्या निकालानंतर त्यांना संबंधित पोलिस अधिकाऱ्यांची खर्डी करणे सोपे होते. त्यांतल्या त्यांत इन्स्पेक्टर व्हिचरना नेस्तनाबूत करणे फारच सोपे होते. मेनसाहेबांनी त्यांच्या सबंध कारकीर्दीत आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांना कधीच अधांतरी सोडले नाही. व्हिचर यांच्यावरील त्यांचा विश्वास या केसने यत्किंचितही ढळला नाही व त्यांनी त्यांना तसे आश्वासनही दिले होते. तरी बिचाऱ्यांना पूर्वीप्रमाणे आत्मविश्वासाने काम करणे अवघड वाटत होते. त्यांची सारी हिंमतच खचली होती. त्यांच्यासारख्या धैर्यवान व चिकाटीने काम करणाऱ्या

अधिकाऱ्याच्या कामातील जोशच नाहीसा झाला होता. कान्स्टन्स केंटनेच खून केला असल्याबद्दल त्यांना अजूनही खात्री वाटत होती; पण त्यांच्या ह्या वाटण्याचा आता काही एक उपयोग नव्हता.

नेहमीच्या अनुभवाप्रमाणे पोलिसांविरुद्ध उठलेले हे वादळ काही महिन्यांतच शांत झाले. जनतेची आठवण अशीच चंचल व क्षणिक असते. मेनसाहेबांनी गुप्त-पोलिस विभागात थोडासा फेरफार केला व प्रत्येक गुन्ह्यातील कागदपत्र स्वतःच्या नजरेखाली घालण्याचे ठरविले. त्यानंतरच्या काही गुन्ह्यांत तपास लौकर होऊन गुन्हे शाबीत झाल्याने पोलिसांविरुद्धचे वातावरण चांगले निवळले होते. परंतु आठदहा महिन्यांत पोलिसांविरुद्ध पुन्हा एक वावटळ उठली आणि दुर्दैवाने इन्स्पेक्टर व्हिचरच जनतेच्या रागास कारणीभूत झाले.

१८६१ साली, सरे परगण्यातील किंगस्वुड या गावी तिथल्या चर्चमध्ये काम करणाऱ्या एका कारकुनाची बायको श्रीमती हॉलिडे चर्चच्या आवारातील आपल्या घरातील खोलीत बिछान्यात मरून पडलेली आढळून आली. त्या रात्री चर्चचे रेक्टर व त्यांची मंडळी सुटीनिमित्त बाहेरगावी गेली होती. बाईला चोरट्यांनी ता. ९ व १० जूनला रात्रीच्या दरम्यान तोंडात बोळा कोंबून मारले होते. चोरण्यासारखे काही हाती न लागल्याने बाईस मृतावस्थेत सोडून चोरटे पळून गेले असावेत.

सरेच्या पोलिस प्रमुखांना ह्या गुन्ह्यात बाहेरच्या गुन्हेगारांचा हात असावा, असा संशय आल्याने त्यांनी गुन्ह्याचा तपास स्कॉटलंड यार्डने हाती घ्यावा म्हणून विनंती केली. इन्स्पेक्टर व्हिचर व सार्जंट रॉबिन्सन तपासासाठी आले. मेनसाहेबांना कदाचित व्हिचर यांच्यावरील आपला विश्वास प्रकट करावयाचा विचार असावा व ही गोष्ट खात्याच्या दृष्टीने फारच चांगली होती.

वरवर पाहता ह्या केसमध्ये कोणतीही कठीण समस्या नव्हती. हॉलिडेबाईच्या गादीखाली एक पैशाचे पाकीट सापडले होते. त्या पाकिटामध्ये जोहान कार्ल फ्रान्झ नावाच्या इसमाचे खाजगी कागदपत्र व एका गायिकेचे पत्र होते. आता पाकिटाच्या मालकाला शोधून काढणे एवढेच महत्त्वाचे काम होते. ता. १३ जून रोजी फिरतीवर असलेल्या एका पोलिसाने एका भटक्या जर्मन इसमास पकडले. त्याने तपासात निष्पन्न झालेल्या इसमाचेच नाव सांगितले. परंतु आपला किंगसवुडच्या खुनामध्ये हात नसल्याचे त्याने सांगितले.

व्हिचरना वाटले खरा गुन्हेगार सापडला. फ्रान्झवर खुनाचा आरोप ठेवण्यात आला व त्याचा सविस्तर जबाब घेतला गेला. जबाबात त्याने आपण दुसऱ्या दोन जर्मन इसमांबरोबर इंग्लंडमध्ये आल्याचे सांगितले. त्याच्याबरोबर आलेल्या एका जर्मनाचे नाव अॅडॉल्फ कोहन् होते. तिघा जर्मनांचे पैशाच्या देवघेवीवरून भांडण झाले व ते अलग झाले. दोन्ही सहकारी निघून गेल्यावर फ्रान्झला आपले पाकीट नाहीसे झाल्याचे दिसले. त्याच्या मित्रांपैकी एकाने त्याचे पाकिट व कागदपत्र नेले

असावे. त्याचे कागदपत्र जवळ नसल्याने त्याला कुणीही कामधंदा देईना. किंग्सवुड खुनाच्या केसमध्ये आपले नाव निष्पन्न झाल्याचे कळल्याने व पोलीस आपणास पकडतील या भीतीने तो लंडनमध्ये काही दिवस लपून छपून वावरत होता. इंग्लंड सोडून बाहेर पळून जाण्याच्या इरादाने तो जात असताना पोलिसांच्या हाती लागला होता. जबाबात त्याने खुनाशी आपला काहीएक संबंध नसल्याचा निर्वाळा पुन्हा दिला होता.

फ्रान्झची हकीकत कुणाही पोलीस अधिकाऱ्याच्या गळी उतरण्यासारखी नव्हती. व्हिचरसारखा अधिकारी ती खरी कशी मानणार! अशा प्रकारच्या कपोलकल्पित हकीकती त्यांनी अनेकवेळा ऐकल्या होत्या व त्या बहुतेक चौकशीअंती खोट्या असलेल्या आढळून आल्या होत्या. फरान्झला सोडून गेलेले जर्मन कुठे गेले होते ते त्याला माहीत नव्हते. कोहनबरोबरच्या दुसऱ्या जर्मनाचे नावही त्यांना माहीत नव्हते. त्याच्या बरोबरच्या जर्मनांचे जर्मनीतील वास्तव्याबद्दल किंवा ठावठिकाण्याबद्दल त्याला काही सांगता येत नव्हते. फरान्झच्या हकीकतीतील फोलपणा उघड होता. फ्रान्झवर खटला भरला गेला.

व्हिचर यांच्या कमनशिबाने व फ्रान्झच्या सुदैवाने खटल्यातील न मिळणारा साक्षीदार अखेरच्या क्षणी कोर्टात हजर झाला. फ्रान्झच्या कागदपत्रात मिळालेल्या पत्राची लेखिका एक प्रसिद्ध जर्मन गायिका होती. तिने अॅडोल्फ कोहन् नावाच्या आपल्या देशबांधवास गाण्याच्या विषयासंबंधी पत्र पाठविल्याचे कबूल केले. कोर्टासमोरील आरोपी फ्रान्झला तिने कधीही पाहिले नव्हते. ज्यूरीस एवढा पुरावा पुरेसा होता. फ्रान्झच्या जबाबातील हकीकतीस ह्या साक्षीदाराच्या साक्षीमुळे दुजोरा मिळाला आणि फ्रान्झला ताबडतोब सोडण्यात आले. तो लगेच जर्मनीस परतला व पुढे १८७० च्या फ्रान्को-जर्मनीच्या लढाईत मारला गेला. परमेश्वराने त्याची आयुर्मर्यादा ९ वर्षांने वाढविली होती.

पुन्हा वर्तमानपत्रातून व्हिचर यांच्यावर टीकेचा भडिमार सुरू झाला. व्हिचर यांची यापुढील पोलीस खात्यातील कामगिरी इथेच संपुष्टात आली. त्यांना मानसिक रोग जडल्यासारखे झाले आणि ते एकदम खंगून गेले. ऑफिसमधील किरकोळ कामे करीत नोकरीतील उरलेले दिवस ते घालवीत होते. महत्त्वाचे काम किंवा तपास यापुढे त्यांना मिळू शकले नाही. चार वर्षांनंतर त्यांच्याबद्दल गैरसमज दूर होण्याचा प्रसंग आला; पण तोपर्यंत त्यांच्या सर्व आकांक्षा विरून गेल्या होत्या.

सर रिचर्ड यांच्या कारकीर्दीच्या अखेरच्या दिवसांत स्कॉटलंड यार्डच्या कामगिरीबद्दल जनमत निवळले होते. व वर्तमानपत्रांमधून पोलिसांच्या कामाचे कौतुक केले जात होते.

इन्स्पेक्टर व्हिचर यांचे अपयशी जीवन चालू होते. ते जुजबी कामे करीत होते. त्यांचा साहाय्यक सार्जंट विलियमसन् यास बढती मिळून तो इन्स्पेक्टर झाला होता.

व्हिचर पेन्शनवर जाण्याची वाट पाहत होता. मध्येच केव्हातरी कान्स्टन्स केंटच्या खटल्याबद्दल चर्चा होई. कान्स्टन्सनेच खून केला असल्याबद्दल आपली अजून खात्री असल्याचे व्हिचर विलियमसन्‌जवळ बोलून दाखवीत असत.

१८६५ एप्रिल २५ चा दिवस. सर रिचर्ड यांना लंडनच्या मुख्य न्यायाधीशाकडून एक त्रोटक निरोप आला. बोस्ट्रीटमध्ये एक महत्त्वाचा जबाब घेण्यासाठी एखाद्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यास ताबतोब पाठविण्यास न्यायाधीशांनी कळविले होते. कर्मधर्मसंयोगाने त्या वेळी इन्स्पेक्टर विलियमसन् कामावर हजर होता. त्याला ह्या कामगिरीवर पाठविण्यात आले. कोर्टात गेल्याबरोबर त्याला न्यायाधीशांच्या बैठकीत नेण्यात आले. न्यायाधीशांच्या समोर त्या वेळी एक पाद्री, एक संतीण व तोंडावरून ओढणी घेतलेली एक तरुण स्त्री होती.

जास्ती वेळ न घेता मुख्य न्यायाधीशांनी जवळचा एक नोटपेपर बाहेर काढला व समोर उभ्या असलेल्या तरुण स्त्रीस उद्देशून नोटपेपरवरील हस्ताक्षर तिचेच आहे काय व त्यातील सर्व मजकूर, तिने दिलेला कबुली जबाब तिने स्वखुशीने दिला आहे काय, म्हणून विचारले. त्या तरुण स्त्रीने आपल्या तोंडावरील आवरण बाजूस करून शांतपणे 'होय' म्हणून उत्तर दिले. नतर न्यायाधीशसाहेबांनी त्यांच्याजवळील जबाब इन्स्पेक्टर विलियमसन् याजकडे दिला. इन्स्पेक्टरने जबाबातील मजकूर वाचण्यास सुरुवात केली. जबाबातील मजकूर वाचता वाचता त्याला बसलेला आश्चर्याचा धक्का त्याला झाकून ठेवता आला नाही. तो नंतर म्हणाला, "जबाब वाचून मला कल्पनातीत आश्चर्य वाटलं व माझ्या मनात पहिलाच विचार इन्स्पेक्टर व्हिचर यांबद्दल आला.त्यांच्यावर झालेला अन्याय व अपमान यांचं आतातरी परिमार्जन होईल. केंट खुनाच्या केसमधील व्हिचर यांचा अंदाजच बरोबर होता." न्यायाधीशासमोर आलेली तरुण स्त्री कान्स्टन्स केंट हिने आपल्या कबुली जबाबात पूर्ण हकीकत निवेदन केली होती. त्यातील मजकूर असा होता, "मी कान्स्टन्स एमिली केंट स्वतः कुणाचीही मदत न घेता ता. २९ जून १८६२ रोजी रात्री विल्टशायरमधील. रोडहिल बंगल्यात फ्रान्सिस् केंटचा खून केला. त्यापूर्वी माझा उद्देश किंवा गुन्हा कुणासही माहीत नव्हता. गुन्हा करण्यात मला कुणीही मदत केली नाही किंवा गुन्ह्यातून बचावण्यास कुणाची मदत नव्हती."

कान्स्टन्स केंटला ताबडतोब विल्टशायरमधील तुरुंगात पाठविण्यात आले व तिला तिथल्या कोर्टासमोर पोलिसांनी रीतसर हजर केले. इन्स्पेक्टर व्हिचर यांची साक्ष निघाली. त्यांनी आपला जबाब शांतपणे दिला. पूर्वी झालेल्या अपमानाचे यत्किंचितही प्रदर्शन न करता साक्ष दिल्याबद्दल वर्तमानपत्रांतून छापून आले. जेव्हा कोर्टापुढे आरोपीचा कबुलीजबाब वाचून दाखविला गेला, तेव्हा ती एकदम ओक्साबोक्सी रडू लागली.

तिचा खटला वरिष्ठ कोर्टात सुनावणीसाठी गेला. तिच्या बचावासाठी कुणीही


नव्हते. त्यामुळे काही मिनिटांतच खटल्याचा निकाल लागला. १८६५ च्या टाईम्स-मधे या केसच्या निकालाबद्दल आलेली हकीकत वाचनीय आहे.

न्यायाधीश विलीस यांनी डोक्यावर काळी टोपी चढवून ते गंभीर आवाजात म्हणाले, " समोर आलेला पुरावा वाचून व तू तीन वेळा दिलेल्या कबुलीजबाबा-वरून तुझी कैफियत दोषी माणसाचीच कैफियत असल्याबद्दल मला काहीही संदेह वाटत नाही. तुझ्या मत्सराला व रागाच्या मनोविकारांना तू तुझ्या हृदयात वाढू दिलेस व अखेरला त्या विकारांनी तुला पापी सैतानाच्या हवाली केलं." (येथे न्यायाधीशांना गहीवर येऊन त्यांच्या तोंडातून शब्द अडखळत येऊ लागले.) आरोपीही भावनावश होऊन तोंड मागे वळवून स्फुंदू लागली- न्यायमूर्तींनी आवेग आवरून थोड्या वेळाने कायद्याने सांगितलेली शिक्षा फर्माविली. आरोपी थोडा वेळ स्तब्ध उभी राहिली व तिने आपल्या तोंडावर ओढणी घेतली. तिला लगेच कोर्टा-बाहेर नेले गेले.

इतक्या वर्षांनी तिने गुन्हा का कबूल केला असावा ? कदचित तिच्या मनावर धार्मिक विचारांचे दडपण सतत आल्याने तिला आपण केलेला अपराध जास्त दिवस सहन करता आला नाही. ह्या परिस्थितीत ती ब्रायटनच्या एका पाद्र्यासमोर हजर झाली. त्याच्या उपदेशावरून त्याच्यापुढे तिने आपले मन मोकळे केले. गुन्हा घडते-वेळी तिचे वय कोवळे होते ही गोष्ट विचारात घेऊन फाशी ऐवजी तिला तुरुंगात वीस वर्षे काढावी लागली. १८८५ साली तुरुंगातून सुटका झाल्यावर ती अमेरिकेस गेली. तिथे सानफ्रान्सिस्को येथील एका वकिलाबरोबर तिने विवाह केला. त्यानंत-रची माहिती मिळत नाही.

इन्स्पेक्टर व्हिचर यांच्या निःस्पृह वागणुकीबद्दल किंवा केंट खून खटल्यात त्यांनी अचूक अंदाजाने गुन्हेगारास शोधून दाखविलेल्या कौशल्याबद्दल वर्तमानपत्रांनी एका शब्दानेही नामनिर्देश केला नाही. खटल्यातील त्यांच्या साक्षीबद्दल वर्तमानपत्रातून वार्ताहरांनी सपूर्ण वृत्तांत दिला. परतु पाच वर्षांपूर्वीच्या घटनेबद्दल काहीही निर्देश केला गेला नाही. केंट खुनाच्या प्रकरणात जर कुणाचा फायदा झाला असेल तर तो एडवर्ड केंट यांचा. सन १८६६ मध्ये त्यांच्या बद्दलची सहानुभूती इतकी शिगेला पोहोचली होती की, त्यांना लोकांनी सार्वजनिक वर्गणी गोळा करून ३,००० पौंड दिले होते. बिचाऱ्या व्हिचर यांच्या वाट्यास मात्र मानहानी आणि निराशा आली. सन १८७१ साली ते अपेशी जीवन कंठीत मेले. जग हे असे आहे ! त्यातल्या त्यात प्रामाणिक पोलिसांकरिता ! □ □ □

[ जी. ए. पिंटो यांच्या ' दि थिन् ब्ल्यू लाइन् ' या पुस्तकावरून ]




आणि २० ऑक्टोबरला पहाटे ५ वाजता चिन्यांनी आपल्या पाठीत खंजीर खुपसला! आपला विश्वासघात केला. ( We were stabbed in the back – Nehru) पहाटे बरोबर ५ वाजता प्रथम चिन्यांनी बदुकांच्या दोन फैरी झाडल्या. हा इतर चिनी सैनिकांना दिला गेलेला त्यांचा परवलिचा इशारा होता. कारण त्यानंतर पाठोपाठ १५० बंदुका आणि प्रचंड तोफखाना त्यांच्यापासून अवघ्या १००० यार्डावर असलेल्या आपल्या पूल क्रमांक ३ आणि ४, सांगधर हे ठिकाण, लॉगब्रिज आणि तात्पुरते बांधलेले पूल, ब्रिगेड हेडक्वार्टर या ठिकाणांवर वरून आग ओकू लागला. क्षणार्धात आणि एकाच वेळी आपल्या इतक्या ठिकाणांवर भडीमार सुरू झाला. अखेर सत्य बाहेर पडले. भारताच्या आजवरच्या परराष्ट्र आणि संरक्षण या बाबतीतल्या धोरणांची अग्निपरीक्षा सुरू झाली. या मुशीतून ही अजब धोरणं आता शुद्ध होऊन बाहेर पडणार होती. या चिन्यांकडून आलेल्या पहिल्या सलामीतच आमच्या डोक्यावरून तोफगोळे येऊन ते फुटताहेत हे पाहून आम्हाला जबरदस्त धक्का बसला. आमचे जणू काही दगडीपुतळे बनले. त्याक्षणापर्यंत चिन्यांच्या आणि आमच्या मनःस्थितीत जो फरक होता त्यामुळे हा धक्का दुप्पट बसला. झाली! अखेर सुरुवात झाली! आपले अनेक वर्षांचे चुकीचे अंदाज, गेल्या काही महिन्यातली अनिश्चितता आणि गूढ, गेला आठवडाभर रात्री आमच्या छात्या दडपून टाकणारे संशय पिशाच्च या सगळ्या सगळ्यांचा शेवट जवळ आला होता. भारत या जन्मात कधी विसरणं शक्य नाही अशी फार मोठी उलथापालथ या पृथ्वीतलावर त्या दिवशी पाहटे घडू लागली. इथून पुढे इतिहासाच्या प्राथमिक पुस्तकात देखील भारताची ही मानखडना नोंदण्यासाठी काही पाने राखून ठेवावी लागणार होती. देशाच्या इतिहासात काही पाने सोनेरी असतात

: लेखक :
**ब्रिगेडिअर जे. पी. दळवी**

: अनुवाद :
**अॅडव्होकेट माधव कानिटकर**

: लेखांक :
**चोवीस**

तर काही शरमेनी खाली मान घालण्यासारखी. पानिपतची लढाई आपण हरलो ! प्लासीची हरलो !... आता नाम-का-चू-च्या परिसरात चिन्यांसमोर हरणार होतो !

चिन्यांच्या या भयंकर भडिमाराची एक पद्धत होती. त्यांनी पंजाबी जवानांवर आणि पूल क्रमांक १ आणि २ वर तोफा डागल्या नाहीत. कारण त्यांचा मुख्य हेतू असा दिसला, की तिथे तोफांचा भडिमार करण्याची जरूरच नाही. धोला आणि सांगधर यांच्या मधल्या पट्ट्यातून सरळ लुंपूपर्यंत धडक मारायची की त्यांच्या पुढे चिनी आणि मागे पण चिनी ! बिचारे पंजाबी जवान ! त्यांना यशस्वी माघार घ्यायला सुद्धा मागे रस्ता उरला नव्हा. ते अलगद चिन्यांच्या हातात सापडणार होते.

आणि म्हणूनच लुंपू शक्य तितक्या लवकर काबीज करण्यासाठी चिन्यांनी त्यांची आणखी एक आघाडी अक्षरशः चालू केली. चिन्यांनी Ziminrhaung या ठिकाणची आपली डिव्हीजनल हेडक्वार्टरच प्रथम धोक्यात आणली. किझमाने-भोवती कडे केले आणि लुंपूकडे जाण्याची आपली तहान भागवून घेण्यासाठी त्यांनी निम-जांग-चू च्या बाजूने लुंपूकडे जाणारा हा दुसरा मार्ग देखील अक्षरशः खुला (?) करून घेतला. सुमारे तासभर हा चिनी तोफांचा भडीमार चालू राहायला आणि पाठोपाठ चिन्यांच्या पायदळ तुकड्या मुंग्यांसारख्या भारतीय हद्दीत घुसून विध्वंस करू लागल्या. त्यांनी नेल्सनचे सुप्रसिद्ध वचन खरे करून दाखविले की 'ज्यांची संख्या जास्त तेच शत्रूचा नाश करू शकतात !' वस्तुतः भारताजवळ त्या वेळी एकूण ४००,००० जवान होते. पण डावपेचांच्या योजनांचा विचार करायचा नाही असे आपल्या सरकारने ठरवले असल्यामुळे चिन्यांच्या २ डिव्हीजन सैन्याला त्या वेळी आपले फक्त ६०० जवान तोंड देत होते. भारताचे भवितव्य आता फक्त रजपूत रेजिमेंटच्या ३ दुबळ्या पायदळ तुकड्यांवर अवलंबून होते. त्यांना मदत मिळणार होती ती फक्त ९। गुरखाज या पलटणीतल्या २ तुकड्यांची.

१/९ गुरखा या तुकडीतले जवान त्या वेळी सांगलेला जाण्याची तयारी करीत होते. त्यांचा काही अपराध नसताना ते बिचारे अकस्मात चिन्यांच्या हाती अलगद सापडले. नेफा युद्धावर पुस्तके लिहीणारे बहुतेक लेखक ही गोष्ट सांगण्याचे टाळतात. सांगायला शरम वाटते की भारताच्या एका उत्कृष्ट बटालियनच्या नशिबी हे दुःख आले. १।९ गुरखा ही आपल्या 4 Division या नावाने जगप्रसिद्ध असलेल्या डिव्हीजनचाच एक भाग होती. १९४४ मध्ये इटलीत लढल्या गेलेल्या Cassino च्या ३ ऱ्या लढाईत त्यांनी नाव कमावले होते. ज्या जर्मन पॅरॉशूट डिव्हीजनचे वर्णन दोस्तांच्या कमांडर इन् चीफ लॉर्ड अलेक्झांडरने ' जर्मन सैन्यातली सर्वोत्तम डिव्हीजन ' असे केले होते त्या तुकडीला आपल्या गुरखा जवानांनी पाणी पाजले होते. F. Majdalany या आपल्या जवानांच्या शौर्याबद्दल लिहीतात "अंगावर घालायला एक कोट नसताना, अंग गोठवून टाकणाऱ्या थंडी वाऱ्यात एका उंच सुळक्याचा आधार घेऊन त्यांनी जर्मनांना तोंड दिले. युद्धाच्या क्षेत्रातलं ते एक भव्य आणि उदात्त असं अविस्मरणीय उदाहरण होतं !" १।९ गुरखा या तुकडीला डोंगराळ प्रदेशात थंडीवाऱ्याची पर्वा न करता लढणे ही गोष्ट नवीन नव्हती. त्यात ते चांगलेच तरबेज होते. पण नाम-का-चू मध्ये नुसता लढाईचा आभास तरी निर्माण करता येईल अशी संधीच त्यांना दिली गेली नाही. त्यांच्या या दारुण दैन्यावस्थेची जबाबदारी दुसऱ्यांचीच आहे.

मी जनरल प्रसादांशी ताबडतोब संपर्क साधून त्यांना बातमी दिली की "चिन्यांनी लढाई चालू केली ! गुरखा जवान आता सांगले या ठिकाणी पाठवायचा प्रश्नच उपस्थित होत नाही, कारण ते प्रत्यक्ष युद्धातच ओढले गेले आहेत. चिन्यांशी ते दोन हात करताहेत. दुसरं म्हणजे ते पुढे पाठवले गेले तर सरळ चिन्यांच्या तोफांच्या टप्प्यात जातील. प्रत्यक्ष सांगधर या ठिकाणी देखील चिनी तोफांचा भडिमार चालू आहे" त्यावर जनरल प्रसाद मला म्हणाले " तसं असेल तर सबंध तुकडी पुढे पाठवू नको. मात्र काही जवान पुढे पाठव, कारण तो ' उच्च पातळीवरून ' घेण्यात आलेला निर्णय आहे !" माझा माझ्या कानांवर विश्वास बसेना ! ' तो ' निर्णय ' उच्च पातळीवरून ' (!) घेण्यात आलेला आहे याची जशी काही मला आठवण करून द्यायची जरूरच होती ! उच्च पातळीवरच्या लोकांच्या भितीने भारतीय लष्करातले अधिकारी त्यावेळी कसे निराश आणि अपमानास्पद परिस्थितीत होते त्याचा हा पुरावा आहे. लष्करी दृष्टया विचार करून भाष्य करणे आणि लष्कराच्या मार्गातल्या अडचणी दूर करणे, हे आम्हा लष्करी अधिकाऱ्यांनाच अशक्य होऊन बसले होते. सुरुवातीपासूनच एखादा हुकूम लष्करी दृष्टया चुकीचा आहे हे ठाऊक असून देखील तो आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्याला ' पोचवणं ' एवढेच काम काही लष्करी अधिकाऱ्यांनी केले होते. लोकनियुक्त प्रतिनिधींची सर्वोच्च सत्ता आणि वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांची केली

गेलेली मुस्कटदाबी यांची फळ भोगायला सुरुवात झाली होती. आता लवकरच भारतीय सेनेच्या कीर्तीला कलंक लागणार होता, भारताची शान धुळीला मिळणार होती.

चिन्यांजवळ असलेली लष्करी कागदपत्रे पाहिल्याशिवाय नक्की सांगता येणार नाही. पण आत्मविश्वासाने आणि खात्रीलायक अंदाजाने सांगतो की चिन्यांच्या आघाडीवरच्या २ डिव्हीजन (२०,००० सैनिक) सैन्यामागे त्यांनी त्यांची तिसरी डिव्हीजन सुद्धा आणून ठेवली होती. धोला प्रदेशात दोन ठिकाणी असलेल्या आपल्या गुरखा जवानांवर एकाच वेळी त्यांच्या २ ब्रिगेडसनी हल्ला चढवला. त्यांची एक ब्रिगेड सांगधरचा समाचार घेत होती आणि एक ब्रिगेड किंझमाने – झिमियांगच्या वाटेवर होती. पूल क्रमांक १ आणि २ जवळचे हाथुंगला मार्गे माघार घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या भारतीय जवानांचा 'रस्ता बंद' करून टाकण्याचे काम त्यांची आणखी एक ब्रिगेड करीत होती. त्यांची आणखी एक तुकडी पश्चिमेकडून हल्ला करता यावा म्हणून त्वांगकडे रवाना झाली होती तर उत्तरेकडन तावांगवर कबजा करता यावा म्हणून आणखी मोठा चिनी फौजफाटा तिकडे रवाना करण्यात आला होता. या चिन्यांच्या व्यूहरचनेमुळ अवघ्या काही मिनिटातच आपल्या ७ व्या पायदळ तुकडीचा आपल्याच जवानांशी संपर्क तुटला. लढताना ऐक्यभावनेतून जे नैतिक बळ निर्माण होते ते मी आता निर्माण करू शकत नव्हतो. आम्ही टेलीफोनच्या ताराच कापून टाकल्यामुळे माझ्या बटालियनशी मी संपर्क साधू शकत नव्हतो. तसेच बटालियन कमांडर कंपनी कमांडरशी संपर्क साधू शकत नव्हता. काही वेळातच युनिट वायरलेस ऑपरेटर्ससुद्धा बंद करावे लागले. कारण चिनी हातघाईवर येऊन हेडक्वार्टर्सवरच हल्ले चढवीत होते. चिन्यांनी आम्हाला सर्वांना तर वेढा घातलाच होता. पण आपल्या पायदळ तुकडीतल्या प्रत्येक लहान तुकडीलासुद्धा कोंडून टाकले होते. एका मोठ्या वर्तुळात अनेक लहान वर्तुळ ! उदाहरणार्थ बघा, राजपूत जवानांवर हल्ला चढवण्यापूर्वी त्यांनी आपल्या राजपूत आणि गुरखा जवानांच्या मधेच त्यांची एक बटालियन घुसवून राजपूत आणि गुरखा जवानांना एकमेकांपासून दूर केले. राजपूत जवानांवर एकाच वेळी दोन दिशांनी गोळीबार सुरू झाल्याबरोबर ते चिन्यांच्या कोंडीत सापडले. असे एकटे पाडले गेलेले आणि कोंडीत सापडलेले आपले शूर जवान तशाही स्थितीत सतत ३ तास लढत राहिले. छोट्या छोट्या टोळ्यांनी आणि व्यक्तीगत पराक्रमाची त्यांनी शर्थ केली. ही घ्या काही उदाहरणं. नुसतं वाचताना अभिमानाने छाती भरून येईल तुमची, मग मी कमांडर या नात्याने या घटना प्रत्यक्ष डोळ्यांनी पहात असताना मला किती अभिमान वाटला असेल आपल्या जवानांचा, याची कल्पना करा !

पूल क्रमांक ४ जवळ असलेल्या लेफ्टनंट कर्नल रीख या उमद्या आणि शूर

जवानाचा पराक्रम पहा. चिनी सैन्याच्या सुरवातीच्या दोन लाटा याने एकट्याने थोपवून धरल्या. चिनी तोफांचा भडीमार सुरू झाल्याबरोबर अवघ्या काही मिनिटात त्याच्याजवळची सिग्नल्स बंकर उध्वस्त झाली. प्रत्येक सिग्नलर ठार झाला. याच हल्ल्यात आपला कॅप्टन Mangat पण ठार झाला. त्यानंतर ताबडतोब चिन्यांनी आपल्या तोफखान्यावरच्या संपूर्ण तुकडीचा क्षणार्धात सत्यानाश करून टाकला. अखर ज्यांची संख्या जास्त त्यांचे हल्ले जास्त. पहिल्याच दोन हल्ल्यात आपली एवढी वाताहात करून टाकल्यावर चिनी सैन्याची तिसरी लाट आली आणि जमादार विश्वास यांच्यासकट त्यांच्या तुकडीतल्या प्रत्येक बंगाली जवानाला त्यांनी ठार केले. तशाही स्थितीत सेकंड–इन–कमांडर मेजर गुरदयाल-सिंग पुढे झाले. आपले उरले सुरले जवान गोळा करून त्यांनी लढाई चालूच ठेवली. चिन्यांनी आपले हेही जवान मारून टाकले आणि मेजर गुरदयालसिंगना जिवंत पकडून नेले. ते चिन्यांच्या तुरुंगात असतानाच पुढे त्यांच्या या अतुल धैर्या-बद्दल त्यांना 'महावीर चक्र' देण्यात आले. आता उरले होते फक्त लेफ्टनंट कर्नल रीख. ते व त्यांचे फारच थोडे जवान यांना चिन्यांनी घेरले. त्यांच्या बरोबर कॅप्टन भाटीया आणि लेफ्टनंट भूपसिंग हेही घेरले गेले. चिनी त्यांना पुन्हा पुन्हा सांगून त्यांचे मन वळवायचा प्रयत्न करीत होते की, "अजून तरी शरणागती द्या!" लेफ्टनंट कर्नल रीखने शरणागती देण्यास नकार देताच चिन्यांकडून राक्षसी गोळीबार सुरू झाला. तरी देखील लेफ्टनंट कर्नल रीख व त्यांचे साथीदार चिन्यांना शरण जाईनात. हे पाहून रागाने दात ओठ खात एक चिनी सैनिक जमिनीवरून सरपटत त्यांच्या अगदी जवळ गेला आणि त्याने एक हँड-ग्रेनेड फेकली. कॅप्टन भाटीया जागच्या जागी ठार झाले. लेफ्टनंट कर्नल रीख यांचा



जबडा, डाव्या हाताचे कोपर आणि डावा खांदा या ठिकाणी असंख्य जखमा होऊन ते बेशुद्ध पडले. आणि त्यानंतर चिनी पुढे झाले आणि एकटया आणि असहाय्य भूपसिगांना आणि बेशुद्ध पडलेल्या रीख यांना त्यांनी 'ताब्यात घेतले !' या चिनी हँड-ग्रेनेडमुळे जागच्या जागी ठार झालेला कॅप्टन भाटिया हा अगदी तरुण अधिकारी होता. पुण्याच्या नॅशनल डिफेन्स अॅकेडेमीमध्ये इन्स्ट्रक्टर म्हणून त्यांची नुकतीच नेमणूक झाली होती. योगायोग असा की वस्तुतः २० तारखेलाच आघाडी-वरच्या जवानांचा निरोप घेऊन ते पुण्याला जाण्यासाठी निघणार होते. पण दैवाच्या मनात वेगळे होते. दैवाने या तरुण अधिकाऱ्याची प्राणज्योत अकालीच विझवली.

कॅप्टन भाटियांच्या या कर्तव्यदक्षतेची आणि शौर्याची बातमी हा हा म्हणता आजूबाजूला पसरली. आणि त्याचा परिणाम असा झाला की तात्पुरत्या पुलाजवळ असलेले नाईक रोशनसिंग आणि त्यांचे जवान यांना चेव आला. ते चिन्यांचा पिच्छा सोडेचनात. अखेर चिन्यांना रोशनसिंगसकट तिथल्या प्रत्येक जवानाला ठार मारावे लागले. जमिनीवर मरून पडेपर्यंत त्यांच्यापैकी प्रत्येकजण जागा न सोडता चिन्यांशी लढत होता.

...सुभेदार दशरथसिंग यांच्या तुकडीत आता फक्त ७ जवान उरले होते. त्यांच्या जवळचा दारूगोळा संपत आला होता. आतापर्यंत त्यांनी चिन्यांचे ४ हल्ले परतवून लावले होते. त्यांनी ठरवून ठेवले होते की 'रजपूत' कसा असतो ते चिन्यांना दाखवायचे. चिन्यांच्या चौथ्या लाटेवर त्यांनी बंदुकीतून गोळ्यांचा मारा सुरू केला. पण काय करणार ? अखेर अक्षरशः हातांनी झालेल्या या लढाईत आपले ८ पैकी ४ जवान मेले आणि उरलेल्या चौघांना चिन्यांनी पकडून नेले.

...चिन्यांचे ३ हल्ले थोपवून धरता धरता जमादार बोस यांच्या तुकडीत आता फक्त १० जवान उरले होते. त्यांनीही प्रखर प्रतिकार चालूच ठेवला आणि सरतेशेवटी जमादार बोस आणि त्यांच्या बहुसंख्य (!) जवानांनी मरण पत्करले.

ज्यांना आपले बंगाली भाईबंद चांगले लढत नाहीत असे सांगण्यातच आनंद होतो त्यांना जमादार विश्वास आणि बोस यांनी सणसणीत जबाब दिला. ते दोघेही अखेरपर्यंत उल्हासी वृत्तीने धडक मारून शौर्याने लढले.

कोई सिख, कोई जाठ मराठा, कोई गुरखा, कोई मद्रासी !... दस दस को एक ने मारा ! अगदी खरं आहे हे. आता हे पहा मेजर बी. के. पंत ! चिन्यांनी त्यांना वेढा घातल्याबरोबर ते रजपूत जवानांना प्रोत्साहन देऊन सांगू लागले की, "भारतीय सेनेच्या इतिहासात आज एक नवं पान लिहिलं जाणार आहे. धाडस आणि चिकाटी म्हणजेच रजपूत हे चिन्यांना दाखवून देण्याची हीच वेळ आहे !" मेजर बी. के. पंत इतके बोलेपर्यंत त्यांच्या पायावर चिन्यांनी गोळी मारली. तरीदेखील लंगडत लंगडत, स्वतःला धोका असून ते जवानांना सांगत राहिले की, "वेळ आली

की बंदुकीतली शेवटची फैर संपेपर्यंत आणि आपला शेवटचा माणूस खाली पडेपर्यंत लढायचं असतं ! लढा !" मेजर पंतांच्या रजपूत कंपनीनेही चिन्यांचे पहिले ३ हल्ले परतवले. आपले अनेक जवान जबर जखमी झाले. चौथा हल्ला करण्यापूर्वी चिन्यांना त्यांच्यासमोर आणखी तोफखान्याची जमवाजमव करावी लागली. या वेळेपर्यंत मेजर पंतांच्या पोटात एक आणि दोन्ही पायातून दोन चिनी गोळ्या त्यांच्या शरिरात घुसल्या होत्या. अशा भयानक जखमी अवस्थेत ते रजपूत जवानांना चेतवत राहिले. मेजर पंतांच्या शरिरातून इतके रक्त वहात होते की आपला शेवट आता फार जवळ आलाय हे त्यांच्या लक्षात आले. कुणाची आठवण झाली असेल मरताना त्यांना ? बायकोची ? मुला-बाळांची ? घराची ? छेः ! छेः ! मेजर पंत कसला ? साक्षात रणचंडिकाच ती ! जीवाच्या आकांताने त्यांनी रणशिंग फुंकले आणि रजपूत जवानांना आवाहन केले की " तुमची आजवरची ऐतिहासिक कामगिरी आठवा ! शूरांची आणि वीरांची जात् आहे तुमची ! भारतातला प्रत्येक शूर वीर तुमचाच वारसा सांगतो !"

मेजर पंतांचे अखेरचे शब्द असे आहेत " रजपूत रेजिमेंटच्या जवानांनो ! देशासाठी मरण्यासाठीच तुमचा या देशात जन्म झालेला होता. ईश्वरेच्छा अशी दिसते की तुमच्यासमोर वाहत असलेल्या या लहानशा नदीसाठीच तुम्ही मरावं. तुम्ही मरेपर्यंत लढलंच पाहिजे ! जागा सोडू नका ! अस्सल रजपूताला शोभेल असे लढा !"

चिन्यांच्या आता कुठे लक्षात आले की हा लेकाचा मेजर बी. के. पंत त्याच्या जवानांना चेतवतोय ! आणि असंख्य चिनी सैनिक फटाफट मरताहेत ! हा मेजर पंत म्हणजे चित्यांच्या मार्गात एक ' विघ्न ' (?)च आहे ! त्याला आधी उडवला पाहिजे ! चिन्यांनी आता त्यांचे लक्ष फक्त मेजर पंतांवर केन्द्रीत केले. त्यांच्यासाठी (!) खास मोठमोठ्या मशिनगन्स मागवल्या गेल्या ! आणि थोड्याच वेळात मेजर पंतांच्या शरिराची चाळण झाली ! त्यांचे तांबडेलाल शरीर खाली कोसळले ! मरता मरता ते ओरडले " बजरंग बली की जय !"

मेजर पंतांच्या जवळ असलेल्या एकूण ११२ जवानांपैकी ८२ ठार किंवा जबर जखमी झाले. आपल्या शूर सुपुत्रांपासून भारतमातेची यापेक्षा जास्त काय अपेक्षा असणार ?

स्थलाभावी मला आणखी उदाहरणे देता येत नाहीत. भारतातल्या प्रत्येक प्रांताचा आणि प्रत्येक जातीचा जवान हा सारख्याच अतुल निष्ठेने आणि शौर्याने लढला. शौर्याची कधी तुलना करता येईल ? रजपूत जवान प्रसिद्धीच्या झोतात आले, कारण २० ऑक्टोबर १९६२ ला अगदी पुढे असणे हे त्यांच्या नशिबात होते. चिन्यांच्या जोरदार हल्ल्यांना प्रथम तोंड द्यावे लागले ते त्यांना.

चिन्यांच्या तुरुंगात असताना आपल्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याजवळ चिन्यांनीच कबुलीजबाब दिला की " नेफामध्ये पहिल्याच धडाक्यात आमचे जास्तीत जास्त

चिनी सैनिक ठार करण्याचे काम तुमच्या २/ राजपूत या तुकडीने केले. फार नुकसान झालं चिन्यांचे या तुकडीमुळे.'

आपल्या गुरखा जवानांनीसुद्धा कमाल केली. त्यांचा कमांडिंग ऑफीसर लेफ्टनंट कर्नल आलुवालीया जबर जखमी झाल्यानंतर चिन्यांनी त्याला पकडून नेला. या तुकडीच्या शौर्याबद्दल पुढे अनेकांना 'पदके' दिली गेली.

चिन्यांच्या हल्ल्यांच्या झपाट्यात सापडलेले आपले पंजाबी जवान ह्यांग-ला खिंडीमार्गे माघार घेत असतानाच त्यांना चिन्यांनी अचूक टिपले. त्यातले काही मेले, काही जखमी झाले. खरे म्हणजे आपल्या चुकीच्या सैन्यरचनेमुळे या शूर पंजाबी जवानांना खऱ्या अर्थाने चिन्यांशी लढण्याची संधीच मिळाली नाही. या तुकडीतले अनेक जण लढण्याची संधी न मिळताच मेले. चिन्यांनी आपल्या या जवानांना खालच्या जागी पण मोठ्या पटांगणात कोंडले आणि जो जो कुणी वर चढून यायचा प्रयत्न करीत गेला त्याला लढण्याची संधी न देताच ठार केला.

अनेक दिवस धोक्यात आलेले आणि सांगले या ठिकाणी असलेले आपले गुरखा आणि पंजाबी जवान केवळ स्वतःचे संरक्षण करण्याइतपत देखील व्यवस्था नसल्यामुळे कुठलाही अपाय न होताच भूतानमार्गे मागे हटले. लढाईत हे देखील नशिबात येते.

चिन्यांनी लढाई सुरू केली होती पहाटे ५ वाजता. आता ७·४५ झाले होते. फक्त अडीच तासात हे लक्षात आले होते की, धोला प्रदेशातील आपली प्रत्येक जागा चिनी आता लवकरच पायाखाली तुडवतील. आघाडीवर आपला धुव्वा उडाला होता. गुरखा जवानांना सांगधरपर्यंत मागे हटावे लागल्यामुळे आणि रजपूत जवानांच्या विरोधावर चिन्यांनी काबू मिळवल्यामुळे आता ब्रिगेड हेडक्वार्टरच धोक्यात आली होती. आपली आघाडी अक्षरशः उघडी झाली होती.

अवघ्या ३ तासात आपल्या बटालियन्सचे चिन्यांनी तुकडे तुकडे करून टाकले. त्यांचा बहर ओसरला. मोहर जळला. फक्त मरण्याशिवाय आपले जवान आता दुसरे काहीच करू शकत नव्हते. मला अजून अशी आशा आहे की त्यांचे हे वीर मरण फुकट जाणार नाही. जगात पुन्हा एकदा भारताची मान उंच करायची असेल तर त्यांच्या या हौतात्म्यापासून आपण काहीतरी धडा शिकला पाहिजे.

थागला प्रदेशात लढाई कशी झाली ते न सांगितलेलच बरे. तिला लढाई असे म्हणता येईल की नाही अशी मला शंका आहे. फक्त आपल्या जवानांचीच चिनी कत्तल करताहेत या दृश्याला लढाई असे कसे बरे म्हणता येईल ? आपले किती जवान तिथे मेले आणि जबर जखमी झाल्यामुळे लष्करात नोकरी करण्याच्या दृष्टीने अक्षरशः किती निकामी झाले याची कल्पनाच करता येणार नाही. काही कामी आले; काही निकामी झाले. शस्त्रास्त्रे हातात नसताना, आपली तयारी नसताना एकाकी पडून लढले बिचारे. आपल्या देशातल्या इतर लोकांना,......फक्त लोकांनाच कशाला, खुद्द भारतीय लष्करातल्या अनेक अधिकाऱ्यांना हे ठाऊक नसेल

की चिन्यांच्या पंजातून आपली सुटका नाही हे ठाऊक असून देखील कुठल्या आणि कशा उसळत्या धैर्याने त्यांनी त्या भयंकर चिनी – चितेवर उडी घेतली ते.

गुरखा, रजपूत, सिख, डोग्रा, मराठा, बंगाली, मुसलमान, अहीर आणि मद्रासी, भारतातल्या कानाकोपऱ्यातून आलेल्या प्रत्येक जवानाला आपल्या लष्करी कारकीर्दीचा आणि परंपरांचा अभिमान होता. ते 'जवान' होते म्हणूनच त्यांनी जे केले ते ते करू शकले. देशासाठी प्राण देणे यापेक्षा जास्त देशासाठी कुणी काहीच करू शकत नाही.

७ व्या पायदळ तुकडीतल्या जखमी आणि मृत जवानांचे हे आकडेच बोलके आहेत. त्यावर अधिक भाष्य नको. शितावरून भाताची परीक्षा. ही पहा फक्त रजपूत तुकडीची अवस्था. नाम – का – चूच्या परिसरात सर्व दर्जाचे धरून एकूण ५१३. २८२ जवान ठार; त्यात ४ ऑफीसर्स आणि ६ ज्युनिअर कमिशंड ऑफीसर्स. जखमी होऊन पकडले गेले – ८१; त्यात २ ऑफीसर्स आणि ३ ज्युनिअर कमिशंड ऑफीसर्स. एकही जखम न होता चिन्यांनी पकडून नेलेले ९०; त्यात ३ ऑफीसर्स आणि २ ज्युनिअर कमिशंड ऑफीसर्स. उरलेले फक्त ६० म्हणजे ९ टक्के जवान सांगधर, लंपू आणि तावांग या ठिकाणी पिछाडीला असल्यामुळे चिन्यांच्या तावडीतून मागच्यामागे सटकून जाऊ शकले.

पहाटे ५ वाजल्यापासूनच सुसाटत आणि फुत्कार टाकीत पुढे पुढे सरकत आलेल्या चिनी सर्पाने बरोबर ९ वाजता फणा काढून पाहिले. त्या विषारी जनावराची नजर आता सांगधर वर पडली. आपली दुधारी जीभ त्याने हवेत फिरवली आणि पुन्हा एकदा तो काळसर्प जोमाने सांगधरकडे सरकू लागला.

कशी झाली सांगधर या ठिकाणची लढाई ? कसे लढले आपले जवान ? काय केलं चिन्यांनी ? (क्रमशः)

**From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi**
**Thacker & Co. © with the Original Publisher.**


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, अजूनही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**वेस्टर्न इंडिया कं. (वी. एन.) पो. कतरीसराय (गया)**

# खुमासदार कथांचा संग्रह

**रंगा मराठे**

'तिचं वय माझी वाणी ' या नावाने नुकताच प्रसिद्ध झालेला मधुकर परांजपे यांचा कथासंग्रह वाचकांचे चित्त प्रथम वेधून घेतो तो पुस्तकाच्या वैशिष्टय-पूर्ण शीर्षकामुळे. कुणाचेही कुतुहल जागृत करील असे या कथासंग्रहाचे नाव आणि मुखपृष्ठ आहे. कथासंग्रहातली पहिली कथा याच नावाची आहे. त्यामुळेच माझी उत्सुकता वाढून मी कथासंग्रह वाचावयास घेतला आणि तो हातावेगळा केला तेव्हा लेखकाने निर्माण केलेल्या विश्वात तल्लीन झाल्याचा आनंद मला झाला होता. या कथासंग्रहातील प्रत्येक कथा वाचायला सुरुवात केली की वाचकाला शेवटापर्यंत खेचून नेण्याची कला लेखकाने साध्य केली आहे. सहजसुंदर, घरगुती, रोजच्या जीवनातले–प्रत्येकाला अनुभवाला येणारे प्रसंग लेखकाने निवडले असून आपल्या खेळकर भाषाशैलीने त्याने शब्दांचा सुंदर मनोरा प्रत्येक कथेत उभा केला आहे. त्यामुळे वाचकाचे मन प्रसन्न होते. जीवनाचा रस, सुगंध आणि ताजेपणा प्रत्येक कथा वाचताना वाचकाच्या प्रत्ययाला येतो. पाऊस पडल्यानंतर डोंगर कपारीतून खळखळ करीत जाणाऱ्या पाण्याच्या प्रवाहात जो जिवंतपणा आढळतो त्याचा अनुभव मधुकर परांजपे यांचा कथासंग्रह वाचताना वाचकाला अनुभवता येतो.

या कथासंग्रहात एकूण तेरा कथा आहेत. यातील साऱ्या कथा मध्यम वर्गातील माणसाला जीवनात जे संघर्ष, किंवा जी सुखदुःखे अनुभवावी लागतात त्या साध्या पण चित्तवेधक प्रसंगावर किंवा भावविश्वावर, आधारलेल्या आहेत. 'तिचं वय माझी वाणी ' या कथासंग्रहातील पहिल्या कथेचा नायक–कचेरीत काम करणारा एक कारकून–आठवडाभर कारकून पण रविवारी तो मनाने आगाखान असतो. एखाद्या बादशाहाप्रमाणे गेटवेपासून चौपटीपर्यंत तो दर रविवारी हिंडतो. आठवडा-भर कारकुनी करणारे मन रविवारी संध्याकाळी प्रसन्न, टवटवीत आणि मोकळे सुटलेले असते. रेक्लमेशनवर त्याला चाळीशीची त्याच्या ओळखीची स्त्री भेटते. तिचे वय फारफार तर नुकतच एम्. ए.चा अभ्यास करीत असलेल्या कॉलेजमधल्या मुलीएवढे असेल असे तो तिला आर्जवून सांगतो. तिचे वय इतके कमी सांगितल्या-

मुळे ती प्रौढा फुलून जाते. तिचे वय आणि त्याची वाणी यांची जुगलबंदी सुरू होते. आणि शेवटी खरोखरीच आपण इतक्या तरुण दिसतो याचे विलक्षण सुख तिच्या चेहऱ्यावर व अविर्भावात दिसू लागते. ती एखाद्या कॉलेजच्या तरुणीसारखी त्याच्याशी वागू लागते. आवेगाने ती त्याच्याजवळ सरकते आणि त्याच्या गालावर आपले ओठ टेकते.

'प्रामाणिक माणसाचा शोध' ही कथासंग्रहातली दुसरी कथा सुद्धा अतिशय मनोवेधक आहे. प्रसंग अगदी साधा. एक नवविवाहित मध्यमवर्गीय–चाळीत राहणारे दांपत्य–फिरायला जाते. वाटेत बायकोच्या पिशवीतली पर्स हरवते. नवरा रागावतो. पर्समध्ये चाळीस रुपये असतात. हिरमुसल्या मनाने दोघे घरी परत येतात तोच खिडकीतून ज्याला कुणाला पर्स सापडते तो ती घरात टाकून जातो. मग प्रामाणिक माणसाचा शोध करायला जाहिरात दिली जाते. ती जाहिरात वाचून अप्रामाणिक लोक घरी येवून टेबलावरचे टाइम पीस, फाउंटन पेन चोरून जातात. शेवटी पत्नीला आपण घरातून जाताना पर्स नेलीच नव्हती असा शोध लागतो आणि इथे कथा संपते. 'रुमालाच्या दोन गाठी' या कथेमध्ये सुद्धा मोठी गंमत आहे. आपल्या रुमालाला दोन गाठी कसल्या मारल्या आहेत हे नुकतेच लग्न झालेल्या तरुणाला काही केल्या आठवत नाही. शेवटी घरी परत जाताना नाना तऱ्हेच्या वस्तु विकत घेऊन तो घरी जातो. पण तरी त्याला ते गाठीचे कोडे उलगडत नाही. शेवटी तो पत्नीला विचारतो की, "रुमालाला दोन गाठी कशाकरिता मारल्यास" पत्नीची हसून मुरकुंडी वळते. कारण तो रुमाल तिचा असतो व तिला आठवण राहण्यासाठी तिने त्या गाठी मारलेल्या असतात. 'मी मासे घेतो' या कथेत मित्राने आणून दिलेले मासे चोरून कपाटात ठेवल्यामुळे त्याची दुर्गंधी घरात सुटल्यामुळे झालेली तारांबळ, 'स्वप्नांचा खेळ' या कथेतील रेसचा विनाचा घोडा अचुक सांगणारी मीना चिटणीस आणि भोळेपणाने तिच्यावर विश्वास ठेवून सात हजार रुपये गमावून बसणारा तरुण. 'नाद युद्ध' या कथेत चाळीत शेजारी राहणारी दोन बिऱ्हाडे, त्यांच्या घरातून येणारे नाद आणि त्यामुळे आपापसात रंगलेले नादयुद्ध लेखकाने रंगविले आहे. केळी खाऊन रस्त्यात साले टाकणाऱ्या प्रोफेसरची व्यथा परांजपे यांनी 'प्रोफेसर केळी खातात' या कथेत रंगविली आहे. लोकल गाडीत एका स्त्रीची पर्स दुसऱ्या स्त्रीला देऊन स्त्री-दाक्षिण्यावद्दल प्रायश्चित भोगणाऱ्या एका कारकुनाला भोगावे लागलेले मनस्ताप "स्त्री दाक्षिण्य" या कथेत चित्रित केले आहेत.

मधुकर परांजपे यांच्या कथासंग्रहातील साऱ्या कथा वाचनीय आहेत. दैनंदिन जीवन जगत असताना प्रत्येकाच्या हातून अजाणतेपणी उपरोधात्मक व हास्यास्पद वागणूक घडत असते. या प्रसंगातून जो उपरोध निर्माण होतो तो त्याला समजत नाही; पण समोरच्या माणसाला हसू येते, गुदगुल्या होतात. परांजपे यांच्या कथा

वाचताना कथेतील प्रसंगांमुळे, निर्माण झालेल्या विनोदामुळे वाचकांना गुदगुल्या होत असतात. आपणही असेच वागलो असतो, आपल्याही बाबतीत असेच झाले असते असे वाटू लागते. प्रसंग लहान पण लेखकाने शब्दांचा असा फुलोरा निर्माण केला आहे की वाचक त्यात गुरफटून जातो. त्या भावविश्वात स्वतःला विसरून जातो. परांजपे यांच्या लेखणीत सहजता आहे, ओघ आहे आणि बारिक सारिक प्रसंग डोळसपणाने टिपण्याचे कौशल्य आहे आणि त्याचबरोबर कल्पनेची भरारी पण आहे.

मधुकर परांजपे यांचा हा पहिलाच कथासंग्रह. पण त्यांनी टाकलेले साहित्य-क्षेत्रातले पहिले पाऊल आत्मविश्वासाने टाकले आहे. त्यांची भाषा ओघवती आहे. मध्यमवर्गीयांच्या अंतःकरणाला जाऊन भिडणारे दैनंदिन जीवनातले प्रसंग त्यांनी मिस्किलपणाने आपल्या कथांतून वाचकांपुढे मांडले आहेत. त्यामुळे या संग्रहातील कथांचा सुगंध वाचकांच्या मनात दीर्घकाल दरवळत राहील.

[ 'तिचं वय माझी वाणी !' मधुकर परांजपे—प्रेस्टीज प्रकाशन, किंमत सहा रुपये ]

◻

# खूप खूप भोगलेल्या आठवणी

## निशिकान्त मिरजकर

भालचंद्र पेंढारकरांनी आपल्या आयुष्यातल्या भल्याबुऱ्या आठवणी उत्कटतेने सांगितल्या आहेत आणि व. पु. काळेयांनी समरसतेने त्या वर्णन केल्या आहेत. ठिकठिकाणी उचंबळून आलेल्या भावनेशी आणि एकंदरच पेंढारकरांच्या अनुभूतीशी व. पु. काळे अतिशय तन्मय झालेले असल्यामुळे सांगणारा आणि लिहिणारा हे भिन्न आहेत असे वाटतच नाही. एक खूप खूप भोगलेला, आयुष्याच्या अनेक बाजू पाहिलेला भावनाशील नट आपले हृद्गत उलगडून दाखवीत आहे असे वाटते.

अर्थात प्रारंभीच्या निवेदनात भालचद्र पेंढारकरांनी सांगितल्याप्रमाणे हे त्यांचे आत्मचरित्र नव्हे. अथवा 'ललितकलादर्श'चा सांगोपांग इतिहासही नव्हे. या क्षेत्रात खूप अनुभव घेतलेल्या जीवनातल्या या आठवणी आहेत. म्हणून त्या जिवंत, व्यक्तिमत्त्वसंपन्न नि वेधक झालेल्या आहेत. हे एका कलावंताचे हृद्गत आहे. नाटकातल्या कलावंताचे. त्यामुळे नाटयवेड्या

मनाला याविषयी एक वेगळेच आकर्षण पहिल्यापासूनच तयार होते, आणि पुस्तक वाचताना ते आकर्षण शेवटपर्यंत कायम राहते.

प्रारंभिक निवेदनात पेंढारकर म्हणतात, " पण ' ज्ञानेश'ला देखील काय सांगावे नि काय सांगू नये, याला अपरिहार्य मर्यादा पडल्याच. " प्रत्यक्षात मात्र ह्या मर्यादा फारशा पाळल्या गेल्या नाहीत असे दिसते. ज्ञानेशशी गुजगोष्टी करण्याच्या अविर्भावात त्याला न पेलणाऱ्या गोष्टी पुष्कळ सांगितल्या गेल्या आहेत.

या आठवणींच्या निवेदनाची रचना मात्र खरोखरी उत्तम झालेली आहे. एकेक साध्या प्रसंगावरून भूतकाळाचे महाभारत डोळ्यापुढे उभे राहते. निवेदनाला त्यामुळे एक तऱ्हेची रम्य आल्हादकता आहे. अंतरंग उघडे करणारे हे निवेदन टाकोटाक अनुभूतिचित्रे पेरीत जाते.

नाट्य व्यवसायातील माणसाचे हे अनुभूतिविश्व नाना प्रकारच्या नाट्याने भरगच्च भरलेले आहे. प्रत्यक्ष रंगभूमीवर नेहमीचे नाट्य तर आहेच, पण रंगभूमीवरचे अनपेक्षित नाट्यही आहे. प्रत्यक्ष रंगमंचावर चालणाऱ्या नाटकाइतकेच हे अभावित नाट्यही प्रेक्षकांना आकर्षक वाटते.

कधी कधी पडद्याआड दुसरेच नाटक घडत असते. प्रेक्षकांना ते कळत नाही. अशा पडद्याआडच्या नाटकात तर कमालीचे नाट्य असते. रागलोभ रंगत असतात. समस्या निर्माण होतात आणि सोडविल्या जातात. सगळे संबंधित त्यात जीवन ओतून रंगून जातात आणि नाट्यबिंदूला श्वास रोखून धरतात. असे प्रसंग पेंढारकरांनी चटकदारपणे सांगितले आहेत.

पण यापेक्षाही विदारक आणि परिणामकारक असे जीवनातले खरेखुरे नाट्य या अनुभवामध्ये ठिकठिकाणी आहे.

जगाचे भलेबुरे अनुभव पचवलेले हे भावगर्भी जीवन जेव्हा लेखक शब्दांत गुंफण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्यातून अनुभूतीची सुडौल भाषाचित्रे रेखली जातात.

नाट्यव्यवसायाचे स्वरूप, त्यातल्या अडचणी आणि धोके याविषयी पेंढारकरांनी अनुभवाचे बोल ठिकठिकाणी सांगितले आहेत. यातायात करून, अनेक अडचणी सोसून, जिवाची दगदग करून, प्रसंगी अंगात ताप असतानाही ह्यांनी प्रयोग उभे केले आहेत. यशस्वी केले आहेत. परंतु हा व्यवसायच असा आहे, की तुम्ही लोकांना काय दाखविता ते महत्त्वाचे असते. त्यापाठीमागील अडचणींचा आणि भानगडींचा विचार लोकांना ठाऊक नसतो. तो करण्याची त्यांना जरूर नसते. त्यामुळे मग हा व्यवसाय निष्ठेने स्वीकारणाऱ्या कलावंतालाही काही चौकटी स्वीकाराव्या लागतात. व्यवहाराचे अधिष्ठान असणाऱ्या या कलेची सेवा करताना मानापमानाच्या

कल्पना सैल कराव्या लागतात. काही निर्बंध स्वत:वर लादून घ्यावे लागतात. पेंढारकरांनी ते तसे घेतलेले आहेत आणि ज्ञानेशलाही त्यांचा उपदेश केलेला आहे.

त्याचबरोबर या व्यवसायात शिरू पाहणाऱ्या काही अपप्रवृत्तीही पेंढारकरांनी स्पष्ट शब्दांत सडेतोडपणे सांगितल्या आहेत.

शेवटी उल्लेख करावासा वाटतो तो यातल्या नानाविध माणसांच्या नमुन्यांचा. आजवरच्या वाटचालीत कितीतरी माणसे पेंढारकरांच्या मनावर खोल ठसा उमटवून गेलेली आहेत. अशा कितीतरी नमुन्यांचे वर्णन करताना पेंढारकरांनी सुरेख व्यक्तिचित्रे निर्माण केली आहेत. अनेक मजेदार किस्से सांगितले आहेत.

या निवेदनात मामा वरेरकरांवर अन्याय झाला आहे; असे काहीजण म्हणतात. किंवा चाफेकरांवर अन्याय झाला आहे असेही म्हणतात. परंतु न्याय-अन्यायाचा प्रश्न येथे येत नाही असे मला वाटते. हे आहे एका व्यक्तीचे पाहिलेले, तिच्या स्वकेंद्रीत दृष्टीला दिसलेले भोवतालच्या जगाचे मर्यादित वर्णन. या दृष्टीत एकांगीपणा येणे अटळच आहे. ◻

[ 'जपुन टाक पाऊल' – निवेदक : भालचंद्र पेंढारकर – लेखक : व. पु. काळे, ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिर – मूल्य दहा रुपये – पृष्ठे २११ ]


## पुरंदऱ्यांची दौलत

श्रीमंत बाजीराव पेशवे / तुळशीबागवाला / खासा फिरंगी मारिला / जिद्द / खासगीवाला / खंडेराव दरेकर / तलवारीचे पाते / पालखी / पुरंदऱ्यांची दौलत

नऊ पेशवेकालीन कथा

ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन


# गोळ्यांच्या वर्षावात

'फ्रॅन्क पामॉस हा २८ वर्षांचा आस्ट्रेलियन वार्ताहर आहे. बंदुकीच्या गोळ्यांच्या वर्षावात याने आयुष्यातील पुष्कळ क्षण वेचलेले आहेत. सुकार्नोच्या काळातील इंडोनेशियामधील त्याचे जीवन व सध्या व्हिएटनाममधील त्याचे वास्तव्य अनेक रोमहर्षक घटनांनी भरलेले आहे. १९६८च्या मे महिन्यात पाचांपैकी चार वार्ताहरांना व्हिएटकाँगनी अमानुषपणे गोळ्या घालून ठार मारले. पण पाचवा वार्ताहर—फ्रॅन्क वाचला! ...
तो जीव वाचवून पळाला! ...
त्याच्याच शब्दात ही कथा!'

अनुवादक : विजयानंद बर्फे

दिनांक ५ मे १९६८! रविवारची पहाट! पहाटे ४ वाजेपासूनच सायगावमधल्या माझ्या खोलीची तावदाने खडखडू लागली. माझ्या खोलीपासून काही शंभर यार्डावरच मॉर्टरचे गोळे येऊन फुटत होते. मशिनगनच्या फैरी झडू लागल्या. काही मिनिटातच फ्लेअर्सचा प्रकाश मध्यसायगाव उजळून टाकायला लागला. त्या प्रकाशामुळे असे वाटत होते की सकाळ दोन तास आधीच उगवली. माझ्या मनात पहिला विचार आला की हा व्हिएटकाँगचा अपेक्षिलेला 'सेकंड वेव्ह' हल्ला 'टेट' तर नाही ना!

शेजारच्या खोल्यांतून माझे सोबती दोन वार्ताहर धावत बाहेर आले. त्यापैकी पहिला रॉन लारामे हा ३१ वर्षांचा इंग्लिश पत्रकार आणि दुसरा मायकेल बर्चे हा २४ वर्षांचा आस्ट्रेलियन असोशिएट प्रेसचा प्रमुख वार्ताहर. ताबडतोब आम्ही



ब्रूस पिगॉटला बरोबर घेतले. चौघे मिळून आम्ही 'हान थुएन स्ट्रीटवरील त्याच्या ऑफिसकडे पोलिसांना हल्ल्याची बातमी देण्यासाठी फोन करायला निघालो.

लवकरच आम्हाला कळले की हा अपेक्षिलेला हल्ला अगदी मामुली आहे. सकाळचे आठ वाजायच्या आत व्हिएट-काँग चोलानच्या भागात पांगले. आता ते ओळखूसुद्धा आले नसते.

हान थुएन स्ट्रीटच्या टोकाला असलेले चर्च मात्र लोकांनी गच्च भरले होते. तेथे लोक शहराच्या बचावासाठी प्रार्थना करीत होते. तेथेच आम्हाला अशी बातमी मिळाली की पुष्कळसे निर्वासीत चोलान सोडून जात आहेत.

सकाळच्या आठ नंतर थोड्याच वेळात जॉन कान्टवेल हा टाईम्सचा प्रतिनिधी आला. आल्या आल्या तो म्हणाला की, "आपण चोलानकडे एक फेरफटका मारू व हल्ल्याची प्रत्यक्ष परिस्थिती पाहू." त्याच्या मोटारवर 'टाईम्स'चे मोठे बोधचिन्ह होते.

आम्ही सर्व पत्रकार होतो. आमच्याजवळ डायऱ्या, कॅमेरे होते. दक्षिण व्हिएट-नामच्या सैनिकांनी रोखलेल्या रस्त्यावरून आम्ही आमची प्रेसकार्डे दाखवीत रस्ता काटीत होतो. जॉन कान्टवेल गाडी हाकीत होता. त्याच्या शेजारी मायकेल बर्च बसला होता. उरलेले आम्ही तिघेजण मागच्या बाजूस बसलो होतो. मी डाव्या बाजूस होतो. आमचे कपडे साधेच होते.

आमच्या विरुद्धबाजूने हजारो निर्वासितांचे लोंढे चोलान सोडून चालले होते. आमचा रोख 'बेन लो गाम' नदीवरील पुलाकडे होता. व्हिएटकाँगचा हल्ला कमजोर व बेशिस्त होता. त्यांनी अनेक चौक्यांवर हल्ले चढविले होते. पण थोड्याच काळात ते परतवून लावण्यात आले होते. हमरस्ते पुनः वहातुकीसाठी

मोकळे करण्यात आले होते. आम्ही मोकळेपणाने बोलत होतो; तरीपण आमच्या मनावर दडपण होतेच.

जाताना आमचे लक्ष दूरवर उसळणाऱ्या काळ्या धुरांच्या लोटांकडे गेले. आमच्यापासून उत्तरेकडे अर्ध्या मैलावर असेल ते ठिकाण! दोन हेलिकॉप्टर आजूबाजूच्या प्रदेशावर रॉकेटचा मारा करीत होते. प्रत्येक रॉकेटच्या स्फोटाबरोबर धुराचा नवीन डोंब उसळत होता.

एकदम आम्ही आमचा मोर्चा एका अरुंद रस्त्याकडे वळविला. तो आम्हाला बरोबर हल्ल्याच्या जागी नेणार होता. माझ्या मनात नाही नाही ते विचार येत होते. पण माझे सवंगडी मला वारंवार सांगत होते की आपण वार्ताहर आहोत. आपल्याला काहीच त्रास होणार नाही. त्यांचा आत्मविश्वास पाहून मी थोडासा सावरलो. कारण त्यांनी माझ्यापेक्षा अधिक काळ येथे काढला होता. मला येऊन फक्त आठच आठवडे झाले होते आणि माझा तो सर्व काळ निर्लष्करी भागातच गेला होता.

तरीपण मी अशांत होतो. मनात कसलीतरी भीती डोकावून जात होती. कारण इंडोनेशियातील सुकार्नोच्या काळातील माझा अनुभव मला काहीतरी वेगळेच सांगत होता. वार्ताहर म्हणजे नसता त्रास! ते आम्हाला हेर समजत. त्यामुळे 'बाओ ची'ची घोषणा आमची सायगावमध्ये एखाद्या संकटातून सुटका करील अशी खात्री मला वाटत नव्हती.

रस्त्यावर निर्वासितांची खूप गर्दी होती. पावसामुळे रस्त्याच्या कडेला पाण्याची डबकी साचली होती. चिखल झालेला होता. आम्हाला त्यामुळे वेळोवेळी थांबावे लागत होते. मी अंदाज केला – जवळ जवळ २००० तरी निर्वासितांना आम्ही ओलांडले असेल. त्यांची पार दैना झालेली होती. बायका–पोरे, म्हातारी–कोतारी, तरुण, तान्ही बाळे, जनावरे, कोंबड्या... सारे काही गर्दीत होते. ज्याला जे वाचवता येईल त्याची बोचकी बांधून ते घेऊन जात होते...पण सर्वांचा उद्देश एकच!...जीव वाचवायचा!

"अशा वेळी फक्त जनताच भरडली जाते. तिलाच भोगावे लागते सारं!" माझ्या शेजारी बसलेला ब्रूस म्हणाला. लारामे शांत बसला होता. बाकीचेसुद्धा काही बोलले नाहीत. कारण त्यांना निर्वासितांच्या हालांची चर्चा करण्यापेक्षा प्रत्यक्ष लढाईच्या जागी पोहोचण्याची घाई झाली होती. मग मी काही तरी बोलावे म्हणून खिशातून माझे फ्रेंच पॉकेटवॉच काढले, "नऊ-अठरा झालेत!" मी बोललो. स्वतःशीच! कुणालाही उद्देशून नाही...!

आता '...व्हिएटकाँग...व्हिएटकाँग...!' असे आवाज आमच्या कानावर येऊ लागले. माझ्या लक्षात आले की आता निर्वासितांची गर्दी तुरळक होऊ लागली आहे. "इथे गर्दीत कुणीच पोलिस अगर सैनिक रक्षणासाठी दिसत

नाही...." मी म्हणालो. पण मला वाटते माझ्या बोलण्याकडे इतरांनी दुर्लक्ष केले असावे.

मोकळ्या रस्त्याचा फायदा घ्यावा म्हणून जॉनने अॅक्सलरेटरवर पाय दाबला व गाडी जोरात काढली. मी मागच्या बाजूस जरासा उंचावर होतो. मला समोरचे सारे काही स्पष्ट दिसत होते. रस्ता निर्मनुष्य होता. रस्त्यावर स्मशानवत् शांतता पसरलेली होती. आणि एकदम माझ्या ध्यानात आले की आम्ही फार दूरवर आलो आहोत. तसा माझ्या अंगावर भीतीने थरारून काटा उभा राहिला.

" तिकडे व्हिएटकाँग आहेत. " मी ओरडलो.

" ओऽऽ! ...चल पुढे !" ब्रूस म्हणाला. बर्चसुद्धा पुढेच जायला उत्सुक होता.

" मागे जा...!" एक म्हातारी ओरडली. ती तेव्हढी एकच त्या रस्त्यावरची जीवंतपणाची निशाणी होती.

आम्ही रस्त्याच्या कडेला असलेल्या एका अरुंद क्रॉसरोडवर आलो. मी ब्रूसकडे पाहीले. त्याच्या चेहऱ्यावर भीतीची छटा स्पष्टपणे उमटली होती. त्याने जे पाहिले होते ते मीपण पाहिले होते. आमच्या उजव्या बाजूला व्हिएटकाँग दबा धरून बसले होते. त्यापैकी दोघेजण आमच्यापासून ३० फुटावर होते. तिसरा डाव्या बाजूला हातात 'बझूका ' घेऊन तेलाच्या पिंपाला टेकून उभा होता. चौथा चिनी बनावटीची 'अे. के. ४७ ' अॅटोमॅटिक गन घेऊन उभा होता. तिच्यांतून काही क्षणातच ३० फैरी झाडता येतात.

जॉनने गाडी एकदम डाव्या बाजूला घेतली आणि गाडी रिव्हर्समध्ये घेण्यासाठी ती क्षणभर थांबवली. पण उशीर झाला होता. ते आमच्यासाठीच थांबले होते की आम्ही गाडी कधी थांबवतो ते ! त्यांनी एकदम गोळीबाराला सुरुवात केली.

जसा गोळ्यांचा वर्षाव होऊ लागला, मी धडपडत गाडीतून उडी मारली. माझा चेहरा मरणाच्या भीतीने काळवंडला होता. मी मेल्याचे सोंग घेऊन जमिनी-वर पडलो होतो. माझा डावा हात मी डोक्यावर आडवा धरला होता; पण मी डाव्या बाजूला असलेल्या व्हिएटकाँगच्या माऱ्याच्या टप्प्यातच होतो. गोळ्या संपे-पर्यंत तसेच पडून रहायचे नी मग पळ काढायचा असा माझा विचार होता. त्यासाठी मी खबरदारीसुद्धा घेतली होती. पडतानाच मी माझा डावा पाय असा घेतला होता की स्टार्ट घ्यायला सोपे पडेल.

दहा सेकंदातच गन्मधील गोळ्यांची क्लीप संपली. गाडीतून मला कसलाच आवाज ऐकू येत नव्हता. मला लारामे दिसत होता, त्याचे मस्तक मागे झुकलेले होते. मागच्या सीटवर तो वाकडेतिकडे हातपाय फेकून पडला होता. तेलाच्या पिंपामागे असलेला व्हिएटकाँग आता पुढे आलेला मला दिसत होता. त्याने फिकट खाकी रंगाचा गणवेष घातला होता व हो चि मिन्ह पद्धतीच्या चपला घातल्या होत्या.

मी माझा चान्स घेणार होतो. इतक्यात माझ्यापासून २० फुटांवरून एक सशक्त सैनिक हळूहळू पुढे येत असलेला मला दिसला. त्याच्या हातात ४५ कोल्ट टाईपचे पिस्तोल होते. त्याच्यामागे काही फुटांवरच तो अे. के. ४७ गन घेतलेला सैनिक होता. तो पुढे येणारा खात्रीने त्यांचा कमांडर होता. त्यात काहीच संशय नव्हता.

कमांडर गाडीकडे जाऊ लागला. त्यासरशी उजव्या हाताने वार्ताहाराचे ओळखपत्र फडकावीत जखमी मायकेल बर्च ओरडला "बाओ ची ! बाओ ची !'

त्या व्हिएटकाँगचा चेहरा एकदम ताठर बनला. त्याने रागाने बर्चकडे पाहिले. 'बाओ ची !' असे तुच्छतेने उच्चारून त्याने बर्चवर दोन गोळचा झाडल्या. बर्चची हालचाल थंडावली.

कमांडर गाडीजवळ पोहोचला. त्याने आत डोकावून पाहिले. त्याच्या चेहऱ्यावरचे समाधान मी स्पष्ट पाहू शकलो. सर्वजण ठार झाले होते वाटते ! पिगोट गाडीतच असेल !

त्याचवेळी माझ्या डावीकडे कसली तरी हालचाल झाली व कुणाचा तरी कण्हण्याचा आवाज आला. जॉन कान्टवेल लोळागोळा होऊन पडला होता. तो सहा फुटांवरच माझ्या व गाडीच्या मध्ये होता. आम्ही दोघेही त्याच्या माऱ्याच्या टप्प्यात होतो.

कमांडरने जॉनकडे पाहिले. जॉन शेवटचे आचके देत होता. कमांडरने सावकाश त्याच्यावर पिस्तोलने नेम धरला. पहिली गोळी हुकली. ती माझ्या डोक्यावरून गेली. नंतर बरोबर नेम धरून त्याने दोन गोळचा झाडल्या. जॉनचे शरीर एकदम ताठ झाले; पण क्षणातच त्याचा कारभार आटोपला.

कमांडरने काही क्षण माझ्याकडे पाहिले. मी हाताखालून अर्धवट मिटलेल्या डोळचांनी त्याच्याकड पहात होतो. त्याने पिस्तोलचा हात खाली केला व तो खिशातून गोळचाची नवी क्लीप काढू लागला. मी जमिनीत पाय घट्ट रोवला व सरळ त्याच्याकडे पाहिले. त्याची नजर खाली वळलेली होती. त्याने ती क्लीप बसवली !... आताच पळायला पाहिजे !... हीच संधी आहे.... नाही तर कधीच नाही !...

मी एकदम पायावर उडी मारली व पळायला लागलो. जरा दूर गेल्यावर मागे वळून पाहिले. ते आश्चर्यचकीत झाले होते व तसेच रागावलेसुद्धा होते. परत पुढे पहात मी नागमोडी वळणे घेत पळू लागलो.

कांही क्षणांतच हे सारे घडले. त्यांनी तावडतोब गोळचा झाडायला सुरुवात केली. माझ्या अवतीभवती गोळचांच्या सडा पडत होता. एक गोळी तर माझ्या शर्टची बाही फाडून गेली. मी शेवटची उडी घेऊन रस्त्याचा कोपरा गाठला. गोळचा माझा पाठलाग करीतच होत्या.

मी कोपऱ्यावर वळलो. धाड्धाड् बुटांचा आवाज करीत कमांडर माझा पाठलाग करीत होता. ·४५ मधून गोळ्या झाडीत होता. आता मी कसलाच धोका पत्करायला तयार नव्हतो. गोळ्यांच्या माऱ्यातून वाचलो होतो, पण अजून शाश्वती नव्हती. क्षणाचीही उसंत न घेता मी कमीत कमी २०० मिटर्सचा डॅश मारला आणि रस्त्याने जाणाऱ्या निर्वासितांच्या तांड्यांत घुसलो. माझे जाकीट मी फेकून दिले. चिखलांत बसकण मारून मी कपडे चिखलाने माखून घेतले. तोंडावर चिखल फासला, कुबड काढून एका गाडीच्या मागे लपत त्यांच्याबरोबर चालू लागलो.


मी मागे वळून पाहिले. कमांडर घोळक्याच्या मागे उभा होता. तो लोकांना ओरडून–रागावून म्हणत होता की मला पकडून त्याच्या ताब्यात द्या ! त्या निर्वासितांनी त्याच्याकडे लक्षच दिले नाही. त्याने त्यांच्या डोक्यावरून गोळ्या झाडल्या. पण ते बधले नाहीत. एव्हढेच नव्हे तर त्यांनी माझ्याकडे पाहिलेसुद्धा नाही. ते गप्प खाली मान घालून चालत होते. त्या गर्दीत आत रिकामे पिस्तोल घेऊन येण्याची काही त्या कमांडरची छाती झाली नाही.

मुख्य रस्त्यावर येताच मी ५०० पियास्ट्रेची नोट फडकावीत एका तीन चाकाच्या टॅक्सीला हात केला. मला घेऊन टॅक्सी शहराकडे धावू लागली. एक मैलानंतर मी एका ऑस्ट्रेलियन सैनिकाला लिफ्ट दिली. तो हत्यारी सैनिक माझ्या शेजारी होता. हाच मला पुढच्या साऱ्या रस्त्यावर मोठा आधार होता. नंतर मी अमेरिकन चौकीवर घडलेल्या प्रसंगाचा रिपोर्ट दिला.

त्यांनी पाठवलेली सैनिकांची तुकडी जवळ जवळ ५ तासांनी माझ्या मित्रांची प्रेते आणू शकली. त्यांना ती प्रेते कशी मिळाली ?... हालहाल केलेली, अंगावरील सर्व चिजवस्तु लुटलेली, तशीच रस्त्यावर ती प्रेते पडलेली होती. मी काय करू शकत होतो ?...

एखाद्या सैनिकासारखी माझ्या मित्रांना वीरगती प्राप्त झाली होती.

[ फ्रॅन्क पामॉस ह्यांच्या 'Ambushed in Saigon' वर आधारीत ]





## पाहिलेच पाहिजे असे बालनाट्य

# मंगळावर स्वारी

पडदा उघडला जातो आणि स्टेजवर दिसते ते रॉकेट उड्डाणाचे दृश्य. पुढे काय होणार या उत्कंठेने मी स्तिमित नजरेने पहातो आणि रॉकेट उड्डाण संपले की सारे सभागार बालप्रेक्षकांच्या टाळ्यांच्या कडकडाटाने दणाणून निघते.

श्री. नरेंद्र बल्लाळ लिखित आणि दिग्दर्शित 'मंगळावर स्वारी' या विज्ञान बाल नाट्याचे निम्मे यश या पहिल्याच 'एन्ट्रीने' स्पष्ट होते.

जादूगार, राक्षस, पऱ्या, राजपुत्र, राजे-राण्या राज-कन्या, या बालनाट्याच्या चाकोरीतून बाहेर पडून आधुनिक जगाला साजेसे नाटक मुलांना देण्याचा स्वागतार्ह प्रयत्न 'नवल रंगभूमी'ने 'मंगळावर स्वारी' हे नाटक सादर करून केला आहे. सुमारे दोन वर्षापूर्वी हे नाटक प्रथम रंग-भूमीवर आले. आणि त्याचा थोडा फार बोलबालाही झाला. परंतु तेव्हाच्या प्रेक्षकांना सर्वस्वी अपरिचित असा लेखक–दिग्दर्शक (नरेंद्र बल्लाळ) आणि सादरकर्ती संस्था (नवल रंगभूमीचे हे पहिले वहिलेच नाटक), यामुळे मराठी-तील या पहिल्या विज्ञान काल्पनिक नाटकाचे व्हावे तेवढे प्रयोग होऊ शकले नव्हते.



आज परिस्थिती बदलली आहे. रत्नाकर मतकरी आणि सुधा करमरकर यांच्या बरोबरीने बालनाट्य क्षेत्रात नरेंद्र बल्लाळ हे नाव घेतले जाऊ लागले

आहे. नवल रंगभूमी ही बाल नाटच संस्थाही 'राजाला फुटले पंख' आणि 'नवलभूमीचा यक्ष' ही वैशिष्टचपूर्ण नाटके सादर करून पाय रोवून उभी राहिलेली आहे. आणि मुख्य म्हणजे मानवाच्या ताज्या चंद्रविजयानंतर त्याला मंगळाचे वेध लागले आहेत. अशा वेळी 'मंगळावर स्वारी' हा विषय छोटचा मोठ्या प्रेक्षकांना विलक्षण आकर्षक वाटू लागला आहे.

ही संधी नवल रंगभूमीने न गमावता नव्या थाटात 'मंगळावर स्वारी'चे प्रयोग सुरू केले, एवढेच नव्हे तर एका आठवडचात एकाच नाटचगृहात ओळीने आठ प्रयोग जाहीर केले. आणि बाल वा प्रौढ अशा कोणत्याही नाटचसंस्थेने यापूर्वी कधीही न केलेला विक्रम प्रस्थापित केला.

या प्रयोगांना निश्चित असा प्रेक्षकवर्ग आता लाभणार ही संयोजकांची अटकळ चुकीची ठरली नाही. २३ ते ३१ ऑगस्टपर्यंत दादरच्या बालमोहन विद्यामंदिराकडे हे नाटक पहाण्यासाठी प्रेक्षकांची जी रीघ लागली होती त्यावरून हे सिद्ध होते.

या धाडसी उपक्रमाबद्दल आणि त्याच्या यशाबद्दलही नवल रंगभूमीचे अभिनंदनच केले पाहिजे.

आपल्या आई-वडिलांसह भारतातून मंगळाकडे निघालेल्या दोघा बहिणभावांची ही कथा आहे. त्यांचे अंतराळयान वाटेत भरकटते, मुले यानातील अणुमोटारीने मदतीच्या शोधार्थ निघतात, आणि एका अज्ञात ग्रहावर येऊन पडतात. तिथे रहात असतो एक संशोधक — विश्वाचे रहस्य उकलण्यासाठी प्रयोग करणारा. त्याच्या तावडीत ही मुले सापडतात. त्यांना कापून त्यांची तपासणी करण्याचे तो ठरवतो. यापूर्वी त्याने मंगळावरील माणसांची चिरफाड करून त्यातल्या एकाचा यंत्रमानव केलेला असतो. पृथ्वीवरची ही मुले त्याच्या तावडीतून कशी निसटतात आणि शेवटी मंगळावर कशी पोहोचतात हा सगळा भाग मोठा नाटचपूर्ण आणि थरारक आहे.

मराठीतल्या या पहिल्याच विज्ञान काल्पनिक नाटकाचे अर्धे यश त्यातील तांत्रिक चमत्कारांवर अवलंबून आहे. प्रारंभीचे रॉकेट उड्डाणाचे दृश्य तर अविस्मरणीय आहे. हमखास टाळ्या घेणारे दृश्य ते हेच. सोवेंदू रॉय यांनी मोठ्या कल्पकतेने हा आभास निर्माण केला आहे. त्यांची सुरंगी आणि अभिनव प्रकाशयोजना हे या नाटकाचे मोठे आकर्षण. मराठी रंगभूमीवर असा प्रकाश-चमत्कार क्वचितच पाहावयास मिळतो.

यशवंत देव यांचे एकच गाणे या नाटकात आहे. त्यांनी ते लिहिले आहे सुरेख आणि चालही दिली आहे मधुर. श्याम जोशी यांचे पार्श्वसंगीतही रंगत आणणारे ठरते.

वसंत सरवटे, अशोक वल्लाळ आणि सुहास जोशी या त्रयींनी नेपथ्य शोभा सांभाळली आहे.

या नाटकाचा भर आहे तो मुख्यतः तंत्र चमत्कारांवर. त्यामुळे अभिनयाला त्यात गौणत्व प्राप्त होते. तरीही इला पातकर, मिलिंद बल्लाळ, विश्वनाथ पामकर, सुरेखा जोशी, मीरा बल्लाळ ही मंडळी चांगले काम करून जातात. श्रीधर पारकरानी बसविलेले 'राक्षस नृत्य' शशिकान्त पडते, सुरेश सावंत पद्माकर आणि आनंद चिवटे ही मुले झक्क करतात. श्रीनिवास ताम्हणकर मंगळावरचा नेता म्हणून शोभून दिसतो. एकूण पाहिलेच पाहिजे अशी ही 'मंगळावर स्वारी' आहे!


नरेंद्र बल्लाळ यांनी लेखक आणि दिग्दर्शक म्हणून चांगली कामगिरी बजावली आहे. मराठी बालरंगभूमीने ज्याच्याकडे आशेने पहावे असा हा कलावंत आहे.

बालमोहनला 'मंगळावर स्वारी'चे ओळीने आठ प्रयोग जाहीर होताच मी थक्कच झालो! म्हटले, हे काही वेगळेच पाणी आहे. इथे काही जिद्द आहे, योजकताही आहे. हे आठही प्रयोग 'हाऊस फुल्ल'.करणे किती अवघड गोष्ट आहे हे या क्षेत्रातील जाणकारच जाणू शकतील. परंतु नवल रंगभूमीने ते केले! एका वेगळ्याच तंत्राने तिने हे प्रयोग संघटित केले आणि बालनाट्य सादर करण्याचा एक आदर्श घालून दिला.

३१ ऑगस्टला झाला तो या नाटकाचा २४ वा प्रयोग. 'स्वारी'च्या सप्ताहाच्या समारोपाच्या प्रयोगावेळी प्रेक्षकांचे स्वागत होत होते ते सनई चौघड्याच्या आवाजाने.

आता लवकरच नवल रंगभूमी 'मंगळावर स्वारी'चा रौप्यमहोत्सवी प्रयोग 'दणक्यात' सादर करील ही अपेक्षा. संस्थेची ही हौस, हा उत्साह, ही जिद्द अशीच कायम टिको असेच कोणीही बाल नाट्यप्रेमी म्हणेल.

**अशोक आचार्य**



# तुळशीपत्र

बाबासाहेब पुरंदरे

निळ्या आभाळाखालीं पुण्याची पर्वती उभी होती.

मखमली हिरवी झूल पांघरलेल्या हत्तीवर सोन्याची अंबारी झळकावी, तशी हिरव्या डोंगरावर पर्वती खुलत होती. तिचे सोनेरी कळस चमकत होते. पर्वतीच्या तटाला असलेल्या नारांगणी झरोक्यात रामशास्त्री प्रभुणे उभे होते. ते सोवळ्यात होते. त्यांच्या उघड्या अंगावर जानवे रुळत होते. डाव्या खांद्यावर शाल होती. त्यांची नजर दूरवर ईशान्येला असलेल्या गारपिराच्या छावणीवर खिळलेली होती. अगदी एकाग्र. ते मुखाने काही स्तोत्र म्हणत होते. अगदी ओठातल्या ओठात. गारपिराच्या तळावरून आज श्रीमंत प्रधानपंत माधवराव पेशवे हैदरच्या पारिपत्या-साठी स्वारीवर निघणार होते. स्वारीच्या मुहूर्ताची घटका आत्ता सकाळची होती. शास्त्रीबुवांचे लक्ष तिकडे होते.

अन् गारपिरावर सलामीची पहिली तोफ उडाली. पाठोपाठ दुसरी तोफ उडाली. मग तिसरी, चौथी, पाचवी, श्रीमंतांची स्वारी कर्नाटकच्या मोहिमेवर निघाली.

तिकडे पहिली तोफ उडताच इकडे पर्वतीवर नगारखान्यात कर्णे धुत्कारू लागले, नगारा झडू लागला. तोफांचे आवाज पर्वतीवर ऐकू येत होते. आकाशात चढणारा तोफांचा धूर दिसत होता. झरोक्यात उभे असलेले रामशास्त्री देवदेवेश्वराच्या कळसाकडे पाहत हात जोडून पुटपुटले,

"हे शिवशंभो, श्रीमंतांच्या पदरी उदंड यश घाल!"

आणि शास्त्रीबुवा देवदेवेश्वराच्या मंदिराकडे झपाझप पावले टाकीत निघाले. देवदेवेश्वराचा गाभारा सुगंधाने कोंदला होता. शिव, पार्वती आणि गणपति यांच्या मूर्ती दीपज्योतीत चमकत होत्या.

श्रीमंतांची स्वारी पुण्याबाहेर पडली होती. ढालगज आघाडीला होता. साहेबनौबत दणाणत होती. तोफखान्याचे गाडे धडधडत धावत होते.

देवदेवेश्वराच्या पिंडीवर हेलावणाऱ्या अभिषेकपात्रातून जलधारा स्रवत होती. रामशास्त्रींचा रुद्र सुरू झाला होता.

श्रीमंत माधवराव पेशवे स्वारीवर निघाले की, न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे पर्वतीस अनुष्ठान मांडीत. अंतरात त्यांच्या एकच तळमळ असे,

"हे शिवशंभो, देवदेवेश्वरा, श्रीमंतांना यशवंत कर!"

मराठी दौलतीचे पानिपत झाले. मोहरा गेल्या. मोती हरपले. खुर्दा किती गेला, त्यास गणतीच नाही. कोलमडलेल्या दौलतीचा सारा भार पडला त्या कोवळ्या पोरपेशव्यावर. तो धडपडत होता. उलटया धारेत पोहत होता. मराठी राज्य मोडावे म्हणून बाहेरचे आतुर होते. अन् घरचे फितूर होते. पेशवा झुंजत होता. या पेशव्याला यश मिळावे म्हणून हा रामशास्त्री रुद्र म्हणत होता. फार फार तळमळत होता. हा शास्त्री शूर नव्हता. तो मुत्सद्दीही नव्हता. जर तो सैनिक असता तर, पर्वतीवर अभिषेकाची रुद्रधारा धरण्याऐवजी त्याने रणांगणावर रुधिरधारा धरली असती. जर तो मुत्सद्दी असता तर, त्याने राजकारणाच्या आखाड्यात इंग्रजांनाही अवघड पेच घातले असते. डाव जिंकले असते. पण आज हा शास्त्री अनुष्ठान मांडीत होता, युद्धे आणि तह जिंकले जावेत म्हणून. त्याच्या हातात तेवढेच होते.

स्वराज्याच्या राज्यकारभारातली एक गोष्ट मात्र तो चोख पार पाडीत होता. न्यायदान. त्याच्या न्यायाचा तराजू समतोल होता. कोणत्याही पारड्यावर तो माशीसुद्धा बसू देत नव्हता.

हा न्यायशास्त्री भारी कठोर होता. अति गंभीर होता. नाचगाण्याच्या मैफलीत तो कधी रंगत नसे. उत्सवामहोत्सवात तो रमत नसे. पण त्याचा आनंद उसळून यायचा श्रीमंत विजयी होऊन आल्यावर. श्रीमंत माधवराव पेशव्यांवर शास्त्रीबुवांचे प्रेम अपार. त्यांच्या या अथांग पण गुप्त प्रेमाची चाहूल कुणालाही त्यांनी लागू दिली नव्हती. हे गुपीत

कळले होते फक्त पर्वतीवरच्या श्रीदेवदेवेश्वराला. विजयी श्रीमंतांची स्वारी पुण्यात वाजत गाजत प्रवेशली आणि शनिवारच्या वाड्याकडे येऊ लागली की, कुठे तरी एकांतात शास्त्रीबुवांचे हात कृतज्ञतेने श्रीदेव-देवेश्वराला जोडले जात.

शास्त्रीबुवांची श्रीमंतांवरील ही प्रीत शनिवारवाड्यातल्या एका चाणाक्ष तरुण मुलीने हेरली. त्या मुलीचे नाव रमा. प्रत्यक्ष श्रीमंत माधवरावांची पत्नी. सकल सौभाग्यसम्पन्न रमाबाईसाहेब पेशवे. रमाबाईसाहेबांनी शास्त्रीबुवाना अचूक ओळखले होते. शास्त्रीबुवांना त्या सतत पाहत होत्या. शास्त्रीणबाईंनाही त्या सतत पाहत होत्या. शास्त्रीणबाईंचे नाव होते सौभाग्यवती काशीबाई. अगदी साधी बाई. शास्त्रीबुवा नेहमी दिसत अगदी साध्या पेहरावात. काशीबाईही तशाच. काशीबाईंच्या अंगावर असायचे साधे गरिबीतले लुगडे अन् चोळी. गळ्यात फक्त मंगळसूत्र अन् पायांत जोडवी. हातात असायच्या पुरणाच्या बांगड्या. दोघेही नवराबायको अगदी निष्कांचन.

रमाबाईसाहेबांना हे जाणवायचे. त्यांच्या मनात एका दिवशी आलेच की, आपण रामशास्त्रींसाठी काही तरी करायचे. कसे करावे, काय करावे याचा विचार त्यांच्या मनात घोळत होता. त्या श्रीमंतांना म्हणाल्या,

"स्वारींनी ऐकलं का ?"

"काय ?"

"स्वारींवर आभाळाएवढं प्रेम करणारं एक माणूस स्वारींच्या राज्यांत आहे."

"आमच्यावर आभाळाएवढं प्रेम करणारं माणूस ?"

"हं ! ओळखावं."

"म्हणजे तुम्हीच !"

"इश्श ! थट्टा ही आमची."

"मग तुमच्याहूनही आमच्यावर अधिक प्रीत करणारं माणूस आहे तुमच्याआमच्या राज्यांत ? कोण ? कोण ?"

"रामशास्त्री प्रभुणे. न्यायाधीश."

"होय होय, खरं आहे. पण तुमच्याहूनही ?"

" आमच्याहूनही ! शास्त्रीबुवांच्या भक्तीपुढं मी म्हणजे एक तुळशीपत्र केवळ !"

"हं ? पण हे तुळशीपत्र एवढं जड ारी आहे की, त्या एका तुळशीपत्रानं सारं पारडं भुईला टेकतंय !"

"इश्श ! काय ही थट्टा !"

वाऱ्याने झुंबराचे लोलक किणकिणू लागले. त्यांत रमामाधवांचे हसणे मिसळले. रमाबाईसाहेब श्रीमंतांना म्हणाल्या,

"पण शास्त्रीबुवांसाठी आपण कांहीतरी करायचं. अजून आपण कांहीच केलेलं नाही."

"काय करायला हवं होतं ?"

"कौतुक ! हिऱ्यामोत्यांनी. चांदीसोन्याने."

"हे आमच्या मनात कधीच आलं नसेल ?"

"राहून गेलं असेल. मी म्हणत होते, शास्त्रीणबाईंनाच वाड्यावर बोलावून घ्यावं अन् त्यांना पैठणी नेसवून, गोठतोडे घालून मेण्यात बसवून घरी पाठवावं, ओटी भरून.

"मुत्सद्दी आहांत !"

"पेशव्यांची बायको आहे मी !"

हसणे खळखळले.

अन् रमाबाईसाहेब तयारीला लागल्या.

एके दिवशी काशीबाईंना सकाळीच शनिवारवाड्यातले खास बाईसाहेबांचे निमंत्रण आले. देवघरात शास्त्रीबुवांच्या देवपूजेची तयारी करून शास्त्रीणबाई निघाल्या.

रमाबाईसाहेबांच्या महालात त्या प्रवेशल्या. बाईसाहेबांनी त्यांचे प्रसन्न आगत स्वागत केले. चार गोष्टी इकडच्या तिकडच्या झाल्या. शास्त्रीणबाई मोकळेपणाने हसत बोलत होत्या. पण वेळ सकाळची. संसारकामाची. त्यांना ओढ दिसत होती घरची. पेशवीणबाईंनी हेरले. त्यांनी ओटीची ताटे पुढे घेतली. शास्त्रीणबाई विस्मयाने पाहत होत्या. कुंकवाचे बोट लावून बाईसाहेबांनी भरजरी पैठणीची घडी उलगडली आणि म्हटले,

"नेसा."

"मला ? कशाला ?"

" मी सांगते म्हणून ! आमचं ऐकायचं. "

काशीबाईंना काही बोलताच येईना. मुकाट्याने त्या पैठणी नेसल्या; आणि ताटातला एक एक दागिना घेऊन बाईसाहेबांनी काशीबाईंच्या अंगावर घालायला प्रारंभ केला. काशीबाई गोंधळून गेल्या होत्या. त्यांना बोलायचे होते; पण शब्दच येत नव्हते. लंकेच्या पार्वतीसारख्या दिसणाऱ्या काशीबाई लक्ष्मीसारख्या दिसू लागल्या. रमाबाईसाहेबांनी त्यांना हळदकुंकू लावले आणि खणानारळाने त्यांची ओटी भरली. काशीबाईंना हे सारे जड जड, अवघड अवघड वाटत होते.

काशीबाई मेण्यांत बसल्या. मेणा निघाला.

रामशास्त्री देवपूजा संपवून सूर्यपूजेसाठी ओटीवर आले अन् तेवढ्यात शास्त्रीणबाईंचा मेणा अंगणात आला. पदरात ओटी सांभाळीत शास्त्रीणबाई मेण्याबाहेर आल्या. नखशिखांत भरजरीत आणि दागिन्यात सजलेली आपली बायको पाहून शास्त्रीबुवा विस्मितच झाले. बाई फार छान दिसत होती. शास्त्रीबुवांचे मन क्षणभर कौतुकाने फुलले. त्यांचे डोळे त्या लक्ष्मीस्वरूपावर खिळले. ते पाहतच राहिले. अगदी न कळत त्यांच्या गंभीर मुद्रेवर स्मित तरळले. ते अलंकृत रूप त्यांना फार फार आवडले. जोडवी वाजत होती. ओटी आणि पदर सावरीत खाली पाहत काशीबाई पायऱ्यांकडे येत होत्या. समोर ओटीवर शास्त्रीबुवा उभे होते. रमाबाईसाहेबांनी आज सकाळीसकाळीच आपल्या बायकोला कशासाठी वाड्यावर बोलावले याचा खुलासा त्यांना आपोआप झाला. मनात दाटून आलेले कौतुक, डोळ्यातून डोकावणारा आनंद आणि मुद्रेवर तरळणारे स्मित एका क्षणात, एका घोटात गिळून टाकून शास्त्रीबुवा कठोर नजरेने काशीबाईंकडे पाहत होते. त्यांच्या हातात पूजासाहित्याचे तबक होते. शास्त्रीबुवांनी काशीबाईंना विस्मयी शब्दात विचारले,

" आपण कोण ? कोण पाहिजे आपल्याला ?"

दोन पायऱ्या चढलेल्या काशीबाईंचे पाऊल तिसऱ्या पायरीवर थबकले. नवऱ्याच्या तोंडून, 'आपण कोण ?' हा सवाल ऐकून त्यांचे काळीज गलबलले. आता काय बोलायचे ? त्या गप्पच उभ्या राहिल्या. त्यांची पावले, त्यांची मान, त्यांचे हात जड झाले. मणामणाच्या बेड्या घातल्यासारखे. शब्दातील सूर बदलून शास्त्रीबुवा लगेच म्हणाले,

" होय होय, आम्ही ओळखले. श्रीमंतांना आम्ही ओळखले. रमाबाई-साहेबांना आम्ही ओळखले. तुम्हालाही ओळखले. आम्हाला मात्र कुणीच ओळखले नाही. शनवारवाड्यातल्या लक्ष्मीने तुमच्याआमच्या पदरात हे अपरंपार प्रेम घातले आहे. या या ! घरात जा. कधीही न संपणारे ते प्रेम ठेवून घ्या आणि बाकीचा हा निर्माल्य परत पाठवा !"

काशीबाई आत देवघरात गेल्या. एका ताटात त्यांनी पदरातील ओटीचे तांदूळ, खण आणि नारळ ठेवून दुसऱ्या ताटात अंगावरचे सर्व दागदागिने उतरवले. त्या साधे नेहमीचे लुगडे नेसल्या. दागिन्याच्या ताटांत त्यांनी पैठणीची घडी ठेवली. अन् ताटांतली खणानारळाची ओटी तेवढी ठेवून घेऊन त्या वस्त्रालंकाराचे ताट घेऊन बाहेर आल्या. शास्त्रीबुवांच्या पुढे ते ताट त्यांनी ठेवले. शास्त्रीबुवांनी आपल्या हातातल्या तबकातले एक तुळशीपत्र वस्त्रालंकाराच्या ताटात टाकले आणि मेण्याच्या भोयांना हाकारून म्हणाले,

" घेऊन जा हे !"

भोई ते ताट मेण्यात ठेऊन घेऊन गेले.

शास्त्रीबुवांनी काशीबाईकडे बघून म्हटले.

" रागावला असाल ?"

न बोलता बाईंनी हसून फक्त मानेनेच 'नाही' म्हटले. शास्त्रीबुवा म्हणाले,

" न्यायदान करणाऱ्याने व्रतस्थ असलं पाहिजे. कोणाचेही त्याने अहेर आणि नजरनजराणे स्वीकारता कामा नये."

वस्त्रालंकाराचे ताट शनिवारवाड्यात परत आले. महालात रमाबाई-साहेब अन् माधवरावसाहेब होते. भोयांनी वस्त्रालंकाराचे ताट श्रीमंतांच्या पुढे ठेऊन मुजरा करीत म्हटले,

" श्येस्तरीबाबांनी ताट माघारा लावलं."

रमाबाईसाहेब आश्चर्याने ताटाकडे बघतच राहिल्या. श्रीमंत मात्र हसत होते. त्यांना आश्चर्य वाटत नव्हते. त्यांनी हसतच त्या ताटावरचे तुळशीपत्र उचलले.

□ □ □

चौथी सचित्र आवृत्ती

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे


मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

राजहंस प्रकाशित

पुणे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649



“ मी लोकशाहीचा कट्टा पुरस्कर्ता आहे. मग त्यासाठी सर्वच्या सर्व जनतेविरुद्ध लढा द्यावा लागला तरी बेहेत्तर, मी माझी भूमिका जरासुद्धा बदलणार नाही, सांगून ठेवतो ! ... ”